


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार ४ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

# ममता बॅनर्जींची तृणमूल काँग्रेस फुटल्यात जमा!

## 59 आमदारांसह बंडखोर गट विधानसभा अध्यक्षांकडे; चिन्हावरही दावा!

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालच्या राजकारणातील आतापर्यंतचा सर्वात मोठा भूकंप झाला असून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षात उभी फूट पडली आहे. पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेले बंडखोर नेते ऋतब्रत बॅनर्जी आणि संदीपन साहा हे बुधवारी विधानसभेत दाखल झाले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ऋतब्रत बॅनर्जी हे तृणमूलच्या ८० पैकी तब्बल ५९ आमदारांच्या समर्थनाचे पत्र विधानसभा अध्यक्षांकडे सोपवणार आहेत. यासोबतच त्यांनी तृणमूल काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नवे नेते, विरोधी पक्षनेतेपद आणि पक्षाच्या अधिकृत चिन्हावरही दावा ठोकण्याची तयारी केली आहे.



पश्चिम बंगाल विधानसभेत तृणमूलचे ८० आमदार असून, पक्षांतर बंदी कायद्यानुसार नवीन गटाला मान्यता मिळवण्यासाठी ५२ आमदारांच्या पाठिंब्याची गरज आहे. बंडखोर गटाकडे ५९ आमदार असल्याचा दावा तृणमूलचे निलंबित नेते रिजू दत्ता यांनी केला आहे.

**ममतांचे पुतणे अभिषेक बॅनर्जींविरोधात उघड बंड-** उलुबेरिया पूर्वचे आमदार ऋतब्रत बॅनर्जी आणि एंटालीचे आमदार संदीपन साहा यांना ममता बॅनर्जी यांनी पक्षाबाहेर काढले होते. या कारवाईनंतर बंडखोरांनी थेट ममतांचे पुतणे अभिषेक बॅनर्जी यांच्या नेतृत्वाला आव्हान दिले आहे. ऋतब्रतबॅनर्जी यांनी स्पष्ट केले की, 'पक्षाने मला काढले असले तरी मी अजूनही तृणमूलसोबतच आहे. पश्चिम बंगाल विधानसभेत अभिषेक बॅनर्जी यांना कोणतीही किंमत नाही. आमचे बहुतांश आमदार मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील प्रशासकीय बैठकांमध्ये सहभागी होत राहतील.'

**'घराणेशाही आणि घमेंड नडली'; आमदारांचे गंभीर आरोप-** पश्चिम बंगालमध्ये सत्ता गमावल्यानंतर तृणमूलमधील अंतर्गत असंतोष उफाळून आला आहे. आमदार आणि नेते आता उघडपणे पक्ष नेतृत्वावर आरोप करत आहेत. अभिषेक बॅनर्जी यांच्यामुळेच पक्षाची ही अवस्था झाल्याचे त्यांचे म्हणणे आहे. पक्षातील ज्येष्ठ नेत्यांना डावलणे, घराणेशाही, भ्रष्टाचार, अहंकार आणि 'I-PAC' च्या प्रोफेशनल्सच्या माध्यमातून पक्ष एखाद्या जहागिरीसारखा चालवणे, असे गंभीर आरोप आमदारांनी केले आहेत.

**कल्याण बॅनर्जींचे विधानसभा अध्यक्षांना पत्र; दुस-या गटाची धडपड-** पक्षातील या मोठ्या फुटीच्या दरम्यान, तृणमूलचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी विधानसभा अध्यक्षांना खुले पत्र लिहून अधिकृत तृणमूल काँग्रेसकडून नियुक्त्यांची मागणी केली आहे. त्यांनी सोभनदेव चटोपाध्याय यांना विरोधी पक्षनेतेपद देण्याची मागणी केली आहे. तसेच आशिमा पात्रा आणि नयना बंदोपाध्याय यांना उपनेते आणि फिरहाद हाकीम यांना मुख्य प्रतोद घोषित करण्याची विनंती केली आहे.



त्यांनी आपल्या पत्रात २००१, २००६, २०११, २०१६ आणि २०२१ मधील विधानसभा परंपरांचा दाखला दिला आहे. सोमवारी रात्री कोलकाता येथील आमदार हास्टेलमध्ये झालेल्या गुप्त बैठकीतच या बंडाची संपूर्ण रणनीती ठरली होती. ममता बॅनर्जी यांनी बोलावलेल्या बैठकीला ६० आमदारांनी दांडी मारली होती, आणि आता तेच आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांच्यासोबत उभे राहिल्याने ममता बॅनर्जी यांचे बंगालवरील राजकीय वर्चस्व धोक्यात आले आहे.

### विश्वासू नेत्याने सोडले महापौरपद!

राज्यात सत्तांतर झाल्यापासून तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांच्या अडचणींमध्ये आणखी भर पडली. ऋतब्रता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली बंडखोरी केलेल्या ६० आमदारांच्या गटाला पश्चिम बंगालचे विधानसभा अध्यक्ष रवींद्रनाथ बोस यांनी मान्यता दिली. त्यानंतर काही तासांतच ममता बॅनर्जी यांचे अत्यंत निकटवर्तीय आणि विश्वासू सहकारी फिरहाद हकीम यांनी कोलकाताच्या महापौरपदाचा राजीनामा दिला. तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांच्यासाठी हा मोठा झटका आहे.




पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला. त्यामुळे पक्ष फुटण्याचा धोका निर्माण झाला. बॅनर्जी यांचे विश्वासू आमदार फिरहाद हकीम यांनी कोलकात्याच्या महापौरपदाचा राजीनामा देउन त्यांच्या जखमेवर मीठ चोळले. फिरहाद हकीम हे बंगालमधील तृणमूल काँग्रेसचा एक अत्यंत प्रभावशाली आणि मोठा अल्पसंख्याक चेहरा म्हणून ओळखले जातात. २०१८ पासून ते कोलकाताचे महापौर म्हणून कार्यरत होते. २०१० पासून कोलकाता महानगरपालिकेवर टीएमसीचे एकछत्री नियंत्रण राहिले आहे. अशा बड्या नेत्याने आणि मुख्यमंत्र्यांच्या निकटवर्तीयाने पद सोडल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. राज्यात सत्तांतर झाल्यापासून डागाळलेल्या टीएमसी नेत्यांवर सातत्याने कारवाया होत आहेत, शिवाय नेत्यांना जनतेच्या रोषालाही सामोरे जावे लागत आहे.

# दिल्लीत हॉटेलमध्ये भीषण आग

## 21 जणांचा होरपळून मृत्यू








**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीतील मालवीय नगरमध्ये आगीची भीषण घटना घडली असून एका पंचतारांकीत हाटेलमध्ये लागलेल्या आगीत होरपळून २१ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. दिल्लीतील लेमन ग्रीन नावाच्या रेस्टारंटमध्ये बुधवार सकाळी ९.४५ वाजता आग लागल्याची घटना घडली. याबाबत माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन सेवा ने घटनास्थळी धाव घेतली, त्यानंतर येथील इमारतीमधून ३७ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. मात्र, या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला असून अनेक लोक गंभीर जखमी झाले आहेत. यात ११ परदेशी नागरिकांचा समावेश आहे. यामध्ये ९ आफ्रिकन आणि तुर्कमेनिस्तानच्या २ नागरिकांचा समावेश आहे. मालकाला ताब्यात घेतले आहे. जखमींना सध्या जवळील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डीडीएमए दक्षिण जिल्ह्याचे उपविभागीय दंडाधिकारी जितेंद्र कुमार यांनी सांगितले की, सकाळी घटनेची माहिती मिळताच आम्ही तातडीने यंत्रणा सक्रिय केली आणि सर्व संबंधित पथकांना घटनास्थळी रवाना करण्यात आले. या इमारतीच्या तळमजल्यावर एक हाटेल सुरू होते. ⇨(पान २ वर)

# शेतकरी कर्जमाफीत जाचक अटी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील फडणवीस सरकारने अखेर जून महिन्यातील पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घेतला असून २ लाख रुपयांपर्यंत शेतक-यांना कर्जमाफी देण्यात आली आहे. मात्र, या कर्जमाफी योजनेत शासनाने अनेक अटी टाकल्या आहेत. त्यानुसार, लोकप्रतिनिधी खासदार ते नगरसेवक, सरकारी कर्मचारी, अधिकारी, २५ हजार रुपयांपेक्षा जास्त पगार असलेल्या सरकारी किंवा अनुदानित संस्थांच्या कर्मचा-यांना या योजनेतून वगळण्यात आलं आहे. त्यामुळे, या कर्जमाफी योजनेला शेतकरी संघटना आणि विरोधकांनी विरोध दर्शवला आहे. तसेच, ही योजना फसवी असल्याची टीकाही करण्यात येत आहे. शिवसेना खासदार संजय राउत, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केलीय.



अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथे शासनाच्या शेतकरी कर्जमाफी योजनेच्या आदेशाविरोधात संताप उसळल्याचं दिसून आलं. जाचक अटींमुळे शेतक-यांना न्याय मिळत नसल्याचा आरोप करत किसान सभेने आदेशाची होळी केली. शहरातील महात्मा फुले चौकात मोठ्या संख्येने शेतकरी एकत्र येत आंदोलन छेडलं. शासनाने सर्वांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी आणि अटी रद्द कराव्यात अशी मागणी करत राज्यभर आंदोलनाची हाक किसान सभेकडून देण्यात आली आहे.

**विजय वडेट्टीवारांकडून संताप, शेतक-यांना लाभ नाही-** काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही शेतकरी कर्जमाफीवरुन सरकारवर हल्लाबोल केला आहे. या कर्जमाफीचा शेतक-यांना कोणताही फायदा होणार नाही. कर्जमाफी मार्चपूर्वी द्यायला हवी होती, दोन लाखापर्यंत कर्जमाफीची घोषणा झाल्यावर वरील पैसे भरण्यासाठी शेतक-याकडे कुठे पैसे आहेत? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे. शेतकरी कर्जमाफीचा निर्णय आज झाला. मात्र, खात्यामध्ये पैसे कधी पडतील, त्याला किती कालावधी लागेल, जर खरीप हंगाम झाल्यावर ते पैसे खात्यात पडेल तर शेतकरी खरीप हंगाम करू शकणार नाही. म्हणून या कर्जमाफीचा फक्त देखावा होणार, याचा शेतक-यांना कोणताही फायदा होणार नाही असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले. दरम्यान, थकीत असल्यामुळे शेतक-यांना क्रॉप लोनही मिळालं नाही, ही बाबही त्यांनी अधोरेखित केली.

**फडणवीस अन् मोदींच्या घोषणा फसव्या-** शिवसेना खासदार संजय राउत यांनीही शेतकरी कर्जमाफीवर प्रतिक्रिया दिली आहे. फडणवीस आणि मोदी यांच्या घोषणा म्हणजे फसवणुकीचा प्रकार आहे. प्रत्येक योजनेत ते लोकांना फसवत आहेत, अशी प्रतिक्रिया शिवसेना खासदार संजय राउत यांनी दिली.

### पाउले चालती पंढरीची वाट...

# संत तुकोबांच्या वारीचे वेळापत्रक जाहीर; पालखी 7 जुलैला पंढरीकडे प्रस्थान करणार

**पुणे/प्रतिनिधी :** मान्सूनच्या पहिल्या पावसानंतर वारकरी भक्तांना वेध लागते ते पंढरीच्या पांडुरंगाचे, पंढरीच्या वारीची उत्सुकता आणि विठ्ठल भेटीच्या ओढीने वारकरी आषाढी एकादशीची वाट पाहतात. राज्याच्या कानाकोप-यातून येणारे लाखो वारकरी, हजारो दिंड्या आणि संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालख्यांसह राज्यातील अनेक जिल्ह्यातून येणा-या मानाच्या पालख्या आपल्या वारीचं नियोजन करत असतात. पाउले चालती पंढरीची वाट.. म्हणत विठ्ठल नामाचा गजर करत या पालख्यांसह हजारो वारकरी पंढरीकडे चालतात. यंदा आषाढी एकादशी २५ जुलै २०२६ रोजी होत असल्याने आत्तापासूनच पंढरीच्या वारीचं नियोजन केलं जात आहे. त्यातच, संत तुकोबांच्या वारीचं वेळापत्रक जाहीर झालं असून यंदा ७ जुलैपासून तुकोबांची पालखी पंढरीकडे प्रस्थान करणार आहे.






अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या जगदगुरू संत तुकाराम महाराज यांच्या ३४१ व्या आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. जेष्ठ वद्य सप्तमी, मंगळवार ७ जुलै २०२६ रोजी श्रीक्षेत्र देहू येथील मुख्य देउळवाड्यातून संत तुकाराम महाराजांची पालखी भक्ती, श्रद्धा आणि नामस्मरणाचा गजर करत पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. यंदाच्या पालखी सोहळ्यासाठी ह.भ.प. विक्रमसिंह उमराज मोरे, ह.भ.प. उमेश सुरेश मोरे आणि ह.भ.प. लक्ष्मण दत्तात्रय मोरे यांची पालखी सोहळा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच पालखी रथ आणि चौघडा गाडीसाठी संस्थानतर्फे तीन बैलजोड्या खरेदी करण्यात ⇨(पान २ वर)

# डीके शिवकुमारांनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ

**बंगळुरू/वृत्तसंस्था :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डी. के. शिवकुमार यांनी बुधवारी कर्नाटकच्यामुख्यमंत्रीपदाची शपथ घेउन राज्याचा कार्यभार स्वीकारला. डॉ. जी. परमेश्वर यांनीही उपमुख्यमंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली. के. एच. मुनियप्पा, के. जे. जॉर्ज, एम. बी. पाटील, रामलिंगा रेड्डी, सतीश जारकीहोळी, कृष्णा बायरे गौडा, प्रियांक खर्गे, यू. टी. खादर, ईश्वर खंड्रे, यतींद्र सिद्धरामय्या, बायराथी सुरेश आणि शरणप्रकाश पाटील यांच्यासह इतर बारा नेत्यांनीही मंत्री म्हणून शपथ घेतली.बंगळूर येथील लोक भवनच्या ग्लास हाउसमध्ये आयोजित एका भव्य समारंभात राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी दोन्ही नेत्यांना पदाची शपथ दिली. याप्रसंगी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि संघटन महासचिव के. सी. वेणुगोपाल यांच्यासह पक्षाचे अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित होते. आठ वेळा आमदार राहिलेल्या डी. के. शिवकुमार यांचे राज्यातील सर्वोच्च पद गाठण्याचे दीर्घकाळपासूनचे राजकीय स्वप्न अखेर आज पूर्ण झाले.कर्नाटकच्या राजकारणातील शिवकुमार आणि सिद्धरामय्या यांच्यातील दीर्घकाळ चाललेला नेतृत्वाचा संघर्ष, काँग्रेस हायकमांडच्या निर्देशानुसार सिद्धरामय्या यांनी २८ मे रोजी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यावर संपुष्टात आला. सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्यामुळे मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा झाला आणि काँग्रेसचे संकटमोचक मानले जाणारे डी. के. शिवकुमार यांच्या हाती राज्याची सूत्रे सोपवण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस आता कर्नाटकात एका नव्या राजकीय पर्वाला सुरुवात करत आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सिद्धरामय्या यांची काँग्रेस कार्यकारिणी समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती करून एक मोठा राजकीय संकेत दिला. सिद्धरामय्या यांना पूर्णपणे एकाकी वाटू नये, अशी पक्षाच्या नेतृत्वाची इच्छा आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, त्यांना एक सन्मानजनक भूमिका देणे आणि पक्षात संतुलन राखणे, हा रणनीतीचाच हा एक भाग आहे.



# आमिर खान गौरीसोबत बांधणार लगीनगाठ?

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेता आमिर खान तिस-यांदा लग्न करणार आहे. आमिरच्या लग्नाची तारीख समोर आली आहे. येत्या ५ जुलै रोजी आमिर त्याची गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅट हिच्यासोबत विवाहबंधनात अडकणार असल्याची चर्चा आहे. ६० वर्षीय आमिर आणि ४७ वर्षीय गौरी यांनी नोंदणीकृत पद्धतीने लग्न करण्याचा निर्णय घेतला असून, या सोहळ्याला केवळ त्यांचे कुटुंबीय आणि काही जवळचे मित्र उपस्थित राहणार आहेत.



**घरीच रंगणार विवाहसोहळा-** अभिनेत्याच्या निकटवर्तीयांनी दिलेल्या माहितीनुसार, या जोडप्याने काही आपल्या नात्याला अधिकृत नाव देण्याचा निर्णय घेतला. सूत्रांनी सांगितले, 'ते दोघेही सध्या आपल्या आयुष्यात खूप आनंदी आहेत. त्यांना फक्त त्यांच्या या नात्याचा सोहळा साजरा करायचा होता. त्यामुळेच त्यांनी लग्नाची तयारीही सुरू केली असून, हा सोहळा अत्यंत खासगी आणि कौटुंबिक स्वरूपाचा असेल.' हा विवाहसोहळा आमिर खानच्या निवासस्थानी पार पडणार आहे. अद्याप या लग्नाला उपस्थित ⇨(पान २ वर)

# 'शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा हवा तोवर माघार नाही...'

## कॉक्रोच जनता पार्टीची पहिली पत्रकार परिषद

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** कॉक्रोच जनता पार्टी ही युवकांची चळवळ आहे. आज ८ लाख लोकांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मागितला आहे. परंतु या विद्यार्थ्यांच्या मागणीवर कुठलाही प्रतिसाद सरकारने दिला नाही. २ सरकारी अधिका-यांची बदली केली, परंतु त्यांना निलंबित केले नाही. मागील काही वर्षांपासून देशात फार पत्रकार परिषद घेतल्या जात नाही. कुणीही उत्तर दायित्व घ्यायला तयार नाही. ६ जूनला अभिजीत दीपके यांनी जंतर मंतरला आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनाला देशातील युवकांनी यावे आणि शांततेत त्यांचं म्हणणं मांडावे. परीक्षेतील घोटाळ्यांसाठी जबाबदार असणारे शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा अशी आमची प्रमुख मागणी आहे अशी माहिती कॉक्रोच जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ते सौरव दास यांनी दिली.




गेल्या अनेक दिवसांपासून सोशल मीडियात चर्चेत असणा-या कॉक्रोच जनता पार्टीची पहिली पत्रकार परिषद दिल्लीत आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत पार्टीचे मुख्य प्रवक्ते सौरव दास, प्रवक्ते विजेता दहिया, आशुतोष राका यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. यावेळी सौरव दास म्हणाले की, सोनम वांगचूक यांनीही आमच्या आंदोलनाला पाठिंबा दिला असून तेदेखील आंदोलनात सहभागी होतील. ६ जूनला सकाळी ८ वाजता अभिजीत दीपके दिल्ली एअरपोर्टवर उतरतील. तिथून ते जंतर मंतर आंदोलनासाठी परवानगी मागायला पोलीस स्टेशनला जातील. या आंदोलनात सर्व युवकांनी सहभागी व्हावे. सत्ताधारी असो वा विरोधी पक्षातील युवकांनी त्यांचा बॅनर न आणता आंदोलनात सहभागी व्हावे. सर्व राजकीय पक्षातील युवकांना आम्ही आंदोलनात येण्याचं आवाहन करतो असं त्यांनी सांगितले. तर NEET चे पेपर लीक झाले, SSC-GD परीक्षेत गोंधळ झाला. क्एच्क परीक्षेत घोटाळा झाला. अनेक विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात गेले आहे. काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. इतके होउनही कुणी जबाबदारी घ्यायला तयार नाही. दिवसरात्र मेहनत करून परीक्षेची तयारी करणा-या विद्यार्थ्यांसोबत अन्याय होतोय. कुणी त्यावर बोलत नाही. आपण निवडून दिलेले प्रतिनिधी राजा नाहीत तर जनतेचे कामगार आहेत. जर ते योग्य काम करत नसतील तर आपण प्रश्न विचारायला हवेत. जबाबदारी निश्चित केली जावी. जे सक्षम असतील त्यांना शिक्षणमंत्री बनवावे असं प्रवक्ते विजेता दहिया यांनी म्हटलं. दरम्यान, भारतात आजपर्यंत अनेक ⇨(पान २ वर)

# गडकरींच्या हस्ते हिरोच्या 2 दमदार बाईक लॉन्च

## पेट्रोलऐवजी इथेनॉलवर धावणार, किंमतही कमी!

**मुंबई/प्रतिनिधी :** इंधनाचे दर गगनाला भिडले असताना देशातील सर्वात मोठी दुचाकी वाहन उत्पादक कंपनी हिरो मोटकार्पने आपल्या दोन प्लेक्स फयुअल बाईक लान्च केल्या आहेत. दिल्ली येथे आज आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हिरो स्प्लेंडर प्लस फलेक्स फयुअल आणि हिरो एचएफ डिलक्स फलेक्स फयुअल या दोन बाईकचे अनावरण करण्यात आले.



या कार्यक्रमाला केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी, हिरो मोटारकार्पचे सीईओ हर्षवर्धन चितळे तसेच वाहन उद्योगातील अनेक मान्यवर उपस्थित होते. केंद्र सरकार देशात इथेनाल मिश्रण वाढविण्यावर भर देत आहे. यातच हिरोने आपल्या दोन नव्या बाईक लान्च करून केंद्र सरकारच्या मोहिमेला बळ दिले. या दोन्ही मोटारसायकल क२० ते क८५ पर्यंतच्या इथेनाल मिश्रित इंधनावर सहज चालू शकतात. त्यामुळे पेट्रोलवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार असून प्रदूषणातही घट होण्याची अपेक्षा आहे. या दोन्ही बाईकची ⇨(पान २ वर)

# कुवेत विमानतळावर झालेल्या इराणी हल्ल्यात भारतीय नागरिक ठार

## 63 जखमी, अनेकांची प्रकृती गंभीर; ड्रोन हल्ल्यात अमेरिकन बेस सुद्धा टार्गेट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळावर झालेल्या इराणी ड्रोन हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला आणि ६३ जण जखमी झाले. त्यापैकी अनेकांची प्रकृती गंभीर आहे. कुवेतमधील भारतीय दूतावासाने या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. कुवेतच्या आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, अनेक जण डोक्याला आणि शरीराला गंभीर जखमा झाल्या आहेत. या घटनेनंतर, घटनास्थळी २५ रुग्णवाहिका पाठवण्यात आल्या आणि जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले.या हल्ल्यामुळे विमानतळाच्या टर्मिनल १ चे मोठे नुकसान झाले. यानंतर, सुरक्षेच्या कारणास्तव विमानतळावरील वाहतूक तात्पुरती थांबवण्यात आली. यापूर्वी, यूएस सेंट्रल कमांडने माहिती दिली होती की, इराणने कुवेतमध्ये तैनात असलेल्या अमेरिकी सैनिकांवर वारंवार ड्रोन हल्ले केले होते. तथापि, सर्व हल्ले अयशस्वी ठरले.अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी फोनवर बोलताना त्यांना 'वेडा माणूस' म्हटले होते, हे कबूल केले आहे. तथापि, त्यांनी असेही म्हटले की ते नेतान्याहू यांचा आदर करतात आणि त्यांचे त्यांच्याशी खूप चांगले संबंध आहेत. एका पाडकास्टमध्ये ट्रम्प म्हणाले, 'इस्रायलने लेबनानवर केलेल्या हल्ल्यामुळे मी नाराज आहे. मला बिबी (नेतान्याहू) खूप आवडतात आणि मी त्यांच्यासोबत खूप चांगल्या प्रकारे काम करतो.' नेतान्याहू यांच्याबद्दल ट्रम्प यांनी केलेल्या अपमानास्पद वक्तव्याची बातमी सोमवारी 'अक्सिऑस'ने सर्वप्रथम प्रसिद्ध केली. इस्रायली अधिका-यांनी नंतर हे वृत्त फेटाळून लावले.

इराणचा अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ला- ⇨(पान २ वर)



# स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती दंत महाविद्यालय व रुग्णालयाची नमिरा सिद्दिकी नीट एमडीएस २०२६ परीक्षेत देशातून प्रथम

## महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

**नागपूर/प्रतिनिधीः-** विदर्भातील सर्वोत्कृष्ट दंत महाविद्यालय म्हणून सुपरिचित असलेल्या स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती दंत महाविद्यालय व रुग्णालय नागपूर येथील विद्यार्थीनी नमिरा सिद्दिकी हिने नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्स द्वारे घेण्यात आलेल्या दंत पदव्युत्तर परीक्षा म्हणजेच नीट एमडीएस २०२६ परीक्षेत देशातून सर्वाधिक ८०२ गुण प्राप्त करून प्रथम रँक (AIR 1) पटकावली आहे. नमिराच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून यामुळे महाविद्यालयाचे नाव देश पातळीवर झळकले आहे.

देशभरातील मास्टर ऑफ डेंटल सर्जरी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी नीट एमडीएस ही परीक्षा घेतली जाते. यामध्ये पात्रता तसेच रँकिंग महत्वाची असते. विशेष म्हणजे नमिरा सिद्दिकी हिने या परीक्षेत गरुडझेप घेतली असून तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

विशेष म्हणजे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्विट करत तिचे व महाविद्यालयाचे अभिनंदन केले आहे. मूळची भंडारा येथील ही विद्यार्थिनी असून ती वानाडोंगरी स्थित स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती दंत महाविद्यालय व रुग्णालय येथील बिडीएसची विद्यार्थिनी आहे. उल्लेखनीय आहे की स्व दादासाहेब काळमेघ स्मृती दंत महाविद्यालय व रुग्णालयाला गतवर्षीच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने विदर्भातील सर्वोत्कृष्ट दंत महाविद्यालय पुरस्कार दिला असून एकल दंत महाविद्यालयाच्या श्रेणीत नॅक कडून सीजीपीए ३.३१ सह A + रँकिंग प्राप्त करून महाविद्यालय संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. नमिरा हिने प्राप्त केलेल्या यशात तिची जिद्द व मेहनत लाभदायी ठरली असून तिने देश पातळीवर स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती दंत महाविद्यालय आणि रुग्णालयाचे नाव उंचावले आहे.



देशातून पहिला क्रमांक मिळणे अत्याधिक आनंदाचा क्षण आहे. मेहनत घेतली की त्याचे फळ निश्चितच मिळते यावर माझा विश्वास अधिक दृढ झाला आहे. मी ज्या व्यवसायात आहे त्यात दयाळूपणा आवश्यक आहे. कारण लोक तुमच्यावर विश्वास ठेवूनच तुमच्याकडे येतात. लोकांच्या विश्वासाला तडा जाणार नाही यासाठीच मी पुढील आयुष्यभर काम करत राहील. माझे यश हे सर्वांचे यश आहे असेच मी मानते.

**-डॉ नमीरा मो गोलिब सिद्दीकी**

# जनगणना कार्यात अचूकता आणि वेळेवर पूर्णत्वाला प्राधान्य

## ५ जूनपर्यंत काम पूर्ण करण्याचे आयुक्त वर्षा लड्डा यांचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी जनगणना प्रक्रियेच्या अनुषंगाने अमरावती महानगरपालिका प्रशासनाने कामाला गती देत झोननिहाय आढावा बैठक आयोजित केली. अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या अध्यक्षतेखाली आज (बुधवार) विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे पर्यवेक्षक, चार्ज अधिकारी आणि जनगणना कार्याशी संबंधित अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत जनगणना संचालनालयाने नुकत्याच घेतलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगमध्ये दिलेल्या सूचनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी सांगितले की, जनगणना ही देशाच्या विकास नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून त्यामध्ये नोंदविण्यात येणारी प्रत्येक माहिती अचूक, विश्वासार्ह आणि अद्ययावत असणे आवश्यक आहे. त्यामुळे क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या प्रगणकांनी भरलेल्या माहितीची काटेकोर तपासणी करणे आणि आवश्यक तेथे तात्काळ सुधारणा करणे ही सर्व संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने चार्ज अधिकारी स्तरावर माहितीची पडताळणी स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले.

बैठकीत प्रगणक, पर्यवेक्षक आणि चार्ज अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली. क्षेत्रीय कार्यामध्ये प्रगणकांकडून संकलित करण्यात येणारी माहिती योग्य प्रकारे भरली जात आहे किंवा नाही, याची दैनंदिन तपासणी पर्यवेक्षकांनी करावी. तसेच चार्ज अधिकाऱ्यांनी देखील नियमितपणे माहितीचे परीक्षण करून कोणतीही चुकीची किंवा अपूर्ण माहिती प्रणालीवर अपलोड होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे सांगण्यात आले.

# १ व १० वरिल उर्वरित

## दिल्लीत हॉटेलमध्ये भीषण आग

आगीचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही; मात्र प्राथमिक माहितीनुसार त्या हॉटेलमधूनच आग लागल्याची शक्यता आहे.

**आगीपासून वाचण्यासाठी इमारतीवरु न उड्या-** अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार, इमारतीत आग वेगाने पसरल्यानंतर बाहेर पडण्याचे सर्व मार्ग बंद झाले होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी इमारतीसमोरील जमिनीवर गाद्या टाकून बचावाची व्यवस्था केली. त्यानंतर अनेकांनी जीव वाचवण्यासाठी बाल्कनी, खिडक्या आणि इमारतीच्या वरच्या मजल्यांवरू न खाली उड्या मारल्या.दरम्यान, निवासी भागांमध्ये किती ह?टेल्स आणि रेस्ट?रंट्सना व्यवसायासाठी परवाना देण्यात आला आहे, याबाबतची माहिती महानगरपालिका प्रशासनाकडे मागवण्यात आली आहे. तसेच अशा सर्व आस्थापनांची नियमित तपासणी करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**पंतप्रधान मोदींकडून शोक-** पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही दिल्लीतील आगीच्या घटनेवर शोक व्यक्तकेला आहे. मालवीय नगर येथील दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांप्रती मी सहवेदना व्यक्तकरतो. तसेच, आगीच्या घटनेत जखमी झालेल्यांच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करत असल्याचं ट्विट मोदींनी केलं आहे. तर, दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना २ लाखांची आर्थिक मदत व जखमींना ५० हजार रु पये पंतप्रधान निधीतून देण्यात येतील, असेही त्यांनी जाहीर केले.

## पाउले चालती पंढरीची वाट...

आल्या असून त्या यंदाच्या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. तुकोबारायांच्या पालखीसह संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीचीही उत्सुकता वारकरी आणि विठ्ठलभक्तांना असते. त्यामुळे, आता संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीचे आळंदीतून पंढरीकडे कधी प्रस्थान होणार हेही लवकरच समजणार आहे.

***गजानन महाराजांच्या पालखीसह शेकडो पालख्यांचे प्रस्थान*** - दरम्यान, पंढरीच्या वारीसाठी महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून हजारो दिंड्या आणि शेकडो पालख्या येत असतात. त्यामध्ये, जळगावमधून संत मुक्ताई, बुलढाण्यातून संत गजानन महाराजांच्या पालखीचेही प्रस्थान होत असते. गजानन महाराजांची पालखी शेगाव ते पंढरी वारक-यांसह पायी प्रवास करते. त्यामध्ये, हत्ती, घोडा, पालखीसह वारकरी माउली माउली.. चा गजर करताना दिसून येतात. लाखो वारकरी पंढरीत चंद्रभागेच्या तिरी आषाढी एकादशी दिवशी जमतात. आपल्या विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची लांबच लांब रांग लागल्याचंही पाहायला मिळतं.

## आमिर खान गौरीसोबत

पाहुण्यांची अधिकृत यादी समोर आलेली नसली, तरी आमिरचे जवळचे मित्र सलमान खान आणि शाहरु ख खान या लग्नाला हजेरी लावू शकतात, अशी जोरदार चर्चा आहे.आमिरची गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटबद्दल सांगायचं तर, तिच्या पहिल्या लग्नापासून 'क्विन' नावाचा सात वर्षांचा मुलगा आहे. आमिर आणि गौरी त्यांच्या आयुष्यातील या नवीन टप्प्यात दोन्ही कुटुंबांचा पाठिंबा आहे. आमिर खानने यापूर्वी रीना दत्ता यांच्याशी लग्न केले होते, ज्यांच्यापासून त्यांना जुनैद आणि इरा ही दोन मुले आहेत. त्यानंतर त्याने चित्रपट निर्माती किरण राव हिच्याशी विवाह केला होता, त्यांना आझाद नावाचा मुलगा आहे. आमिर आणि किरण यांनी २०२१ मध्ये परस्पर संमतीने घटस्फोटाची घोषणा केली होती. हा विवाहसोहळा पूर्णपणे खासगी ठेवण्यात येणार असून, ५ जुलै रोजी रजिस्टर्ड मॅरेज आणि एका छोट्या कौटुंबिक सोहळ्याने त्यांच्या या नवीन प्रवासाची सुरु वात होईल. अर्थात आमिर-गौरी या दोघांपैकी कोणीही लग्नाची अधिकृत बातमी अद्याप सर्वांसोबत शेअर केली नाही.

## 'शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा हवा

चळवळी उभ्या राहिल्या. NEET, CBSE सारख्या अनेक परीक्षांमध्ये गोंधळ होतोय. युवकांना कॉक्रोच म्हणून संबोधलं जातंय. लोकांमध्ये राग आहे. प्रत्येक राज्यात काही ना काही आंदोलन सुरू आहेत. लोक रस्त्यावर आहेत परंतु देशातील माध्यमे त्याकडे लक्ष देत नाहीत. विद्यार्थ्यांकडून आंदोलन होताहेत. परंतु आता विद्यार्थी एकत्र यायला हवे. युवक एकत्र येउ नये यासाठी सरकार प्रयत्न करतंय. परंतु युवकांनी संघटितपणे एकत्र आले पाहिजे. देशातील १ कोटी विद्यार्थी त्रस्त आहेत. शिक्षण मंत्यांची नैतिक जबाबदारी आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यायला हवा. या देशात अनेक परीक्षेत घोटाळे झाले आहेत. आम्ही युवकांची लढाई लढतोय. कायद्याच्या चौकटीत राहून आंदोलन होईल. ही लढाई कुणा एकाची नाही तर देशातील विद्यार्थ्यांची आहे. देशातील विद्यार्थ्यांना जंतरमंतरवर यायची गरज का वाटतेय, धर्मेंद्र प्रधान राजीनामा का देत नाही हा प्रश्न आहे असं आशुतोष राका यांनी सांगितले. **फंडिंगबाबत प्रश्नावर उत्तर -**कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला परदेशातून फंडिंग होतंय असा आरोप सत्ताधारी करत आहेत त्यावर पत्रकार परिषदेत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर सौरव दास यांनी उत्तर दिले. जेव्हा कधीही देशात एखादी चळवळ उभी राहत असेल तर त्याविरोधात नॅरेटिव्ह चालवलं जातं. फंडिंगबाबत विचारणा होते, एखादा युवक १०० रूपये देउन जंतर मंतरला येउ शकत नाही का, २०० रूपयाचा बॅनर छापायला कुणी खिशातून १ रूपया देउ शकत नाही का..त्यामुळे विरोधात अनेक कथा सांगितल्या जातील. आज मंत्र्यांची मुले परदेशात शिक्षण घेताहेत, देशातील सामान्य मुलांनी शिक्षण घ्यायचं नाही का..? जोवर धर्मेंद्र प्रधान राजीनामा देत नाहीत तोवर आम्ही सरकारशी कुठलाही संवाद साधणार नाही असा इशारा त्यांनी सरकारला दिला.

## गडकरींच्या हस्ते हिरोच्या

विक्री येत्या जुलै महिन्यापासून दिल्ली आणि महाराष्ट्रातील निवडक भागांमध्ये सुरू होईल. त्यानंतर टप्प्याटप्प्याने त्या देशभर उपलब्ध केल्या जाणार आहेत.हिरो मोटारकार्पने या दोन्ही मोटरसायकलींच्या किमतींची घोषणाही केली आहे. हिरोच्या स्प्लेंडर प्लस फ लेक्स फ युअल बाईकची किंमत ७२ हजार ७९२ (एक्स- शोरू म) रु पये आहे. तर, हिरो एचएफ डिलक्स फ लेक्स फ युअलची किंमत ८२ हजार ७१० (एक्स-शोरूम) रु पये इतकी आहे. या दोन्ही बाईकमध्ये ९७.२ सीसी क्षमतेचे इंजिन देण्यात आले आहे.ई-८५ इंधनावर हे इंजिन ६.३ केडब्लू पावर आणि ८.३ एनएमटार्क निर्माण करते. पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे पेट्रोल, डिझेल आणि सीएनजी पुरवठ्यावर परिणाम होत असून इंधनाचे दरही वाढत आहेत. त्यामुळे केंद्र सरकार इथेनाल मिश्रित इंधनाचा वापर वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे.ई-२० नंतर आता ई-२५ आणि ई-३० इंधनाच्या दिशेने सरकार वाटचाल करत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अनेकदा वाहन उत्पादकांना प्लेक्स फ युअल वाहने बाजारात आणण्याचे आवाहन केले. हिरो मोटोकार्पने त्याला प्रतिसाद देत त्यांच्या पहिल्या दोन प्लेक्स फ युअल बाईक लान्च केल्या आहेत.

## कुवेत विमानतळावर झालेल्या

इराणने लायबेरियन ध्वज असलेल्या जहाजावर क्षेपणास्त्रे डागल्याचा दावा केला आहे. तसेच त्यांनी कुवेत आणि बहरीनच्या दिशेने क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागले. इराणने म्हटले आहे की, त्यांनी अमेरिकेचे हवाई तळ, हेलिकाप्टर तळ आणि बहरीनमधील अमेरिकेच्या नौदलाच्या पाचव्या ताफ याच्या मुख्यालयाला लक्ष्य केले. इराणी तेलवाहू जहाजांवर हल्ला-अमेरिकेच्या लष्कराने इराणच्या खारग बेटावरील बंदराकडे जाणा-या बोत्सवाना ध्वज असलेल्या तेलवाहू जहाजावर हेलफायर क्षेपणास्त्राने हल्ला केला. यापूर्वी, अमेरिकेने होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ असलेल्या केशम बेटावरील इराणी लष्करी नियंत्रण केंद्राला लक्ष्य केले होते.

ट्रम्प यांनी नेतान्याहूंना फटकारले-लेबनानमधील इस्रायली हल्ल्यांवरू न ट्रम्प यांनी नेतान्याहूंना फोनवरून फटकारले. वृत्तानुसार, ते म्हणाले, 'मी नसतो तर, तुम्ही तुरुंगात असता.'

**इस्रायली हल्ले तीव्र**-लेबनानमध्ये इस्रायली हल्ले सुरूच आहेत. नबातीहसह अनेक भागांवर हवाई हल्ले झाले, तर हिजबुल्लाहनेही ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले केले.

## अंजनगाव सुर्जी नगरसेवकांची

१० नगरसेवकांना सूचक म्हणून नेले होते. यामध्ये शिवसेना शिंदे गटाचे ३, ठाकरे गटाचे ५ आणि समाजवादी पक्षाच्या २ नगरसेवकांचा समावेश होता. एकाच वेळी विरोधी विचारांचे नगरसेवक बाजोरिया यांच्या पाठीशी उभे राहिल्याने राज्यभर याची चर्चा रंगली होती. मात्र, यामुळे स्थानिक पातळीवर या शिवसेना पदाधिकाऱ्यांसह नगरसेवकांना प्रचंड टीकेचा सामना करावा लागला. या टीकेनंतर शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. 'विप्लव बाजोरिया यांनी अर्ज दाखल करताना आम्हाला शिवसेना शिंदे गटाचा तसा आदेश असल्याचे सांगितले होते. पक्षाच्या आदेशाचा मान राखून आम्ही अर्जावर सूचक म्हणून स्वाक्षऱ्या केल्या. मात्र, प्रत्यक्षात आमची दिशाभूल करण्यात आली होती, हे आम्हाला नंतर समजले,' अशी कैफियत नगरसेवकांनी मांडली. पत्रकार परिषदेत शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबुराव पाटील उंबरकर शिवसेना शहरप्रमुख मुन्ना उर्फ योगेश इसोकार, सचिन वाघमारे, सुधाकर फुलंबरकर उपस्थित होते. तालुका संघटन पदाधिकाऱ्यांनी ठामपणे सांगितले की, 'आम्ही महायुतीचे घटक आहोत आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर आमचा पूर्ण विश्वास आहे. आमची निष्ठा पक्षाशी आणि महायुतीशीच असून, आम्ही आगामी निवडणुकीत महायुतीच्या अधिकृत उमेदवारासोबतच राहणार आहोत. दिशाभूल करून घेतलेल्या स्वाक्षऱ्यांमुळे झालेला संभ्रम आता दूर झाला आहे.'या स्पष्टीकरणामुळे विप्लव बाजोरिया यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता असून, अंजनगाव सुर्जीतील राजकारण पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे.

## इर्विन रुग्णालयात पुणे येथील महिलेचे

माहितीनुसार, पुणे येथील धायरी परिसरातील ३६ वर्षीय महिला आपल्या मावशीला भेटण्यासाठी इर्विन रुग्णालयात आल्या होत्या. त्यांची मावशी वार्ड क्रमांक १ मध्ये उपचारासाठी दाखल होती. सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास त्या वार्डात जाण्यासाठी आल्या असता डॉक्टरांचा राऊंड सुरू असल्याने त्या व इतर नातेवाईक वार्ड क्रमांक १ व २ कडे जाणाऱ्या जिन्याजवळ थांबल्या होत्या. यावेळी त्यांच्या डाव्या हाताला पर्स लटकलेली होती. काही वेळाने डॉक्टरांचा राऊंड संपल्यानंतर त्या वार्डात गेल्या असता पर्सची चेन उघडी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. तपासणी केली असता पर्समधील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम गायब असल्याचे दिसून आले. चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये ४० ग्रॅम वजनाची सोन्याची पोत व पेंडल (१.२० लाख रुपये), १० ग्रॅम वजनाचा सोन्याचा नेकलेस (३० हजार रुपये), ३ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी (९ हजार रुपये), १ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले (३ हजार रुपये), १० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या तोरड्या (१० हजार रुपये) तसेच २ हजार रुपये रोख असा एकूण १ लाख ७४ हजार रुपयांचा ऐवज होता. अज्ञात चोरट्याने पर्सची चेन उघडून हा मुद्देमाल लंपास केल्याची फिर्याद महिलेने दिल्यानंतर कोतवाली पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदविला आहे. रुग्णालय परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. रुग्णालयातही चोरट्यांचा सुळसुळाट वाढल्याने रुग्ण व नातेवाईकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्षाचे घरी

मजल्यावर त्यांची आई एकटी राहते.प्रसूतीमुळे पत्नी चार महिन्यांपासून माहेरी असल्याने घरात वर्दळ कमी होती.बोबडे यांनी ले-आऊट व्यवहार व ट्रक भाड्याच्या उत्पन्नातून मिळालेली ६.२७ लाख रुपयांची रक्कम बेडरूममधील लाकडी कपाटात ठेवली होती. तसेच दुसऱ्या खोलीतील लोखंडी कपाटात ७० हजार रुपये व सोन्याचे दागिने ठेवण्यात आले होते.२ जूनच्या रात्री सुमारे १०.३० वाजता बोबडे हे मित्रासोबत कामानिमित्त अमरावतीला गेले असता चोरट्यांनी मध्यरात्री ही संधी साधली. त्यांनी घराच्या मुख्य दरवाज्याचे कुलूप कोंडा तोडून आत प्रवेश करत थेट बेडरूम गाठले व लाकडी कपाट उघडून त्यातील संपूर्ण रोकड लंपास केली.यानंतर चोरट्यांनी दुसऱ्या बेडरूममधील लोखंडी कपाट फोडण्याचा प्रयत्न केला, मात्र तो निष्फळ ठरल्याने तेथील रोकड व दागिने सुरक्षित राहिले. दरम्यान, चोरट्यांनी अत्यंत शिताफीने घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा DVR बंद करून त्याचा पॉवर सप्लाय काढून नेला. तसेच घराबाहेरील कॅमेरेही तोडफोड करून निष्क्रिय करण्यात आले. ३ जून रोजी पहाटेच्या सुमारास हेमंत बोबडे घरी परतले असता घराचे गेट व मुख्य दरवाजा उघडा आढळून आला. दरवाज्याचे तुटलेले कुलूप पाहून त्यांनी घरात धाव घेतली असता चोरीचा प्रकार उघडकीस आला.

या प्रकरणी तिवसा पोलीसानी घटनास्थळी धाव घेत सदर घटनेचा पंचनामा करून श्वान पथकास पाचारण करण्यात आले होते.याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल व केला असून तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

## बाजोरिया पिता-पुत्रांसह समर्थकांवर

महसूल भवनात एमएलसी निवडणुकीसाठी दाखल उमेदवारी अर्जांची छाननी सुरू होती. यावेळी विप्लव बाजोरिया यांच्या अर्जातील काही तांत्रिक बाबींवरून निवडणूक अधिकाऱ्यांशी वाद निर्माण झाला. सुरुवातीला शाब्दिक स्वरूपात सुरू झालेला वाद पुढे वाढत गेला आणि त्यामुळे छाननी प्रक्रियेवर परिणाम झाल्याचा आरोप करण्यात आला. घटनेनंतर निवडणूक विभागाने याची गंभीर दखल घेत गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार सादर केली. दिवसभर वरिष्ठ पातळीवर चर्चा आणि कायदेशीर पडताळणी झाल्यानंतर बुधवारी मध्यरात्रीनंतर संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. उपजिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी संतोष काकडे यांच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, महसूल भवनातील घटनाक्रम, उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे जबाब आणि उपलब्ध पुरावे यांच्या आधारे तपास सुरू करण्यात आला आहे. निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप, शासकीय कामात अडथळा आणि कार्यालयीन शिस्त भंग केल्याच्या अनुषंगाने विविध बाबींची चौकशी केली जात आहे. दरम्यान, निवडणूक प्रक्रियेच्या मध्यभागीच घडलेल्या या घटनेमुळे अमरावतीच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. उमेदवारी छाननीच्या टप्प्यावर निर्माण झालेला वाद आता थेट पोलीस गुन्ह्यापर्यंत पोहोचल्याने एमएलसी निवडणुकीतील राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत. पुढील तपासात या प्रकरणात आणखी काही नवे तपशील समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## अमरावती शहर पोलीस दलात

फ्रेजरपुरा येथून खोलापुरी गेट, ज्योती खवले यांची मुख्यालयातून नागपुरी गेट, मिलिंद तायडे यांची मोटार परिवहन विभागात, महमद सादिक हसन, प्रकाश मेश्राम, प्रेमचंद रावत, संजय धर्माळे, विनोद वाघमारे, सुनिल साखरकर, राजेश गुलालकरी, महादेव चव्हाण, राजेंद्र हरणे, दीपक सुंदरकर, भारतसिंग बघेल, राम बाखडे, संजय बेलसरे, योगेश रावते, रुपेश माहुरे, सचिन गायकवाड, विनोद राठोड, विजय तल्हार, सिद्धेश्वर गुटे, अरुण चव्हाण, सुधीर जामोदकर, निलेश जाधव, किशोर धुर्वे, ईश्वर राठोड, अमोल ढोके, विजय राऊत, सचिन श्रीवास, निवृत्ती भांगे, पुनित मेश्राम, विनोद झाडे, कैलास ढाकरे, अजय वाघ, अमोल नाईकनवरे, रविकुमार सोनवणे, राजकुमार राऊत, पंकज दवंडे, मुकेश यादव, गोपाल चोरे, सुनिल वंजारी, साधना इंगोले आणि महेंद्र ढोले यांच्यासह अनेकांची विविध पोलीस ठाणे व शाखांमध्ये बदली करण्यात आली आहे.

**यांना एक वर्ष मुदतवाढ-** दरम्यान, सेवानिवृत्तीला अल्प कालावधी शिल्लक असणे, वैद्यकीय कारणे, गंभीर आजार, विशेष कर्तव्ये किंवा कौटुंबिक कारणे लक्षात घेऊन अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांना एक वर्ष मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामध्ये नंदकिशोर आकोलकर, अविनाश नावरे, प्रविण खैरकर, विनोद वाघमारे, कृष्णा गुडधे, भैय्यालाल कोरेलावा, श्यामबाबू यादव, दीपक चव्हाण, संजय धर्माळे, प्रकाश मेश्राम, सुनिल महल्ले, प्रेमचंद रावत, संध्या सहारे, मनोहर राठोड, वंदना केळझरे, ज्ञानेश्वर गोगसे, प्रमोद भुसाटे, सुरेश प्रधान, बबन रामटेके, शंकर बसले, संतोष कडू, दीपक रायबोले, योगिनी शिरस्कार, संजय यादव, राजेश घुरडे, शिल्पा शिरभाते, रोशन निसंग, संजय मोहोड, विशाल वाकपांजर, राजेंद्रकुमार हुरबडे, गजानन कडू, दिलीप गावंडे, राजश्री थुल, श्रीकृष्ण भानगे, अभिजीत भारुडकर, सुनिल बाजगिरे, राजेश ब्राम्हणे आणि विशाल बुंदेले यांचा समावेश आहे.

## विप्लव बाजोरियांचे नामांकन

नंतर होणार आहे. दरम्यान, नामांकन छाननी प्रक्रियेदरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयात शासकीय अधिकाऱ्यांना धमकावणे आणि कामात अडथळा आणल्याप्रकरणी माजी आमदार विप्लव बाजोरिया आणि त्यांचे वडील गोपीकिसन बाजोरिया यांच्यासह सहकाऱ्यांवर गाडगे नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विप्लव गोपिकिशन बाजोरिया यांनी निवडणूक निर्णय अधिकार्‍यांनी नामनिर्देशनपत्र अवैध ठरवल्यामुळे आज बुधवार ३ जून रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली, पण त्यांना कोणताही अंतरिम दिलासा मिळाला नाही. न्यायालयाने विविध कायदेशीर बाबी विचारात घेता त्यांना ही निवडणूक लढण्याची तात्पुरती परवानगी देण्यास नकार दिला.

प्रकरणावर न्यायमूर्ती प्रफुल्ल खुबाळकर यांच्यापुढे सुनावणी झाली. दरम्यान, बाजोरिया यांनी या याचिकेवरील अंतिम निकालाच्या अधीन राहून नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याचे आणि निवडणुकीत सहभागी होऊ देण्याचे अंतरिम निर्देश निवडणूक निर्णय अधिकार्‍यांना देण्यात यावे, अशी मागणी केली तर, मुख्य सरकारी वकील वरिष्ठ ॲड. देवेंद्र चव्हाण यांनी निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप केला जाऊ शकत नाही, असा दावा करून या मागणीला विरोध केला. शेवटी न्यायालयाने सध्याच्या परिस्थितीत बाजोरिया यांची मागणी मंजूर केली जाऊ शकत नाही, असे स्पष्ट केले. तसेच, निवडणूक निर्णय अधिकारी आणि बाजोरिया यांच्या नामनिर्देशनपत्रावर आक्षेप घेणार्‍या उमेदवारांना नोटीस बजावून याचिकेतील आरोपांवर तीन आठवड्यात उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले.बाजोरिया यांच्या नामनिर्देशन पत्रावर महायुतीचे उमेदवार प्रवीण पोटे, वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निलेश विश्वकर्मा, अपक्ष प्रशांत महल्ले व महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांनी आक्षेप नोंदवले होते. प्रतिज्ञापत्र विहित नमुन्यात भरले नाही. गुन्हेगारी पार्श्वभूमी, मालमत्ता, दायित्व आणि वैयक्तिक माहिती मुख्य फॉर्ममध्ये लिहिली नाही इत्यादी मुद्दे आक्षेपकर्त्यांनी उपस्थित केले होते. २ जून रोजी निवडणूक निर्णय अधिकार्‍यांनी या आक्षेपांवरील सुनावणीनंतर बाजोरिया यांनी विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही, असे नमूद करून नामनिर्देशन पत्र अवैध ठरवले. यानंतर बाजोरीया यांनी नागपूर उच्च न्यायालयात धाव घेतली. एड. रेणुका शिरपूरकर यांच्या माध्यमातून त्यांनी याचिका दाखल केली होती. पण न्यायालयाने सध्या तरी त्यांना दिलासा दिला नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी दोन आठवड्यांनंतर होणार असून त्यावेळी न्यायालय अर्ज बाद करण्याच्या निर्णयाबाबत सविस्तर सुनावणी घेणार आहे. त्यामुळे अमरावती विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागलं आहे.

## अमरावती शहरातील अनधिकृत

शिक्षण विभाग अमरावती यांच्यावतीने जाहीर करण्यात आलेले आहे. तसेच पालकांनी सदर शाळेमध्ये प्रवेश घेतल्यास भविष्यात पाल्याच्या शैक्षणिक नुकसानीस पालक स्वतः जबाबदार राहतील अशी भूमिका शिक्षण विभागांच्या वतीने जाहीर करण्यात आलेली आहे. तसेच शहरातील शाळांमध्ये प्रवेश घेतेवेळी पालकांनी शाळा संबंधीत सर्व माहिती, कागदपत्रे याबाबतची तपासणी करूनच प्रवेश घेण्याबाबत निर्णय घ्यावा असे आवाहन सुद्धा यावेळेस शिक्षण विभाग महानगरपालिका यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## नीट पेपर घोटाळयाचा निषेधार्थ

निषेधार्थ तसेच विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी एन एस यु आय तर्फे देशभरात तीव्र आंदोलने करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय अध्यक्ष विनोद जाखर यांच्या नेतृत्वात तसेच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सागर साळुंखे, उपाध्यक्ष संकेत कुलट आणि जिल्हा अध्यक्ष सर्वेश खांडे यांच्या पुढाकाराने हा मोर्चा शहरात काढण्यात येत आहे. ५ जूनला सायंकाळी ५.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून मोर्चा आरंभ होऊन जयस्तंभ चौकापर्यंत काढण्यात येणार आहे. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, एन टी ए बरखास्त करावा अशी मागणी मोर्चाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या निष्काळजीपणा विरोधात निषेध व्यक्त करण्यात येणार आहे. मोर्चामध्ये विद्यार्थी, पालक व विविध सामाजिक संघटनेचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होतील. पत्रकार परिषदेमध्ये प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे, उपाध्यक्ष संकेत कुलट ,सर्वेश खांडे ,निलेश गुहे ,वैभव वानखडे, उत्कर्ष देशमुख, रितेश पांडव ,राहुल येवले ,शैलेश कालबांडे, नितीन काळे, परीक्षित जगताप, अनिकेत ढेगले, नितेश वानखडे, फिरोज शहा, योगेश बुंदिले, रोशन पिठेकर, भाविका राखा, शिवानी पारधी, स्वराज पोटे, वेदांत साखरे ,सौम्य सोनार, वेदांत केने, आदित्य साखरे, संकेत साहू, वैभव भोरे आदी उपस्थित होते.

## सलोना येथे प्रहार-शिवसेना

आवाहन केले. जनतेच्या समस्या आणि प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करण्याची भूमिका कायम ठेवण्यावर त्यांनी भर दिला. तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्या हक्कांसाठी लढण्याचे आवाहनही त्यांनी केले. 'पक्षाची खरी ताकद ही कार्यकर्त्यांमध्ये असते. जनतेच्या विश्वासावर उभी राहिलेली संघटना अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने गावागावात जाऊन लोकांशी संवाद साधावा,' असे प्रतिपादन बच्चू कडू यांनी यावेळी केले.मेळाव्यात उपस्थित कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. आगामी काळात जनहिताच्या प्रश्नांवर एकजुटीने काम करून प्रहार-शिवसेनेची ताकद वाढविण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान पक्षाच्या संघटनात्मक बांधणी, आगामी राजकीय घडामोडी तसेच मतदारसंघातील विविध विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली. मेळाव्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात संघटनात्मक कामाला अधिक गती मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## वाघिणीला नव्हे तर तिच्या

परतवाडा येथे हलवलेले नसून, तिच्या शावकांपैकी एका शावकाला (T2 Cub 1) पुढील आवश्यक व्यवस्थापन, सुरक्षितता आणि वैद्यकीय देखरेखीच्या दृष्टीने परतवाडा ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.

या शावकाला मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सोडण्यात येणार असल्याच्या अफवा देखील पसरत आहेत, परंतु सद्यस्थितीत या 'T2 Cub 1' शावकास मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये सोडण्याचा किंवा मुक्त अधिवासात पुनर्स्थापित करण्याचा कोणताही निर्णय अथवा योजना वन विभागाच्या विचाराधीन नाही. शावकाला केवळ सुरक्षित वातावरणात वैद्यकीय देखरेख आणि आवश्यक निगा उपलब्ध करून देणे हाच या स्थलांतराचा प्रमुख उद्देश आहे.

## अवैध दारू अड्ड्यांवरील धाडीत ४.१६

विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने मोर्शी पोलिसांनी मध्यप्रदेशातील मुलताई पोलिसांच्या समन्वयाने सालबर्डी, घोडदेव व झूनकार गावालगतच्या जंगल परिसरात छापा टाकला. नाल्याच्या काठावर सुरू असलेली हातभट्टी आढळून आली. घटनास्थळी कोणीही नसल्याने अज्ञात आरोपीविरुद्ध कारवाई करण्यात आली. या ठिकाणाहून २० ड्रम मोहमाच सडवा, गुळ, नवसागर व इतर साहित्य असा सुमारे ४ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला. तर दुसऱ्या कारवाईत माहुली पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नांदुरा पिंगळाई येथील पारधीबेडा परिसरात छापा टाकला. शिल्पा मनिष भोसले (वय ५४) ही महिला घरामागील जागेत हातभट्टी चालवून गावठी दारू तयार करून विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. छाप्यात ४० लिटर गावठी दारू, २५० लिटर मोहमाच सडवा तसेच दारू निर्मितीसाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईत १९ हजार ६१० रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. या दोन्ही कारवायांमध्ये एकूण ४० लिटर गावठी दारू, ३,०४० लिटर मोहमाच सडवा आणि दारू निर्मितीसाठी लागणारे साहित्य असा एकूण ४ लाख १६ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले, माहुलीचे ठाणेदार श्रीकांत कडू, स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि नितीन इंगोले व त्यांच्या पथकाने आरसीपी पथकाच्या सहाय्याने केली.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, ४ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# भोकर-काळेगाव रस्त्यात 'दोन अंदाजपत्रकांचा' खेळ?

## ई-निविदेत डांबरीकरण, ऑफलाईन कागदावर डांबर गायब; १.६४ कोटींच्या कामात नवा संशय



**"मूळ अंदाजपत्रकाला कात्री कुणी लावली?**

शासकीय कामांमध्ये मंजूर अंदाजपत्रकात बदल करायचा असल्यास त्यासाठी सक्षम प्राधिकरणाची मान्यता आवश्यक असते. मात्र भोकर-काळेगाव रस्ता प्रकरणात असा बदल अधिकृत प्रक्रियेतून झाला की नाही, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. जर ई-निविदेतील मूळ बाबी कायम असताना ऑफलाईन स्तरावर वेगळे अंदाजपत्रक वापरण्यात आले असेल, तर हा केवळ प्रशासकीय गोंधळ नसून गंभीर स्वरूपाचा विषय ठरू शकतो. त्यामुळे कार्यकारी अभियंता प्रकाश इंगळे यांच्या भूमिकेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**"डांबरीकरणाचा खर्च कोणाच्या खिशात?**

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे डांबरीकरणासाठी असलेली आर्थिक तरतूद. कारण निविदेतील मूळ अंदाजपत्रकात डांबरीकरणाच्या बाबींचा स्पष्ट समावेश असल्याचे दस्तावेज दर्शवितात. जर प्रत्यक्षात त्या बाबी राबविण्यात आल्या नसतील किंवा नंतर अंदाजपत्रकातून वगळण्यात आल्या असतील, तर त्या खर्चाचे काय झाले? तो खर्च कोणाच्या खिशात गेला? याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. याच कारणामुळे या कामाची आर्थिक आणि तांत्रिक अशा दोन्ही पातळ्यांवर स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

**"'बालाजी कन्स्ट्रक्शन'ला काळ्या यादीत टाका**

या संपूर्ण प्रकरणात संबंधित कंत्राटदार संस्था श्री बालाजी कन्स्ट्रक्शन यांना तात्काळ ब्लॅकलिस्ट करण्यात यावे, अशी मागणी तक्रारदार अरविंद पाटील वानखेडे यांनी केली आहे.

तसेच कामाशी संबंधित सर्व कागदपत्रांची तपासणी करून प्रभारी कार्यकारी अभियंता प्रकाश इंगळे आणि कंत्राटदाराविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे.

■ प्रतिनिधी | अकोला ■

भोकर-काळेगाव रस्ता आणि लहान पूल बांधकाम प्रकरणात आता नवीन आणि गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. आधीच दरफुगवटा, तांत्रिक अनियमितता, प्रयोगशाळा चाचण्यांतील कथित विसंगती आणि कामाच्या गुणवत्तेबाबत संशय व्यक्त होत असताना आता या कामासाठी दोन वेगवेगळी अंदाजपत्रके अस्तित्वात असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे हा केवळ निकृष्ट कामाचा विषय नसून कागदोपत्री फेरफार करून सार्वजनिक निधीवर डल्ला मारण्याचा प्रकार तर नाही ना, अशी चर्चा सुरू झाली आहे. प्राप्त कागदपत्रांनुसार ई-निविदेसोबत अपलोड करण्यात आलेल्या मूळ अंदाजपत्रकातील अनुक्रमांक ७, ८ आणि ९ या बाबींमध्ये डांबरीकरणाशी संबंधित कामांचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. याचबरोबर निविदेच्या अटी व शर्तींमध्ये हॉटमिक्स प्लांट आणि सिमेंट कॉंक्रिट प्लांटची अट नमूद करण्यात आली आहे. यावरून कामाचे स्वरूप डांबरी रस्त्याचे असल्याचे स्पष्ट संकेत मिळत असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे.

मात्र याच कामाचे दुसरे ऑफलाईन अंदाजपत्रक आता चर्चेत आले आहे. या अंदाजपत्रकात डांबरीकरणाशी संबंधित बाबींचा उल्लेख टाळण्यात आल्याचे सांगितले जात आहे. परिणामी, मूळ मंजूर कामाचे स्वरूप बदलण्यात आले का? आणि तसे असेल तर त्यासाठी कोणाची मंजुरी घेण्यात आली? हे प्रश्न आता केंद्रस्थानी आले आहेत.

दरम्यान, ई-निविदेतील मूळ अंदाजपत्रक, त्यातील डांबरीकरणाच्या स्पष्ट नोंदी, निविदेतील हॉटमिक्स प्लांटची अट आणि त्याउलट समोर आलेले कथित बदललेले ऑफलाईन अंदाजपत्रक या सर्व बाबी एकाच दिशेने बोट दाखवत आहेत. त्यामुळे आता प्रश्न केवळ रस्त्याच्या गुणवत्तेचा राहिलेला नाही; तर मूळ मंजुरी, अंदाजपत्रकातील बदल आणि निधीच्या वापराबाबत निर्माण झालेल्या संशयाचे निरसन करण्याची जबाबदारी प्रशासनावर येऊन ठेपली आहे.

### तीन प्रश्न; उत्तर मात्र अद्याप नाही!

- ई-निविदेतील अंदाजपत्रकाच्या अनुक्रमांक ७, ८ आणि ९ मध्ये डांबरीकरणाचा स्पष्ट उल्लेख असताना ऑफलाईन अंदाजपत्रकात तो का नाही?
- मंजूर अंदाजपत्रकात बदल करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेण्यात आली होती का?
- डांबरीकरणासाठी असलेल्या आर्थिक तरतुदीचे नेमके काय झाले?

*या प्रश्नांची अधिकृत उत्तरे मिळेपर्यंत भोकर-काळेगाव रस्ता प्रकरणावरील संशय कायम राहणार, हे निश्चित.*

## जागतिक सायकल दिनानिमित्त सायकल रॅली उत्साहात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधिज्ञ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक सायकल दिनानिमित्त ३ जून रोजी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या रॅलीचा शुभारंभ प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष अनिल सुब्रमण्यम यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. जिल्हा व सत्र न्यायालय येथून सुरू झालेली ही रॅली बसस्थानक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पाटणी चौक, अकोला नाका, आर.टी.ओ. कार्यालय मार्गे पुन्हा जिल्हा न्यायालय परिसरात दाखल झाली. सायकलचा वापर वाढवून पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि इंधन बचतीचा संदेश देण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्ही. जी. चौखंडे, राजेश वजिरे, ॲड. अनुप बाकलीवाल, ॲड. परमेश्वर शेळके, ॲड. वैभव तिफणे, युसूफ शेख, ॲड. विजय आरू, राजेश एकाडे, श्री. शर्मा, ॲड. केसवाणी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

# नाव नव्हते, ओळख नव्हती मग एवढा संताप कशासाठी?

## प्रकाशित बातमीनंतर फोनाफोनी, अर्वाच्य भाषेतील कथित वादामुळे नव्या चर्चांना उधाण

■ प्रतिनिधी | अकोला ■



प्रेमजाळं, सत्तेची सावली आणि पैशांचा खेळ; अखेर कोण झाला 'नील'?

उच्चशिक्षित महिलेपासून सुरू झालेली कहाणी पोहोचली राजकीय दालनापर्यंत

अकोला: प्रेम, सत्ता, पैशांचा प्रभाव आणि राजकीय वर्तुळात चर्चेत असलेल्या एका कथित प्रकरणासंदर्भातील वृत्त नुकतेच एका वृत्तपत्रात प्रकाशित झाले. विशेष म्हणजे या वृत्तात कोणत्याही व्यक्तीचे नाव, छायाचित्र अथवा थेट ओळख पटेल असा कोणताही उल्लेख नव्हता. मात्र तरीही या वृत्ताच्या प्रकाशनानंतर एका व्यक्तीने आक्रमक भूमिका घेतल्याची चर्चा आता शहरभर रंगू लागली आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वृत्त प्रकाशित झाल्यानंतर एका कंत्राटदाराने व त्याच्यासोबत असलेल्या एका महिलेने संबंधित वृत्तावरून काही व्यक्तींना फोन करून जाब विचारण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा आहे. यावेळी कथितरित्या अर्वाच्य भाषेचाही वापर करण्यात आल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे **'वृत्तात नाव नसताना एवढी अस्वस्थता का?'** हा प्रश्न आता चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

सदर वृत्तात कोणत्याही व्यक्तीची ओळख उघड करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे सामान्य वाचकांसाठी ते केवळ राजकीय वर्तुळात चर्चेत असलेल्या कथित घडामोडींवरील वृत्त म्हणूनच समोर आले होते. मात्र वृत्त प्रकाशित झाल्यानंतर एका व्यक्तीकडून झालेल्या प्रतिक्रियांमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

जाणकारांच्या मते, एखाद्या वृत्तातील मजकुरावर आक्षेप असल्यास त्यासाठी कायदेशीर पर्याय उपलब्ध असतात. खुलासा मागणे, अधिकृत लेखी भूमिका मांडणे हे पर्याय असताना थेट फोन करून वाद घालण्याची गरज का भासली, याबाबत विविध स्तरावर चर्चा सुरू आहे.

दरम्यान, हे वृत्त सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर त्या व्यक्तीने ते प्रसारित करणाऱ्यांशी संपर्क साधल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे मूळ वृत्तातील मजकुरापेक्षा त्यानंतर घडलेल्या घटनांचीच अधिक चर्चा रंगू लागली आहे.

राजकीय वर्तुळातही या घडामोडींविषयी विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत. **'ज्या वृत्तात नाव नाही, त्या वृत्ताशी काही जणांनी स्वतःचा संबंध का जोडला?'** असा सवाल उपस्थित केला जात आहे. काहींच्या मते, अनपेक्षितपणे दिलेल्या प्रतिक्रियांमुळेच या प्रकरणाकडे अधिक लक्ष वेधले गेले. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकरणात संबंधित व्यक्तींकडून अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेले नाही. तसेच वृत्तातील मजकूर खोटा असल्याचा कोणताही लेखी दावा समोर आला नसल्याची माहिती आहे.

### चर्चेत असलेले प्रश्न


- **वृत्तात कोणाचेही नाव नसताना आक्षेप नेमका कशावर?**
- **कायदेशीर मार्गाऐवजी फोनाफोनीचा मार्ग का स्वीकारला गेला?**
- **सोशल मीडियावर वृत्त व्हायरल झाल्यानंतर काहींची धावपळ का वाढली?**
- **प्रतिक्रियांमुळेच चर्चेला अधिक खतपाणी मिळाले का?**

*या प्रश्नांची उत्तरे अद्याप समोर आलेली नसली तरी नाव नसलेल्या एका वृत्तानंतर घडलेल्या घटनांनी अकोल्याच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात नव्या चर्चांना तोंड फोडल्याचे चित्र आहे.*

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

# नागपूर-पुणे बसची ट्रकला धडक, १५ जखमी

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर आज पहाटे भीषण अपघात घडला. नागपूरहून पुण्याकडे जाणाऱ्या संजय ट्रॅव्हल्सच्या लक्झरी बसने समोर चालणाऱ्या ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने १५ प्रवासी जखमी झाले. यापैकी चालक, वाहक आणि दोन प्रवासी अशा चार जणांची प्रकृती गंभीर असल्याचे समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात आज पहाटे सुमारे ३ वाजताच्या सुमारास शेलूबाजार ते मालेगाव दरम्यान समृद्धी महामार्गावर घडला. नागपूरहून पुण्याकडे प्रवाशांना घेऊन जाणारी संजय ट्रॅव्हल्सची बस समोर चालणाऱ्या ट्रकला पाठीमागून धडकली. धडक इतकी जोरदार होती की बसच्या पुढील भागाचा मोठ्या प्रमाणात चुराडा झाला.

अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि समृद्धी महामार्गाच्या आपत्कालीन मदत पथकाने घटनास्थळी धाव घेतली. बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढून तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आले. तसेच अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या कडेला हलवून महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली. या अपघातात एकूण १५ जण जखमी झाले असून गंभीर जखमी झालेल्यांमध्ये बसचा चालक, वाहक आणि दोन प्रवाशांचा समावेश आहे. सर्व जखमींना रुग्णवाहिकेद्वारे वाशिम आणि अकोला येथील खासगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. गंभीर जखमी असलेल्या चार जणांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून पोलीस अपघाताचा पुढील तपास करीत आहेत.

# संतुलित खतांचा वापर, सेंद्रिय व जैविक शेतीचा प्रसार

### कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचा विशेष उपक्रम

■ प्रतिनिधी | वाशिम ■



भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR), नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या निर्देशानुसार दि. १५ ते ३० मे या कालावधीत वाशिम जिल्ह्यात 'संतुलित खतांचा वापर, सेंद्रिय व जैविक खतांचा प्रसार आणि नैसर्गिक शेतीचा अवलंब' या विषयावर व्यापक जनजागृती व क्षमता विकास अभियान राबविण्यात आले.

या अभियानाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांमध्ये रासायनिक खतांचा संतुलित, कार्यक्षम व शास्त्रशुद्ध वापर वाढविणे, मृदा आरोग्य संवर्धनास चालना देणे, उत्पादन खर्चात बचत करणे, पीक उत्पादकता व गुणवत्ता सुधारणे तसेच सेंद्रिय, जैविक व नैसर्गिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार करून शाश्वत व हवामान-अनुकूल कृषी व्यवस्थेला प्रोत्साहन देणे हा होता.

अभियानादरम्यान वाशिम जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील अनेक गावांमध्ये कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांनी प्रत्यक्ष भेटी देऊन शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम, जनजागृती अभियान, किसान गोष्टी, चर्चासत्रे, शिवार फेऱ्या, तांत्रिक मार्गदर्शन शिबिरे व शेतकरी संवाद कार्यक्रमांचे आयोजन केले. या कार्यक्रमांमध्ये मृदा परीक्षणावर आधारित अन्नद्रव्य व्यवस्थापन, संतुलित खतांचा वापर, एकात्मिक पोषण व्यवस्थापन (INM), जैविक खतांचे महत्त्व, सेंद्रिय खतांचा प्रभावी वापर, नॅनो युरिया व नॅनो डीएपीचा कार्यक्षम वापर, सूक्ष्म अन्नद्रव्य व्यवस्थापन, पीकनिहाय खत शिफारसी, तसेच नैसर्गिक शेतीतील जीवामृत, बीजामृत, आच्छादन (Mulching) आणि वाफसा तंत्रज्ञान याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमांमध्ये शेतकऱ्यांना मृदेची सुपीकता व जैविक सक्रियता टिकवून ठेवण्यासाठी केवळ रासायनिक खतांवर अवलंबून न राहता शेणखत, कंपोस्ट, गांडूळखत, जैविक खते व विविध सेंद्रिय निविष्ठांचा समन्वित वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच मृदा आरोग्य पत्रिकेच्या (Soil Health Card) शिफारशींनुसार खतांचा वापर केल्यास उत्पादन खर्चात बचत होऊन अन्नद्रव्य वापर कार्यक्षमता वाढते, पीक उत्पादनात वाढ होते आणि पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होते, याबाबत शास्त्रीय माहिती देण्यात आली.

अभियानादरम्यान आयोजित शेतकरी संवाद कार्यक्रमांमध्ये शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. काही ठिकाणी संतुलित खत व्यवस्थापन, जैविक खतांचा वापर, नैसर्गिक शेती तंत्रज्ञान आणि मृदा आरोग्य संवर्धन यांवर आधारित प्रक्षेत्रीय प्रात्यक्षिके उभारून प्रत्यक्ष शेतपातळीवर तांत्रिक मार्गदर्शन देण्यात आले.

## मालेगांव तालुका शेतकी खरेदी विक्री संस्थेच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठी प्रतिनिधी ठराव मागविले

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मालेगांव तालुका शेतकी खरेदी विक्री व प्रक्रिया संस्था मर्या., मालेगांव जि. वाशिम या संस्थेच्या संचालक मंडळ निवडणुकीकरीता राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने दि. १ मे २०२६ हा अर्हता दिनांक निश्चित केला असून सभासद संस्थांकडून प्रतिनिधी नियुक्तीचे ठराव मागविण्यात आले आहेत.

संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत भाग घेण्यासाठी तसेच मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी संस्थेच्या पोटनियमातील तरतुदीनुसार अधिकृत प्रतिनिधी नियुक्त करणे आवश्यक आहे. त्यानुसार सभासद संस्थांनी संचालक मंडळाच्या किंवा अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीमध्ये विहित नमुन्यातील प्रतिनिधी निवडीचे ठराव मंजूर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. हे ठराव दि. २७ मे २०२६ ते दि. २९ जून २०२६ या कालावधीत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मालेगांव जि. वाशिम यांचेकडे सादर करावयाचे आहेत. तसेच ठराव प्राप्त झाल्याची पोहोच घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. सभासद संस्थांनी प्रतिनिधी निवडीचे ठराव सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मालेगांव यांच्या कार्यालयात सादर करावेत. संबंधित कार्यालय नवीन तहसील कार्यालय, पहिला मजला, मालेगांव, ता. मालेगांव, जि. वाशिम येथे कार्यरत आहे. ही माहिती जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था जि. पी. साबळे यांनी दिली आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत जिल्ह्यामध्ये राज्यस्तरीय तपासणी पथक दाखल

## सीईओ प्रमिला जाखलेकर यांच्या नेतृत्वात तपासणी सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या ग्रामपंचायतींच्या मूल्यमापन प्रक्रियेचा भाग म्हणून जिल्हा परिषद गोंदिया येथील तपासणी समितीने वाशिम तालुक्यातील शेलू बुद्रुक व जांभरून परांडे या गावांची सविस्तर पाहणी केली.

या तपासणी समितीमध्ये पथक प्रमुख तथा जिल्हा परिषद गोंदियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमिला जाखलेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) मधुकर वासनिक, प्रकल्प संचालक जल जीवन मिशन तथा उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मनरेगा) विजय लोंढे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पवन खंदारे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी निरंजन अग्रवाल, विस्तार अधिकारी (सांख्यिकी) वैशाली खोब्रागडे, तसेच सुरेंद्र टेंबरे व धर्मराज लंजे यांचा समावेश आहे.




समितीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या निकषांनुसार गावातील विविध विकासकामे, स्वच्छता व्यवस्थापन, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संवर्धन, ग्रामविकास उपक्रम तसेच ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय व आर्थिक दस्तऐवजांची बारकाईने तपासणी केली. यावेळी ग्रामपंचायतींनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती समिती सदस्यांना देण्यात आली. ग्रामपंचायत शेलू बुद्रुक येथे ग्रामविकास, स्वच्छता, स्मशानभूमीचे सौंदरीकरण, जलव्यवस्थापन आणि लोकसहभागाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या उपक्रमांची पाहणी करण्यात आली. तसेच ग्रामपंचायत जांभरून परांडे येथे विविध विकासकामे, सार्वजनिक सुविधा व ग्रामस्थांच्या सहभागातून साकारलेले उपक्रम समितीसमोर सादर करण्यात आले. दोन्ही ग्रामपंचायतींमध्ये अभियानाच्या उद्दिष्टांनुसार करण्यात आलेल्या उत्कृष्ट कामकाजाबाबत समितीने समाधान व्यक्त केले. गावातील विकासकामांची गुणवत्ता, ग्रामस्थांचा सहभाग, स्वच्छता व शाश्वत विकासाच्या दिशेने करण्यात आलेल्या प्रयत्नांचे समिती सदस्यांनी कौतुक केले.

या पाहणीदरम्यान वाशिम पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने, विस्तार अधिकारी दीपकसिंग सोळंके, विनय बोरचाटे, उपअभियंता (बांधकाम) श्री. खोडवे, उपअभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) श्री. मार्गे तसेच पंचायत समिती व तालुकास्तरावरील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १८७ ■ गुरुवार, ४ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## 'बाथरूम डील'चा भांडाफोड; लाचखोर नगर परिषद अभियंत्याला न्यायालयीन कोठडी

### दोन लाखांच्या लाचप्रकरणी एसीबीची कारवाई

### 'अजून कोण अडकणार, की सर्व काही डोई...जड होणार' अशी शहरात चर्चा



**वर्धा जनमाध्यम :** नऊ लाख रुपयांचे देयक मंजूर करून देण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात अडकलेला वर्धा नगर परिषदेच्या बांधकाम विभागातील अभियंता संदीप डोईजड याला बुधवारी विशेष सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायाधीश अन्सारी यांनी आरोपीची न्यायालयीन कोठडीत (एमसीआर) रवानगी केली.

माहितीनुसार, एका कंत्राटदाराचे नऊ लाख रुपयांचे बिल मंजूर करण्यासाठी डोईजड याने दोन लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तक्रारीची पडताळणी झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी नगर परिषद कार्यालयात सापळा रचून कारवाई केली. विशेष म्हणजे, लाचेची रक्कम थेट न स्वीकारता कार्यालयालगतच्या बाथरूममध्ये ठेवण्यास सांगण्यात आले होते. तक्रारदाराने एसीबीच्या मार्गदर्शनाखाली रक्कम ठेवल्यानंतर पथकाने आरोपीला ताब्यात घेतले.

या प्रकरणानंतर नगर परिषद वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले आहे. दोन लाख रुपयांची ही रक्कम केवळ एका अधिकाऱ्यासाठी होती की त्यामागे आणखी काही साखळी कार्यरत होती, याबाबत उलटसुलट चर्चा रंगत आहे. त्यामुळे या दोन लाखांच्या लाचखोरीत अजून कोण-कोण अटकणार, की सर्व काही डोई...जड होणार असा प्रश्न आता शहरात उपस्थित केला जात आहे.

एसीबीचा तपास सुरू असून या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, संबंधित कागदपत्रे आणि इतर संभाव्य दुव्यांची कसून चौकशी केली जात आहे. त्यामुळे येत्या काळात या प्रकरणात आणखी काही नावे समोर येतात की तपास एका आरोपीपुरताच मर्यादित राहतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'लालपरी' की भंगारगाडी

# प्रवाशांचा जीव धोक्यात घालणाऱ्या एसटीचा भोंगळ कारभार

### पिंपळखुटाजवळ बस बंद; रखरखत्या उन्हात दोन तास प्रवाशांची फरफट

**'गाडी आधीपासूनच नादुरुस्त होती' ; संतप्त प्रवाशांचा एसटी प्रशासनावर हल्लाबोल**

**आष्टी शहीद जनमाध्यम :** राज्य परिवहन महामंडळाच्या कारभाराचा बोजवारा उडाल्याचे आणखी एक उदाहरण वर्धा–मोर्शी मार्गावर समोर आले. वर्धाहून मोर्शीकडे निघालेली तळेगाव शा. प. आगाराची एमएच-०६ एस-८२४८ क्रमांकाची एसटी बस आर्वी तालुक्यातील पिंपळखुटा गावाजवळ अचानक बंद पडल्याने सुमारे पन्नास प्रवाशांना भर उन्हात तब्बल दोन तास रस्त्यावर खितपत पडावे लागले. ऐन दुपारच्या कडक उन्हात महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि लहान मुलांचे अक्षरशः हाल झाले.

बसमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यानंतर चालक व वाहकांकडून कोणतीही तातडीची पर्यायी व्यवस्था करण्यात आली नाही. परिणामी प्रवाशांचा संताप अनावर झाला. अनेकांची शासकीय कामे, वैद्यकीय भेटी आणि महत्त्वाचे नियोजित कार्यक्रम खोळंबले. मागून दुसरी बसही वेळेत न आल्याने प्रवाशांनी एसटी प्रशासनाच्या निष्काळजीपणावर संताप व्यक्त केला.



विशेष म्हणजे, बस बंद पडल्यानंतर ती आधीपासूनच दुरुस्तीची असल्याची चर्चा घटनास्थळी रंगली. त्यामुळे नादुरुस्त वाहन प्रवाशांच्या जीवावर बेतू शकते हे माहीत असतानाही ती रस्त्यावर धाडण्याचा निर्णय कोणी घेतला, असा सवाल उपस्थित होत आहे.

महसूल सेवक ज्ञानेश्वर चव्हाण यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना सांगितले, गाडी आधीपासूनच दुरुस्तीची असल्याचे मेकॅनिकने सांगितल्याची माहिती मिळाली. मग अशा गाडीत प्रवाशांना बसवून रस्त्यावर सोडण्याचे धाडस प्रशासन कसे करते प्रवाशांचा जीव इतका स्वस्त झाला आहे का

राज्याच्या कानाकोपऱ्यात सेवा देणारी 'लालपरी' आज स्वतःच उपचाराच्या प्रतीक्षेत असल्याचे चित्र आहे. वारंवार बिघाड, रखडलेला प्रवास आणि प्रवाशांची होणारी फरफट यामुळे एसटी महामंडळाच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

## थेंबासाठी जनता हवालदिल; शेकडो लिटर पाणी रस्त्यावर

### -वॉल्वची चाबी तुटली अन् पिण्यायोग्य पाण्याचा अक्षरशः 'महापूर'; प्रशासनाच्या निष्काळजीपणावर बोट

**वर्धा जनमाध्यम :** एका बाजूला ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी नागरिकांची पायपीट सुरू असताना, दुसऱ्या बाजूला वर्धा शहरातील सिव्हील लाईन परिसरात शेकडो लिटर पिण्यायोग्य पाणी रस्त्यावर वाहून जाऊन प्रशासनाच्या कारभाराचे वाभाडे निघाले. जुन्या नगर पालिका इमारत परिसरातील मुख्य जलवाहिनीच्या वॉल्वची चाबी बुधवारी दुपारी अचानक तुटल्याने पाण्याचा प्रचंड प्रवाह रस्त्यावर उसळला आणि काही वेळातच परिसर जलमय झाला.

पिण्यासाठी वापरले जाणारे स्वच्छ पाणी रस्त्यावरून वाहत गटारात जात असल्याचे चित्र पाहून नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. अनेक भागांत पाणीटंचाईची समस्या कायम असताना देखभाल-दुरुस्तीतील हलगर्जीपणामुळे मौल्यवान पाण्याची अशी उधळपट्टी होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला.



घटनेची माहिती मिळताच संबंधित कर्मचाऱ्यांनी धाव घेत गळती नियंत्रणात आणली. मात्र, तोपर्यंत शेकडो लिटर पाणी वाया गेले होते. 'पाणी वाचवा'च्या घोषणा करणाऱ्या प्रशासनालाच स्वतःच्या यंत्रणेतील त्रुटी रोखता येत नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी संघर्ष करणाऱ्या जनतेसमोर हा प्रकार प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे जिवंत उदाहरण ठरत आहे.

## बोरची कोअर सफारी १ जुलैपासून बंद; पर्यटकांची शेवटच्या फेऱ्यांसाठी गर्दी

**वर्धा जनमाध्यम :** विदर्भातील निसर्गप्रेमी आणि वन्यजीव पर्यटकांचे आकर्षण ठरलेल्या बोर व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्रातील जंगल सफारीला १ जुलैपासून मान्सूनमुळे ब्रेक लागणार आहे. त्यामुळे पर्यटकांनी शेवटच्या सफारीसाठी मोठी गर्दी केली असून वाघांच्या दर्शनासाठी उत्सुकता वाढली आहे.


सेलू तालुक्यातील बोर व्याघ्र प्रकल्प सध्या बीटीआर-३ 'कॅटरिना' वाघीण आणि तिच्या पिलांच्या दर्शनामुळे विशेष चर्चेत आहे. २०१४ मध्ये व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा मिळालेल्या बोरचे कोअर क्षेत्र १३ हजार ८०० हेक्टर तर बफर क्षेत्र ६७ हजार ८१४ हेक्टरपेक्षा अधिक आहे. सुरुवातीला देशातील सर्वात छोटा व्याघ्र प्रकल्प म्हणून ओळख असलेल्या बोरची व्याप्ती बफर क्षेत्राच्या विस्तारामुळे वाढली आहे.

२०२४-२५ च्या व्याघ्र गणनेनुसार बोरमध्ये १४ वाघ, सुमारे ६४ बिबट, ४० हून अधिक अस्वल तसेच विविध वन्यप्राणी आढळून आले आहेत. वाईल्ड लाईफ इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार या १४ वाघांपैकी सात वाघ कोअर तर सात वाघ बफर क्षेत्रात वास्तव्यास आहेत. दरम्यान, कोअर क्षेत्रातील सफारी १ जुलैपासून बंद होणार असली तरी बफर क्षेत्रातील जंगल सफारी वर्षभर सुरू राहणार असल्याने वन्यजीव प्रेमींना बोरच्या जंगलाचा अनुभव घेण्याची संधी कायम उपलब्ध राहणार आहे.

## ऐन उन्हात डिपीचा भडका

## ऑइल गळतीमुळे निर्मल बेकरी चौकात खळबळ; अग्निशमन दलाच्या तत्परतेने अनर्थ टळला

**वर्धा जनमाध्यम :** वाढत्या तापमानाचा फटका आता वीज यंत्रणेलाही बसू लागल्याचे चित्र बुधवारी शहरात पाहायला मिळाले. मुख्य मार्गावरील निर्मल बेकरी चौकातील महावितरणच्या वीज वितरण ट्रान्सफॉर्मरने (डिपी) अचानक पेट घेतल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. ही घटना बुधवारी सायंकाळी चार वाजताच्या सुमारास घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, निर्मल बेकरी चौकातील रस्त्यालगत असलेल्या डिपीतून अचानक ऑइल गळती सुरू झाली. काही क्षणांतच गळती झालेल्या ऑइलने पेट घेतल्याने डिपीतून धूर व ज्वाळा बाहेर पडू लागल्या. चौकातील व्यावसायिक आणि नागरिकांच्या लक्षात हा प्रकार येताच त्यांनी तातडीने महावितरणला माहिती दिली.

घटनेची गंभीरता लक्षात घेऊन महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ वीजपुरवठा बंद केला. त्यानंतर पालिकेच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणली. कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला, अन्यथा चौकातील दुकाने आणि नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता होती.

या घटनेमुळे परिसरातील वीजपुरवठा काही काळ खंडित झाला. उन्हाच्या तीव्रतेमुळे वीज यंत्रणेवर वाढत असलेल्या ताणाची ही घटना गंभीर सूचना मानली जात असून, शहरातील जुन्या डिपींची तातडीने तपासणी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## देवळीत 'विषारी' कमाईचा धंदा एक्सपायरी खाद्यपदार्थांची खुलेआम विक्री

### लहान मुलांच्या आरोग्याशी खेळ; अन्न सुरक्षा विभाग झोपेत, दुकानदारांची मनमानी तेजीत

**देवळी जनमाध्यम :** देवळी शहरात कालबाह्य पॅकेटबंद खाद्यपदार्थांची सर्रास विक्री सुरू असून लहान मुलांच्या आरोग्याशी थेट खेळ सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आलू चिप्स, टकाटकसह विविध कंपन्यांचे पॅकेटबंद खाद्यपदार्थ एक्सपायरी तारीख उलटल्यानंतरही दुकानांसमोर खुलेआम विक्रीसाठी टांगले जात आहेत. मात्र याकडे दुकानदारांसह संबंधित प्रशासनाचेही दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

पॅकेटबंद खाद्यपदार्थांचे प्रमुख ग्राहक शालेय विद्यार्थी आणि लहान मुले असतात. आकर्षक पॅकिंग आणि चटकदार चवीमुळे मुले हे पदार्थ मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. मात्र विक्रीपूर्वी उत्पादनाची मुदत

**मार्चमध्ये कालबाह्य झालेल्या चिप्सची विक्री उघड; प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

तपासण्याची जबाबदारी असलेल्या दुकानदारांकडून नियमांना केराची टोपली दाखविली जात असल्याचा आरोप होत आहे. कालबाह्य खाद्यपदार्थांच्या सेवनामुळे अन्नविषबाधा, पचनाचे विकार आणि इतर गंभीर आरोग्य



समस्या उद्भवू शकतात, असा इशारा आरोग्य तज्ज्ञांकडून दिला जातो.दरम्यान, वैनगंगा बँक परिसरातील एका दुकानातून ग्राहकाने खरेदी केलेल्या चिप्सच्या पॅकेटवरील एक्सपायरी तारीख मार्च २०२६ मध्येच संपल्याचे आढळून आले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर शहरातील ग्राहक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

शहरात अन्न सुरक्षा नियमांचे पालन होते की नाही, कालबाह्य वस्तूंची तपासणी नेमकी कोण करणार, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. अन्न व औषध प्रशासनाने तातडीने विशेष तपासणी मोहीम राबवून दोषी दुकानदारांवर कठोर कारवाई करावी आणि कालबाह्य खाद्यपदार्थ जप्त करावेत, अशी जोरदार मागणी होत आहे. नफेखोरीसाठी नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांवर लगाम कधी लागणार, हा खरा प्रश्न आहे.

## टायर फुटला अन् डिझेल टँकर पलटी; बोथुडा फाट्यावर खळबळ

**समुद्रपूर जनमाध्यम :** सेवाग्राम–शेडगाव चौक मार्गावरील अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसतानाच बुधवारी बोथुडा फाट्याजवळ डिझेलने भरलेला टँकर पलटी झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. टँकरमध्ये मोठ्या प्रमाणात ज्वलनशील डिझेल असल्याने संभाव्य स्फोटाची भीती निर्माण झाली होती. मात्र सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातवरून चंद्रपूर जिल्ह्यातील आलापल्लीकडे डिझेल घेऊन जाणारा एनएल-०१ एजे-०४०१ क्रमांकाचा टँकर बुधवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास बोथुडा फाट्याजवळील बसस्थानक परिसरात आला असता त्याचा मागील टायर अचानक फुटला. त्यामुळे चालकाचा वाहनावरील ताबा सुटून टँकर रस्त्यावर पलटी झाला. घटनेची माहिती मिळताच बोथुडा येथील पोलीस पाटील गोपाल किरपाल यांनी तातडीने हिंगणघाट पोलिसांना कळविले. पोलिस उपनिरीक्षक सोनकुसरे, दिलीप पवार, कुंभरे, किशोर गाडेवा आणि स्वप्नील निखुरे यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. टँकर पलटी झाल्याची वार्ता पसरताच परिसरात बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.

या अपघातात चालक व क्लिनर किरकोळ जखमी झाले. दरम्यान, सेवाग्राम ते शेडगाव मार्गावर रस्ता खचणे, मोठमोठे खड्डे आणि निकृष्ट देखभाल यामुळे अपघातांचे प्रमाण वाढल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. प्रशासनाने तातडीने या धोकादायक मार्गाची दुरुस्ती करावी, अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे.


### नावात बदल

माझे पूर्वी लिव्हिंग वरील **SAFIA BEGUM SK. GULAB** असे नाव होते. माझ्या आधार पॅन कार्ड वरील **SOFIYABI SHEKH CHAND** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता: विठ्ठल मंदिर वॉर्ड
हिंगणघाट जिल्हा
वर्धा ४४२३०१



### जाहीर सूचना

माझे पती कपिल सुरेश बावणे याचे दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे दूचाकी वाहन क्रमांक MH32AY0650 हा आहेत. (नाते पत्नी ) माझे नाव प्रिती कपिल बावणे वय (३३) रा. खैरी (कामठी) पो. खासार्खेडा ता. सेलु जि. वर्धा हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

**आपली नम्र**
**प्रिती कपिल बावणे -**
रा. खैरी (कामठी) पो. खासार्खेडा, ता. सेलु जि. वर्धा - ७५०७०६७०९४


## तहानलेल्या प्रवाशांसाठी माणुसकीचा झरा; सेवाग्राम स्टेशनवर कायस्थ समाजाची शीतल जलसेवा

**वर्धा जनमाध्यम :** उन्हाच्या कडाक्यात रेल्वे प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांच्या तहानेची जाणीव ठेवत कायस्थ समाजाने सेवाग्राम रेल्वे स्थानकावर शीतल जलसेवेचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावाचे दर्शन घडविणाऱ्या या उपक्रमामुळे जनरल डब्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळत आहे.

२ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेली ही सेवा ३० जूनपर्यंत चालणार असल्याची माहिती सौ. कामना श्रीवास्तव यांनी दिली. दुपारच्या वेळेत स्थानकावर येणाऱ्या गाड्यांतील अनारक्षित डब्यांमधील प्रवाशांना थंड पाण्याची सुविधा सहज उपलब्ध होत नसल्याने अनेकांना त्रास सहन करावा लागत होता. ही गरज ओळखून कायस्थ समाजाने पुढाकार घेत शीतल जलसेवा सुरू केली.



उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी स्थानक व्यवस्थापक बी. पी. दुबे, वाणिज्य निरीक्षक मिश्राजी, उपनिरीक्षक जाधव तसेच रेल्वे कर्मचारी उपस्थित होते. कायस्थ समाजाचे आलोक श्रीवास्तव, रितेश श्रीवास्तव, मोनू श्रीवास्तव व पायल श्रीवास्तव यांनीही सेवाकार्यात सहभाग घेतला.

या उपक्रमासाठी मंडल रेल्वे व्यवस्थापक गर्ग व वरिष्ठ मंडल वाणिज्य व्यवस्थापक मित्तल यांचे सहकार्य लाभले. स्थानकावरील स्वच्छता कर्मचाऱ्यांनीही शारीरिक श्रमातून मोलाची साथ दिली. वाढत्या उष्णतेत प्रवाशांच्या सेवेसाठी उभा राहिलेला हा माणुसकीचा झरा अनेकांसाठी दिलासादायक ठरत आहे.


### जाहीरनामा

ज्याअर्थी, विधि व न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांधी दिनांक ११/०८/२०२३ ची अधिसूचना अन्वये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, ज्या जन्म व मृत्यूच्या नोंदणीबाबत १ वर्षापेक्षा अधिक कालावधीने सूचना प्राप्त होते, अशा प्रकरणात नोंदी घेण्यासाठी कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, अशा कार्यक्षेत्रासाठी ज्या ठिकाणी अशा व्यक्तीचा जन्म व मृत्यू झाला आहे, त्याबाबतच्या अचूकतेबाबत खात्री करुन विलंब शुल्क आकारुन अशा नोंदी घेण्याबाबत आदेशित करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्म-मृत्यू घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यू यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: जमृनों २५२५/ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दिनांक १२ मार्च, २०२५ मध्ये जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंदीबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे.

ज्याअर्थी, श्री. कुंदन मधुकर जाधव, रा. हिवरा तांडा ता. आर्वी जि. वर्धा यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, हिवरा (रा.) येथे उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या जन्म-मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र, जन्माचे पुरावे , शैक्षणिक पुरावे, रहीवासाचे पुरावे, मालमत्तेचे पुरावे, ओळखीबाबतचे पुरावे व कौटुंबिक पुराव्यासह सचिव तथा जन्म-मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, हिवरा (रा.) ता.आर्वी जि. वर्धा यांनी या कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.

त्याअर्थी, श्री. कुंदन मधुकर जाधव, रा. हिवरा तांडा ता.आर्वी जि. वर्धा यांच्या विलंबाने जन्माच्या नोंदीबाबत कोणाचे काही आक्षेप / हरकती असल्यास त्या सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत (विहीत मुदतीत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळी लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीनंतर आक्षेप / हरकतींचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**(हरीश काळे)**
**तहसिलदार, आर्वी**



### जाहीरनामा

ज्याअर्थी, विधि व न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची दिनांक ११/०८/२०२३ ची अधिसूचना अन्वये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, ज्या जन्म व मृत्यूच्या नोंदणीबाबत १ वर्षापेक्षा अधिक कालावधीने सूचना प्राप्त होते, अशा प्रकरणात नोंदी घेण्यासाठी कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, अशा कार्यक्षेत्रासाठी ज्या ठिकाणी अशा व्यक्तीचा जन्म व मृत्यू झाला आहे, त्याबाबतच्या अचूकतेबाबत खात्री करुन विलंब शुल्क आकारुन अशा नोंदी घेण्याबाबत आदेशित करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्म-मृत्यू घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यू यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: जमृनों २५२५/ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दिनांक १२ मार्च, २०२५ मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंदीबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे.

ज्याअर्थी, श्री. कुणाल मधुकर जाधव, रा. हिवरा तांडा ता. आर्वी जि. वर्धा यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, हिवरा (रा.) येथे उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या जन्म-मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र, जन्माचे पुरावे , शैक्षणिक पुरावे, रहीवासाचे पुरावे, मालमत्तेचे पुरावे, ओळखीबाबतचे पुरावे व कौटुंबिक पुराव्यासह सचिव तथा जन्म-मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, हिवरा (रा.) ता.आर्वी जि. वर्धा यांनी या कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.

त्याअर्थी, श्री. कुणाल मधुकर जाधव, रा. हिवरा तांडा ता.आर्वी जि. वर्धा यांच्या विलंबाने जन्माच्या नोंदीबाबत कोणाचे काही आक्षेप / हरकती असल्यास त्या सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत (विहीत मुदतीत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळी लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीनंतर आक्षेप / हरकतींचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**(हरीश काळे)**
**तहसिलदार, आर्वी**

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# भविष्यातील ‘ब्रेन गेन’

भारत-अमेरिका संबंधांमधील तणाव रुबिओ यांच्या दौऱ्यानंतर काहीसा निवळल्याचे संकेत मिळत आहेत. आर्थिक वर्ष २०२६ साठी भारतातील अर्जदारांना ‘ईबी-२’ व्हिसाचा कोटा पूर्णपणे संपल्याची घोषणा अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने केली असली तरी ग्रीन कार्डच्या नियमांबाबत वादग्रस्त परिपत्रकावर अमेरिकेच्या गृहमंत्रालयाने स्पष्टीकरण देत भारतीय व्यावसायिकांना मायदेशी परतावे लागणार नसल्याचा मोठा दिलासा दिला. अमेरिकेत राहूनच ग्रीन कार्ड मिळवण्यासाठी केल्या जाणाऱ्या ॲडजस्टमेंट ऑफ स्टेटस प्रक्रियेचे नियम अधिक कडक केले होते. यामुळे अमेरिकेत एच-१ बी व्हिसावर काम करणाऱ्या भारतीय आयटी व्यावसायिकांमध्ये घबराटीचे वातावरण होते. सर्वांनाच ग्रीन कार्डसाठी अमेरिका सोडून भारतात परतावे लागेल आणि तेथूनच पुढील अर्ज करावा लागेल, असा या नियमांचा अर्थ काढण्यात आला होता. आधीच ग्रीन कार्डसाठी दशकांची प्रतीक्षा आणि त्यात थेट देश सोडण्याची टांगती तलवार यामुळे अमेरिकेतील भारतीय समुदाय चिंतेत होता. पण या निर्णयाला वाढता विरोध पाहता अमेरिकेच्या गृहमंत्रालयाने हा निर्णय बदलला. आता प्रत्येक अर्जाची वैयक्तिक पातळीवर तपासणी होणार असल्याने कायदेशीर मार्गाने राहणाऱ्या अर्जदारांना घाबरण्याचे कारण नाही. पण, या प्रकरणाने अमेरिकेची दुटप्पी भूमिका पुन्हा समोर आली. या वादादरम्यान ‘इंडियास्पोरा’ या संस्थेने मांडलेली आकडेवारी डोळे उघडणारी आहे. भारतीय समुदाय अमेरिकेच्या एकूण लोकसंख्येच्या केवळ दीड टक्के असला, तरी त्यांचा अमेरिकेच्या एकूण फेडरल टॅक्समधील हिस्सा ६ टक्के इतका प्रचंड आहे. अमेरिकेतील ६० टक्के हॉटेल्स भारतीयांच्या मालकीची असून त्यातून ४० लाख नोकऱ्या निर्माण होतात. सिलिकॉन व्हॅलीतील तंत्रज्ञानाचा पाया भारतीय बुद्धिमत्तेवर उभा आहे. असे असतानाही अमेरिकन प्रशासनाकडून जाचक परिपत्रके काढून भारतीयांची छळवणूक केली जात आहे. ट्रम्प यांच्या कार्यकाळाने तर अमेरिकेची स्थलांतरितांविषयीची द्वेषमूलक भूमिका अधिक स्पष्ट झाली. अनेक दशकांपासून अमेरिकेत जाऊन स्थायिक होणे हे भारतातील तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिकांचे अंतिम ध्येय राहिले आहे. उच्च वेतन, अत्याधुनिक नवसंशोधनाची उपलब्धता आणि कायमस्वरूपी नागरिकत्व मिळवण्याची संधी यामुळे अनेक पिढ्या अमेरिकेकडे आकर्षित झाल्या. मात्र, सध्या ग्रीन कार्डसाठीचा प्रदीर्घ प्रलंबित काळ, व्हिसाबाबतची अनिश्चितता आणि मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात यांमुळे हे ‘ड्रीम अमेरिका’ धूसर होऊ लागले आहे. ही नव्या उमेदीने भरारी घेणाऱ्या भारतासाठी संकटात दडलेली संधी आहे. गेल्या दशकभरात भारताचे तंत्रज्ञान क्षेत्र केवळ कमी खर्चात काम करणारे केंद्र न राहता उच्च दर्जाचे कौशल्य केंद्र बनले. भारत आता कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रॉडक्ट इंजिनिअरिंग, ग्लोबल कपॅबिलिटी सेंटर्स आणि डीप टेक नवसंशोधनाचे एक मोठे केंद्र म्हणून पुढे येत आहे. अधिकाधिक भारतीय व्यावसायिकांनी अमेरिकेच्या आकर्षणापोटी आणखी प्रतीक्षा न करण्याचा निर्णय घेतला, तर त्यांच्या पुनरागमनार्थ भारतात पुरेशा नोकऱ्या, भांडवल आणि आवश्यक परिसंस्था उपलब्ध करून देण्याबाबत केंद्र सरकार सकारात्मक प्रयत्न करत आहे. अमेरिका जगातील सर्वात मोठी तंत्रज्ञान बाजारपेठ आहे आणि तिथे मिळणारे वेतन इतर देशांच्या तुलनेत जास्त आहे. परंतु, तिथे भारतीयांना ज्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे, त्याकडे आता दुर्लक्ष करणे कठीण झाले आहे. ‘एच-वनबी’ व्हिसाधारक आणि ग्रीन कार्डच्या प्रतीक्षेत असलेल्यांमध्येही भारतीयच सर्वाधिक आहेत. विविध अहवालानुसार, १० लाखांहून अधिक भारतीय नागरिक अजूनही ग्रीन कार्डच्या प्रतीक्षेत आहेत आणि काही श्रेणींमध्ये हा प्रतीक्षा कालावधी अनेक दशकांचा आहे. अशा स्थितीत अनेक व्यावसायिकांसाठी आता प्रश्न पगाराचा नसून भविष्यातील स्थैर्याचा आहे. विशीत अमेरिकेत गेलेले तरुण चाळीशीत आले तरीही कायमस्वरूपी नागरिकत्वाच्या प्रतीक्षेत आहेत. यामुळे त्यांच्या करिअरमधील प्रगती, उद्योग सुरू करण्याची महत्त्वाकांक्षा आणि कुटुंबाचे दीर्घकालीन नियोजन यावर मर्यादा येत आहेत. वेळोवेळी होणारी कर्मचारी कपात आणि स्थलांतर धोरणांतील अनिश्चितता यामुळे ही परिस्थिती आणखीनच क्लिष्ट झाली आहे. पाश्चात्त्य देशांत राहण्याचा वाढता खर्च आणि आर्थिक अस्थिरता यामुळे परदेशातील आकर्षणात घट झाली आहे. केंद्र सरकारने या स्थितीचा लाभ उठवण्यासाठी धोरणात्मक पावले टाकण्याची गरज आहे. गेल्या दशकभरात भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्रात संरचनेत मोठे बदल झाले. भारतात विशेष आणि दर्जेदार कौशल्यांची मागणी सातत्याने वाढत आहे. सर्व जागतिक कंपन्यांसाठी भारत उच्च कुशल प्रतिभेचे केंद्र बनला आहे. अनेक जागतिक कंपन्यांनी भारतात त्यांची क्लाऊड आणि एआय उत्पादन केंद्रे तसेच जागतिक संशोधन आणि विकास केंद्रे स्थापन केली आहेत. जागतिक क्षमता केंद्रांमध्ये मध्यम ते वरिष्ठ पातळीवरील व्यावसायिकांची मागणी वाढली आहे. ही मागणी प्रामुख्याने उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये जास्त आहे. सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा इंजिनिअरिंग आणि सायबर सुरक्षेमध्ये ४० ते ५५ टक्के कौशल्यवानांची कमतरता आहे. परदेशातून परतणाऱ्या व्यावसायिकांना कंपन्यांमध्ये धोरणात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि नवीन क्षमता विकसित करण्यासाठी प्रमुख पदांवर नियुक्त केले जात आहे. मुंबई, बंगळूर, पुणे, हैदराबाद आणि दिल्ली या महानगरांमध्ये आता जागतिक दर्जाच्या सुविधा, उत्तम पायाभूत सुविधा आणि बहुसांस्कृतिक जीवनशैली उपलब्ध आहे. ‘ऑब्झर्व्हर रिसर्च फाऊंडेशन’ या थिंक टँकच्या विश्लेषणानुसार, २०१६ ते २०२३ या काळात भारतात सुरू झालेल्या सुमारे ६०० हाय टेक स्टार्टअप्सपैकी जवळपास एक तृतीयांश स्टार्टअप्स हे परदेशातून परतलेल्या उद्योजकांनी सुरू केले आहेत. भारतीय प्रतिभावंतांच्या कौशल्याचा आणि भांडवलाचा देशहितासाठी पूर्ण क्षमतेने उपयोग करून घेण्यासाठी आणि हा प्रवाह अधिक गतिमान करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांना ठोस पावले उचलावी लागतील. चीन आणि तैवान यांनी देशातील बुद्धिवंतांना परत आणण्यासाठी विशेष योजना राबवल्या होत्या, त्या धर्तीवर भारतालाही निश्चित पावले उचलता येतील. त्या दिशेने गांभीर्यपूर्वक विचार झाल्यास हा ‘ब्रेन ड्रेन’ भविष्यात ‘ब्रेन गेन’मध्ये बदलू शकतो.

# राज्यात सत्ताधाऱ्यांनी २४ हजार कोटी रुपये कोणासाठी उडवले?

✍ किशोर जामदार

‘अब की बार, चारसो पार’ चा नारा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजप ने दिला. तसेही त्यांना ‘अब की बार’चे आकर्षण फार. पण यावेळी २००४ च्या ‘इंडिया शायनिंग’ च्या अति आत्मविश्वासाचीच पुनरावृत्ती २० वर्षांनी झाली. आणि ‘चारसो पार’ तर दूरच, पण स्पष्ट बहुमतही भाजपला मिळवता आले नाही. अर्थात विरोधकांच्या नाकर्तेपणामुळे २००४ सारखे आघाडी सरकार देखील विरोधकांना बनवता आले नाही. हे भाजपच्या पथ्यावर पडले, नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू या दोन कुबड्या घेऊन मोदी कसेतरी पुन्हा सत्तेत आले.

पण लोकसभेपाठोपाठ महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक होती. महाराष्ट्रात महायुती लोकसभेच्या निकालात महाराष्ट्रातील ४८ पैकी २०१९ सारख्या ४१ नव्हे, अवघ्या १७ जागांवर घसरली आणि भाजप स्वतःतर २३ वरून ९ जागांवर आली. या निवडणुकीत २८८ पैकी सुमारे १५० विधानसभा क्षेत्रात महायुती पिछाडीवर होती. तेव्हा राज्यात पुन्हा सत्तेत येण्यासाठी त्यांना जादूच्या कांडीची आवश्यकता होती. ती त्यांना मध्यप्रदेशाच्या ‘मामाजीं’च्या अनुभवातून सापडली. ‘लाडली बहना’ या योजनेच्या कृपेने शिवराज सिंह चौहान ऊर्फ ‘मामाजी’ यांनी मध्य प्रदेशात पक्षाला विजय मिळवून दिला होता. त्या ‘लाडली बहना’चे मराठीकरण करून घाईगर्दीने ही योजना लागू करण्यात आली. अर्ज भरणाऱ्यांपेक्षा ते स्वीकारणाऱ्यांचीच खरी कसरत होती. कारण निर्णय होईपर्यंत जून महिन्याचा अखेर उजाडला.

नोव्हेंबर मध्ये निवडणूक, तेव्हा किमान चारपाच महीने तरी ही योजना राबवली जाणे – ‘बहिणीं’ना पैसेवाटप होत राहाणे आवश्यक होते. त्यामुळे जो अर्ज आला, त्याची कुठलीही छाननी न करता पैसे खात्यात जमा करायचे होते. अर्ज घेण्यास उशीर झाला तरी पूर्वलक्ष्यी प्रभावाने १ जुलै २०२४ पासून प्रत्येकाच्या खात्यात पैसे जमा होऊ लागले. छाननी झाली नसल्याने काही हुशार भावांना देखील ओवाळणी देण्यात आली. पूर्वी आपण ऐकत होतो, की उमेदवार पैसे वाटून मते मागतात. पण निदान उमेदवार आपल्या कमाईतून ते वाटत असे. आता तर चक्क सरकारी तिजोरीतून पैसे वाटून मतांची बेगमी करण्याचा हा राजमार्ग झाला. पुढे इतर राज्यांतही हाच प्रयोग करण्यात आला.

या जादूच्या प्रभावाने निवडणूक जिंकून सत्तेत स्थिरस्थावर झाल्यानंतर अर्जाची छाननी करण्याची फुरसत मिळाली, तेव्हा कुठे गैरप्रकार लक्षात येऊ लागले. आणि आता म्हणजे सुमारे दोन वर्ष लोटल्यावर सरकारच्या लक्षात येते, की आपण पैसे देत असलेल्यांतले एक तृतीयांश लोक यास पात्रच नाहीत. तेव्हा मार्च २०२६ पासून त्यांना पैसे देणे बंद केले; अशी बातमी आहे. त्यामुळे ‘राज्य सरकारचे दरमहा १२०० कोटी रुपये वाचणार’ असाही




**लाडकी बहीण योजना अपात्र लोकांसाठी राबवली गेल्याचा साक्षात्कार आता होतो आहे... यापैकी किती टक्के ‘बहिणीं’नी लाडक्या झालो म्हणून सत्ताधारी पक्षालाच मते दिली असतील?**

उल्लेख या बातमीत आहे. पण म्हणजेच १ जुलै २०२४ ते फेब्रुवारी २०२६ पर्यन्त अर्थात वीस महीने या लोकांना योजनेस पात्र नसतांना हे पैसे दिले गेले; त्याचं काय? वीस महिन्याचे दरमहा १२०० कोटी प्रमाणे २४००० कोटी रुपये ११ लाख कोटींच्या कर्जात दाबलेल्या सरकारी तिजोरीतून असेच वाटले गेले.

महाराष्ट्रातील मतदारांची संख्या ९ कोटींच्या आसपास आहे. या योजनेचे आमिष दाखवून २.४७ कोटी मतदारांना प्रभावित केले गेले. म्हणजे २५ टक्क्याहून अधिक मतदारांना आमिष दिले गेले. त्यातले हे आज रद्द झालेले ८१ लाख म्हणजे साधारण ९ टक्के मतदार आहेत. निवडून येणाऱ्या जागांवर एक दोन टक्क्यांनीही लक्षणीय परिणाम होतो. इथे तर ही टक्केवारी २५ टक्क्यांपर्यंत गेलेली दिसते. म्हणजे ही निवडणूक किती निष्पक्ष होती? पण हे ठरवायला निवडणूक आयोग किती निष्पक्ष आहे, तेही पाहावं लागेल.

मुळात फुकट वाटप योजना आणि लोककल्याणकारी योजना, यातला फरकच आज पद्धतशीरपणे सर्वच पक्षांकडून मिटवला जातो आहे. त्यांनी १५०० देऊ केले, हे चूक आहे; असे न म्हणता, विरोधी पक्ष ‘आम्ही त्याहून अधिक देतो,’ असे म्हणताना दिसताहेत; ही आपली शोकांतिका.

लोककल्याणकारी योजना या खासकरून सामाजिक आर्थिक दृष्ट्या वंचित राहिलेल्या वर्गांच्या कल्याणासाठी राबवायच्या असतात. म्हणजे शिक्षण, स्वास्थ्य, रोजगार वगैरे. पण आपल्याकडे फुकट वीज, फुकट बस प्रवास, फुकट धान्य यावर सर्वच पक्षांचा जोर दिसतो. यातून कोणाचे आणि काय कल्याण होणार? त्याचा खर्च सरकारी तिजोरीतून होणार. त्या तिजोरीत पैसे येण्याचा स्त्रोत कोणता? तर लोकांकडून जमा होणारा कर, हा तो स्त्रोत होय.

रोजगार हमी योजना सुरू करताना वि. स. पागे यांनी, ज्यांच्याकरिता ती योजना आहे, त्यांच्यापेक्षा वरच्या उत्पन्न गटाकडून व्यवसाय कर घेऊन सदर योजनेसाठी पैसा उभा केला होता. पण आज राज्य सरकारच्या तिजोरीत येणारा पैसा हा अप्रत्यक्ष करातून येतो. म्हणजे ‘जीएसटी’तून. हा कर ज्यांच्यासाठी म्हणून ही योजना आहे, त्यांच्याच खिशातून काढला जाणार. म्हणजे लाडक्या बहिणींना ओवाळणी देण्याकरता लाडक्या भाऊजींच्या पाकिटातून आणि दोडक्या बहिणींच्या पर्समधूनच पैसे काढावे लागणार.

अशा योजना लोकांना प्रभावित करू शकतात कारण लोकांनाच त्याच्यामागचे राजकारण वा अर्थशास्त्र याकडे डोळेझाक करून जे फुकट मिळेल, ते लुबाडून घेण्याचा हव्यास आहे. म्हणजे केवळ राजकारण्यांकडे बोट दाखवून चालणार नाही. तीन बोटे आपल्याकडेही वळलेली आहेत, हे ध्यानात घ्यायला लागेल.

# काँग्रेसचे पुनरुत्थान?



✍ सुनील तांबे

पी. व्ही.नरसिंह राव देशाचे पंतप्रधान आणि काँग्रेसचे अध्यक्ष होते.हा काळ जेमतेम चार वर्षांचा होता. या काळात काँग्रेस पक्षामध्ये नेहरू-गांधी कुटुंबातील कोणतीही व्यक्ती सक्रीय नव्हती. मात्र नंतर पी. व्ही. नरसिंह राव यांच्या विरोधात काँग्रेसमधील निष्ठावंतांनी कुरबूर सुरु केली. त्यांना घेरण्यात आले.

त्यानंतर सीताराम केसरी काँग्रेसचे अध्यक्ष झाले. त्यांना हटवण्यासाठी सोनिया गांधी यांना काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष करण्यात आले. सोनिया गांधी पक्षाच्या अध्यक्ष होत्या आणि काँग्रेस संसदीय पक्षाच्या प्रमुख. त्यावेळी त्या लोकसभा वा राज्यसभेच्या सदस्य नव्हत्या. लोकसभेतील विरोधी पक्षनेते होते शरद पवार. मात्र लोकसभा आणि राज्यसभेत काँग्रेसच्या कोणत्या खासदाराने, कोणत्या विषयावर बोलायचे याचा निर्णय सोनिया गांधींच्या कार्यालयात होत असे. पुढे शरद पवारांनी, सोनिया गांधींच्या विदेशी मूळाचा प्रश्न उपस्थित करून पक्षातून हकालपट्टी करवून घेतली आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली.

डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार स्थापन झाल्यावर सोनिया गांधी पक्षाच्या अध्यक्ष होत्या, संसदीय पक्षाच्या प्रमुख होत्या आणि राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या अध्यक्ष होत्या. मनमोहन सिंग यांच्या सरकारवर त्यांचे नियंत्रण होते. या काळात राहुल गांधी यांनी मनमोहन सिंग यांच्या मंत्रिमंडळात काम करण्याचा प्रस्ताव धुडकावून लावला. मनमोहन सिंग सरकारचा एक अध्यादेश त्यांनी पत्रकार परिषदेत फाडून टाकला आणि आपल्याच पक्षाच्या सरकारचा निषेध केला होता. त्यानंतर काँग्रेस पक्षातील नेते,डॉ. मनमोहन सिंग यांच्या विरोधात नाकेबंदी करू लागले.त्यामध्ये पृथ्वीराज चव्हाणांनी पुढाकार घेतला होता.ही बाब काँग्रेसच्या एका खासदारानेच मला सांगितली. नेहरू-गांधी घराण्यातील व्यक्तीशिवाय काँग्रेस पक्षाचा कारभार सुरळीत चालतो असे चित्र निर्माण होऊ नये यासाठी काँग्रेस श्रेष्ठी चाली करत होते.

२०१४, २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये काँग्रेसचा धुव्वा उडाला. रायबरेली मतदारसंघातून राहुल गांधी पराभूत झाले. त्यानंतर राहुल गांधी यांनी भारत यात्रा काढली. संवेदनशील, विविध समूहांच्या प्रश्नांची जाण असणारा, स्वातंत्र्यलढ्याचा राजकीय, सामाजिक, वैचारिक वारसा सांगणारा आधुनिक तरुण नेता अशी त्यांची प्रतिमा बनली. मात्र तरिही २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसला यश मिळाले नाही. पक्षाच्या खासदारांची संख्या वाढली आणि राहुल गांधी लोकसभेत विरोधी पक्षनेते झाले.

२०२४ ते २०२६ या काळात काँग्रेस पक्षाला उभारी देण्यात मात्र त्यांना यश मिळाले नाही. झारखंड आणि हिमाचल प्रदेश वगळता, उत्तर भारतातील हिंदी भाषिक राज्यांत काँग्रेसला यश मिळाले नाही. तेलंगण, कर्नाटक आणि केरळमधील काँग्रेसच्या यशाचे श्रेय राहुल गांधींना देणे निरर्थक आहे. २०२४ साली राहुल गांधी दोन मतदारसंघातून विजयी झाले. केरळमधील मतदारसंघ त्यांनी सोडला आणि तिथून प्रियंका वाड्रा ही त्यांची बहीण निवडून आली.

सचिन राव यांच्यावर राहुल गांधींनी पक्षाच्या पुनर्बांधणीची म्हणजे संघटन उभारणीची जबाबदारी सोपवली. दर महिन्याला तरुण-तरुणींची राजकीय प्रशिक्षण शिबिरे आयोजित करून सचिन राव यांनी काँग्रेस पक्षामध्ये नवीन कार्यकर्त्यांची फळी उभारण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आणि आजही ते याच कामात व्यस्त आहेत. काँग्रेस पक्षाच्या कार्यकारी समितीवर ते आहेत. त्यामुळे पक्षाची रणनीती, व्यूहरचना, पक्ष बांधणी आणि कार्यकर्ता प्रशिक्षण यामधील ते महत्वाचा दुवा आहेत.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना १८८५ साली. पक्षाचे पहिले अध्यक्ष होते व्योमेशचंद्र बानर्जी, दुसरे अध्यक्ष होते दादाभाई नवरोजी, तिसरे अध्यक्ष होते बद्रुदीन तय्यबजी. ब्रिटीश सरकारशी एकनिष्ठ असणारी काँग्रेस यथावकाश स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करू लागली. विविध अध्यक्ष, प्रदेशाध्यक्ष आणि नेते यांच्या सक्रीय योगदानातून काँग्रेस हा केवळ राजकीय पक्ष नाही तर जन आंदोलन बनले.

काँग्रेसच्या इतिहासात सोनिया गांधींच्या एवढा प्रदीर्घकाळ कोणत्याही अध्यक्षाच्या वाट्याला आलेला नाही.

१९९८ ते २०१७ सलग १९ वर्षं सोनिया गांधी काँग्रेसच्या अध्यक्ष होत्या. त्यानंतर २०१७ ते २०१९ राहुल गांधी पक्षाध्यक्ष होते. २०१९ मधील निवडणुकीतील पक्षाच्या पराभवाची जबाबदारी स्वीकारून त्यांनी राजीनामा दिला. आणि २०१९ ते २०२२ सोनिया गांधी यांनी हंगामी अध्यक्ष म्हणून पक्षाचा कारभार चालवला. २०२२ साली मल्लिकार्जुन खारगे यांची पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्यानंतरही सोनिया, राहुल आणि प्रियंका याच काँग्रेष्ठपक्षाच्या कारभाराच्या केंद्रस्थानी आहेत. काँग्रेस पक्षाचे पुनरुत्थान नेहरू-गांधी घराण्याशिवाय अशक्य आहे या श्रद्धेवर हा पक्ष चालवला जातो आहे.

या उलट भाजपकडे पाहा. १९८० साली पक्षाची स्थापना झाल्यापासून दर तीन वर्षांनी भाजपने वेगवेगळ्या अध्यक्षांची निवड, पक्षाच्या घटनेनुसार केली. अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण आडवानी, मुरली मनोहर जोशी, बंगारू लक्ष्मण अशा विविध नेत्यांना पक्ष प्रमुख करून केंद्रात आणि राज्यांमध्ये सत्तेवर येण्याची संधी देण्यात आली. त्यामुळे पक्षाचा पाया व्यापक झाला.

विविध समूह पक्षाशी जोडले गेले. त्याशिवाय बजरंग दलासारख्या विविध जनसंघटनांचे जाळे आहे. विविध संघ परिवाराच्या विविध संस्था आहेत. भाजपची मदार केवळ मोदी-शहा यांच्यावर नाही.

## ‘गुरु’चा अपमान की अधिकारांचा गैरवापर?

‘आज तक’ वृत्तवाहिनीच्या अँकर अंजना ओम कश्यप यांनी युट्यूबवरील शिक्षकांना ‘दोन कौडीचे’ म्हटल्याने मोठा वाद निर्माण झाला.या विधानामुळे सोशल मीडियावर प्रचंड संताप व्यक्त होत असून, युट्यूबवरील अनेक प्रसिद्ध शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी यावर कडाडून आक्षेप घेतला आहे.तिच्या लाईव्ह शो दरम्यान अंजना ओम कश्यप यांनी परीक्षांमधील गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या मुद्द्यावर बोलताना युट्यूबवरील शिक्षकांवर टीका केली. त्यांनी युट्यूबवरील ‘स्टार शिक्षकां’चा उल्लेख करत, ‘ज्यांना काहीही माहिती नाही, असे दोन कौडीचे लोक युट्यूबवर शिकवत आहेत आणि केवळ व्ह्यूज गोळा करत आहेत,’ अशी टिप्पणी केली.त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे मुख्य प्रवाहातील पत्रकारिता आणि डिजिटल शिक्षण देणारे शिक्षक यांच्यातील अधिकारांवर आणि नैतिकतेवर या कृतीने प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.हा वाद नीट पेपर लीक आणि विद्यार्थ्यांच्या इतर समस्यांवर चर्चा सुरू असताना झाला. या विधानानंतर अनेक ऑनलाइन शिक्षकांनी तीव्र शब्दांत पलटवार केला आहे.एखाद्या शिक्षकाची चूक किंवा गैरवर्तन संपूर्ण शिक्षक वर्गाला लागू करणे अन्यायकारक ठरू शकते. शिक्षकांचा अपमान म्हणजे समाजाचा अपमान आहे.समाजातील प्रत्येक डॉक्टर, इंजिनिअर, वैज्ञानिक, अधिकारी आणि नेता देखील कोणत्या ना कोणत्या शिक्षकाचा विद्यार्थी असतो. म्हणूनच, जेव्हा आपण शिक्षकांचा आदर करतो, तेव्हा आपण ज्ञानाचा आणि मानवी मूल्यांचा सन्मान करत असतो.सध्याच्या टीव्ही मीडियाचे स्वरूप गंभीर पत्रकारितेकडून केवळ सनसनाटी आणि वादांकडे (विवाद आणि वादळे) झुकले आहे. तथ्यांवर आणि विश्लेषणावर आधारित बातम्यांऐवजी, चॅनेल टीआरपी वाढवण्यासाठी क्षुल्लक गोष्टींना मोठे करून ‘पोरखेळ’ मांडतात. या प्रवृत्तीमुळे गंभीर विषयांपेक्षा केवळ आरडाओरडा आणि ध्रुवीकरणाला प्राधान्य दिले जाते. टीआरपी वाढविण्यासाठी टिव्ही चॅनल मध्ये वाटेल ते मुद्द्यावर चर्चा करतात नको तो प्रसंग ओढवून घेतात.अशा घटनांना आळा घालण्यासाठी भारतीय प्रेस परिषद आणि न्यूज ब्रॉडकास्टर्स अँड डिजिटल असोसिएशन यांनी पत्रकारितेसाठी आचारसंहिता तयार केली आहे. चॅनेल्सनी या नियमांचे पालन करणे बंधनकारक असते.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल,** वर्धा
मो.९५६१५९४३०६

## शेतकऱ्यांचा कायमस्वरुपी तोडगा हवा..

नुकताच महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत राज्यांतील ५५ लाख ७२ हजार शेतकऱ्यांचे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचे पीककर्ज माफ करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह म्हणावा लागेल. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान घेतलेले अल्प मुदतीचे २ लाखांपर्यंतचे पीककर्ज माफ होणार असून ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकित आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत न फेडलेली कर्जे या योजनेसाठी पात्र ठरणार आहेत. तसेच २०२३ ते २०२६ या कालावधीत नियमीत कर्ज फेडलेल्यांना ५० हजार प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. ज्या शेतकऱ्यांचे २ लाखांपेक्षा अधिक कर्ज आहे. त्यांना २ लाखांवरील थकबाकी ३१ मार्च २०२७ पूर्वी भरण्यासाठी मुदत दिली जाणार असून ती भरल्यानंतर शासन २ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणार आहे. हे जरी खरे असले तरी शेतकऱ्यांना पुन्हा, पुन्हा कर्ज काढावे लागते.

त्यासाठी सरकारने शेतकऱ्यांसाठी कायमस्वरुपी तोडगा काढणे गरजेचे आहे. सद्या खते,बि-बियांणे,शेती मशागत, मजूर, यांची सातत्याने दरवाढ,कृषी उत्पन्नाला बाजारपेठ, शेती मालाला योग्य हमीभाव मिळत नसल्याने आणि वातावरणातील बदलांमुळे शेती व्यवसाय बेभरवशाचा झाला आहे. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होतो आहे.त्यामुळे भारत सरकार आणि प्रत्येक राज्ये शेतकऱ्यांसाठी कायमस्वरुपी उपाययोजना राबवून शेतकऱ्यांना उभारी देणे अपेक्षित आहे.

**राजू जाधव**

## आजपर्यंत पोलिसांना दिसले नाही?

पिंपरी चिंचवड व पुणे शहर परिसरात हातभत्तेच्या विषारी दारूमुळे तब्बल २४ व्यक्तींचा मृत्यू झाल्याचे वृत्त वाचले.विषारी वायुमुळे हे मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.आता पोलीस दलातील अनेकांची चौकशी सुरु आहे.या प्रकरणात पुणे शहर पोलीस दलातील तीन,पिंपरी चिंचवड पोलीस दलातील सहा आणि राज्य उत्पादन शुल्क विभागातील एकूण तेरा जणांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे .या घटनेमुळे २४ कर्मचाऱ्यांच्या कुटुंबावर दुःखाची कुऱ्हाड कोसळली आहे. घटने अगोदर जर कारवाई झाली असती तर लोकांचे प्राण तरी वाचले असते.एकूणच लोकांना दिसते पण पोलिसांना दिसत नाही हे आश्चर्यच आहे .

पोलिसांनी अगोदर कडक कारवाई केली असती तर सारेच उघडकीला आले असते हा जाब विरोधी आघाडीने शासनाला विचारला पाहिजे.

**शांताराम वाघ**

## ‘विकास की विध्वंस’

आज जगभरातील सरकारे आणि तंत्रज्ञान आस्थापने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सुरक्षित वापराविषयीची धोरणे सिद्ध करत आहे.अनेकदा एआय प्रणाली ही धोकादायक माहिती देण्यावर मर्यादा घालतात पण तरीही काही जण अप्रत्यक्ष मार्गाने माहिती मिळवतात. त्यामुळे तांत्रिक निर्बंध घालणे पुरेसे नाही तर नैतिक मूल्ये आणि कठोर कायदे यांचीही आवश्यकता आहे. कट्टर विचारसरणी नष्ट करण्यासाठी तरुण पिढीमध्ये राष्ट्रप्रेम, मानवता,संयम,कर्तव्यनिष्ठा,धर्मनिष्ठा आणि विवेक बुद्धी या मूल्यांची जपवणूक करण्यावर भर द्यायला हवा.तंत्रज्ञान आणि नैतिकता यांचा समतोल साधला गेला पाहिजे. विज्ञान मानवाला केवळ बुद्धी देते पण तिचा योग्य वापर कसा करायचा हे धर्म आणि संस्कार शिकवतात .आज नैतिकतेचा ऱ्हास होत असल्याने अशा घटना घडत आहे. नैतिकतेचा अभाव हेच विनाशाचे कारण ठरते यातूनच स्वार्थ, हिंसा आणि अराजकता वाढते त्यामुळे आधुनिक शिक्षणासह नैतिक आणि अध्यात्मिक शिक्षणाची ही जोड द्यायला हवी.

आण्विक क्षेत्राप्रमाणे तंत्रज्ञानाचे क्षेत्र ही नियंत्रित ठेवणे क्रमप्राप्त आहे. लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी सर्व उपाय योजनांकडे गांभीर्याने आणि दायित्वाने पाहून कृतिशील व्हावे. तंत्रज्ञानातील त्रुटी दुरुस्त करण्यावर भर न देता मूळ पाया नीतिवान असल्यास गुन्हेगारी आणि आता आतंकवाद यापासून मुक्त अशी आदर्श राष्ट्र उभारणी होऊ शकेल.

**लीना गाडगीळ**

गुरुवार, दि. ४ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# काँग्रेस उमेदवार साहेबराव कांबळे यांची माघार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## राजकीय चर्चांना उधाण



**यवतमाळ, दि. ३ :** स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला असून काँग्रेसचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे. अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीपूर्वीच त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

महाविकास आघाडीकडून साहेबराव कांबळे यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली होती. त्यांचा सामना महायुतीचे उमेदवार दुष्यंत चतुर्वेदी यांच्याशी अपेक्षित होता. मात्र, निवडणूक रंगत असतानाच कांबळे यांनी अचानक माघार घेतल्याने राजकीय समीकरणांमध्ये मोठी उलथापालथ झाली आहे.माघारीचे कारण स्पष्ट करताना कांबळे यांनी निवडणुकीसाठी आवश्यक संख्याबळ उपलब्ध नसल्यामुळे हा निर्णय घेतल्याचे सांगितले. तसेच उमेदवारी दिल्याबद्दल त्यांनी काँग्रेस पक्षाचे आभारही मानले. कांबळे यांच्या माघारीनंतर महाविकास आघाडीची पुढील भूमिका काय राहणार, तसेच उर्वरित मतदारांचे राजकीय कल कोणाकडे झुकणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. दुसरीकडे, या घडामोडीमुळे महायुतीचे उमेदवार दुष्यंत चतुर्वेदी यांच्या विजयाची शक्यता अधिक बळकट झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. दरम्यान, माघारीच्या निर्णयामागील कारणांबाबत विविध तर्कवितर्क लावले जात असले तरी त्याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे राजकीय आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले असून अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत. या निवडणुकीत भाजपचे बंडखोर नेते आणि जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनीही उमेदवारी कायम ठेवली आहे. त्यांच्या पुढील भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले असून निवडणुकीतील अंतिम समीकरणे आणखी रंजक बनण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत एकूण ४४६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. महायुतीकडे सुमारे २६१ मतांचे संख्याबळ असल्याचे मानले जात आहे, तर महाविकास आघाडीकडे सुमारे १२५ मते आहेत. याशिवाय एमआयएम, वंचित, जनशक्ती आणि अपक्ष सदस्यांची मते निकालात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. काँग्रेसच्या या आक्रमक भूमिकेमुळे साहेबराव कांबळे यांच्या माघारी भोवतीचे राजकीय गूढ अधिकच गडद झाले असून आगामी काही दिवसांत या प्रकरणावरून आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

### काँग्रेसच नव्हे तर लोकशाहीचाही विश्वासघात”
**– सचिन नाईक**



**काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन नाईक यांनी साहेबराव कांबळे यांच्या माघारीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पक्षाने विश्वासाने उमेदवारी दिली.अनुसूचित जाती समाजातील नेतृत्वाला प्रतिनिधित्व मिळावे हा त्यामागील उद्देश होता. मात्र पक्ष नेतृत्वाला विश्वासात न घेता उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. ही अत्यंत निंदनीय बाब असून पक्षाच्या विश्वासाला तडा देणारी आहे. संख्याबळाची वस्तुस्थिती आधीपासूनच सर्वांना माहिती होती. त्यामुळे माघारीमागे केवळ हेच कारण असल्याचे सांगत घोडदौड थांबविणे चुकीचे आहे. हा केवळ काँग्रेसचाच नव्हे तर लोकशाही प्रक्रियेचाही अवमान आहे.**

# महावितरणच्या अनास्थेमुळे शेती संकटात..
## कृषीपंपा करिता १२ तास दिवसा वीज न दिल्यास उपोषणाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ३ :** एकीकडे मान्सूनपूर्व शेतीची लगबग सुरू असताना, दुसरीकडे महावितरणच्या अपुऱ्या आणि विस्कळीत वीजपुरवठ्यामुळे पुसद परिसरातील शेतकरी गंभीर संकटात सापडला आहे. कृषी पंपांना २४ तासांपैकी अवघे ६ तास वीज मिळत असून, त्यातही वारंवार होणारे तांत्रिक बिघाड शेतकऱ्यांच्या अडचणी वाढवत आहेत.

परिणामी पिकांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडण्याची भीती निर्माण झाली आहे. निंबी, पार्डी, गणेशपूर, कवडीपूर आणि परिसरातील शेतकऱ्यांनी एकत्र येत महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर करून कृषी पंपांसाठी दिवसा किमान १२ तास अखंडित वीजपुरवठ्याची मागणी केली आहे. वाढत्या खत, बियाणे आणि मजुरी खर्चामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आता वीजटंचाईचा फटका बसत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. निवेदनात ग्रामीण भागातील फिडर व ट्रान्सफॉर्मरमधील वारंवार होणारे बिघाड तातडीने दुरुस्त करण्याची तसेच वीजअभावी पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे करून त्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे. पाणी नसल्याने पीक वाळले तर त्याची जबाबदारी कोण घेणार?” असा थेट सवाल उपस्थित करत शेतकऱ्यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास पुसद येथील महावितरण कार्यालयासमोर बेमुदत उपोषण छेडण्यात येईल, असा ठाम इशारा शेतकरी प्रतिनिधींनी दिला आहे. यावेळी गजानन जाधव, गणेश सावंत, दीपक मोरे, संतोष आंबोरे, अरुण नागुलकर, पंजाबराव ढेकळे, मधुकर चव्हाण यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत होण्यापूर्वी महावितरणने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# इंदिरा नगरातील नाल्यांच्या समस्येमुळे नागरिक त्रस्त..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## तात्काळ उपाययोजनांची मागणी



**पांढरकवडा, दि. ३ :** शहरातील इंदिरा नगर परिसरात मागील तीन वर्षांपासून नाल्यांचे सांडपाणी नागरिकांच्या घरांमध्ये शिरत असल्याने स्थानिक नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. नाल्यांची नियमित साफसफाई व देखभाल होत नसल्यामुळे घाणीचे पाणी घरांच्या परिसरात साचत असून आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या समस्येबाबत नागरिकांनी अनेक वेळा संबंधित नगरसेवक तसेच नगर परिषद प्रशासनाकडे तक्रारी केल्याचा दावा केला आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने परिसरातील सर्वसामान्य व गरीब नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. साचलेल्या सांडपाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढण्यासोबतच विविध साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. इंदिरा नगरातील नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाकडे नाल्यांची तात्काळ साफसफाई, दुरुस्ती तसेच कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. केवळ दिखाऊ कामे न करता नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा मिळेल अशी प्रभावी कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.दरम्यान प्रशासनाने या गंभीर समस्येची दखल घेऊन त्वरित उपाययोजना करावी, अन्यथा नागरिकांना लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा देण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पुसद-उमरखेड रोडचे कामामुळे पानंदरस्ते प्रभावित; शेतकरी त्रस्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ३ :** राज्यमार्ग क्र.२६२ पुसद-उमरखेड सिमेंट काँक्रिटच्या रोडचे बांधकाम झपाट्याने सुरू आहे. पूर्वीपेक्षा या रोडची रुंदी आणि उंची देखील वाढत असून रोडच्या दोन्ही बाजूने आवश्यक त्या ठिकाणी खोल नाल्या खोदण्यात येत आहेत. परंतु आजूबाजूच्या शेतशिवाराकडे जाणारे वहिवाटीचे पाणंद रस्ते बाधित होत असल्याने शेतकऱ्यांत नाराजी पसरली आहे.

जेथून वहिवाट किंवा पाणंद रस्ते आहेत अशा ठिकाणी सिमेंट पाईप टाकणे गरजेचे आहे. परंतु शेतकऱ्याचा विचार न करता खोल नाल्या खोदण्यात आल्या. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीउपयोगी साहित्य, बी-बियाणे, रासायनिक खते व उत्पादित माल ने-आन करण्याची समस्या उद्भवत आहे. त्यामुळे संबंधीत विभागाने ही बाब विचारात घेऊन आवश्यक त्या ठिकाणी सिमेंट पाईप टाकण्याची उपाययोजना करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केल्या जात आहे.

> **उन्हाळा असून आज माझ्या शेतात नांगरणी करण्यासाठी ट्रॅक्टर नेता येत नाही.पेरणीचे दिवस जवळ आले. सर्व शेतीचा उदीम बाकी आहे. महिन्याभरापासून साहेबाला बोलत आहे. पण काहीच झालं नाही. काय कराव आता कळत नाही.**
>
> **-विजय मारकड,**
> **त्रस्त शेतकरी हर्षी.**

## थोडक्यात

### महागाव-देवरवाडी रस्त्यावर निकृष्ट दर्जाचे काम..!
**जि.प. बांधकाम विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह**

**दारव्हा :** दारव्हा तालुक्यातील महागाव ते देवरवाडी दरम्यान सुरू असलेल्या



डांबरीकरणाच्या कामावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुमारे तीन ते चार किलोमीटरच्या या रस्त्याचे काम गेल्या सहा महिन्यांपासून संथ गतीने सुरू असून निकृष्ट दर्जाचे बांधकाम होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याच्या कडेला अंदाजपत्रकात तरतूद नसताना काळी माती टाकण्यात येत आहे. पावसाळ्यात ही माती वाहून जाऊन रस्ता धोकादायक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे अपघातांचा धोका वाढू शकतो, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.या प्रकरणात जिल्हा परिषद बांधकाम उपविभागाच्या अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. कामाच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असलेल्या अभियंत्यांकडून प्रभावी नियंत्रण होत नसल्याचा आरोप होत आहे. संबंधित अभियंता मुख्यालय दारव्हा येथे असतानाही कार्यालयात नियमित उपस्थित राहत नसल्याची चर्चा असून, त्यामुळे विकासकामांच्या देखरेखीवर परिणाम होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.दरम्यान, कामाच्या संथ गतीमुळे आणि गुणवत्तेबाबतच्या तक्रारींमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित कामाची तातडीने तांत्रिक चौकशी करून गुणवत्ता तपासावी, अंदाजपत्रकानुसारच काम होत आहे का याची पडताळणी करावी तसेच दोषी आढळल्यास संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. महागाव-देवरवाडी रस्त्यावरील कामाबाबत प्रशासनाने लवकरात लवकर भूमिका स्पष्ट करून नागरिकांच्या शंकांचे निरसन करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### जनगणना कागदावर नव्हे, प्रत्यक्ष दारात..! जिल्हाधिकाऱ्यांची ऑन-फिल्ड पडताळणी

**यवतमाळ :** तब्बल १५ वर्षांनंतर सुरू झालेल्या जनगणना प्रक्रियेला अचूकता



आणि पारदर्शकतेची जोड देण्यासाठी जिल्हाधिकारी विकास मीना यांनी स्वतः मैदानात उतरून कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. यवतमाळ शहरातील चौसाळा परिसरात घरांना भेटी देत त्यांनी प्रगणकांकडून नोंदविण्यात येणाऱ्या माहितीची पडताळणी केली आणि जनगणनेच्या कामाचा प्रत्यक्ष आढावा घेतला. १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत नागरिकांना स्व-गणनेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यानंतर १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक आणि पर्यवेक्षकांकडून घरोघरी जाऊन माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी फिल्डवर जाऊन कामाची गुणवत्ता, अचूकता आणि येणाऱ्या अडचणींची माहिती घेतली. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधत, जनगणना ही केवळ सरकारी प्रक्रिया नसून देशाच्या विकास नियोजनाचा पाया असल्याचे सांगितले. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने खरी, संपूर्ण आणि अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. ज्या नागरिकांनी जनगणना पोर्टलवर ऑनलाइन माहिती भरली आहे, त्यांनी प्रगणकांना केवळ आपला 'युनिक आयडी' सादर करावा. तर इतर नागरिकांची माहिती प्रगणक डिजिटल उपकरणांच्या माध्यमातून सुरक्षितरीत्या नोंदवत आहेत. यावेळी तहसीलदार विद्या शिंदे, प्रगणक, पर्यवेक्षक आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. घरे, सुविधा आणि मालमत्तेची माहिती संकलित करण्याचा पहिला टप्पा १४ जून रोजी पूर्ण होणार असून, प्रत्यक्ष लोकसंख्या गणनेचा दुसरा टप्पा १ फेब्रुवारी २०२७ पासून राबविण्यात येणार आहे.

# मान्सून दारात, नगरपालिका झोपेत? दिग्रसमध्ये नाले तुंबले
## कचऱ्याच्या विळख्यात शहर,मान्सूनपूर्व तयारीचा फज्जा, नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस, दि. ३ :** मान्सूनचे आगमन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले असताना दिग्रस शहरातील स्वच्छता, नालेसफाई आणि रस्ते दुरुस्तीच्या कामांचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र समोर आले आहे. शहरातील अनेक भागांत नाले तुंबलेले, गटारांमध्ये गाळ साचलेला आणि रस्त्यांच्या कडेला कचऱ्याचे ढिगारे पडलेले असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

दरवर्षी पावसाळ्यात शहरातील विविध भागांमध्ये पाणी साचणे, गटारे ओसंडून वाहणे, दुर्गंधी पसरने आणि डासांच्या प्रादुर्भावामुळे साथीच्या रोगांचा धोका वाढतो. मात्र यंदाही नगरपालिका प्रशासनाने मान्सूनपूर्व उपाययोजनांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. बाजारपेठ, खटीकपुरा, विठ्ठलनगर, मोतीनगर, गवळीपुरा, चांदनगर तसेच इतर अनेक प्रभागांमध्ये नाले व गटारांची अनेक महिन्यांपासून साफसफाई झालेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी नाल्यांमध्ये गाळ व कचरा साचून पाण्याचा निचरा अडथळित झाला आहे. काही ठिकाणी रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. शहरातील सार्वजनिक ठिकाणे, अंतर्गत रस्ते आणि नाल्यांच्या कडेला पडलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे डास, माशा आणि दुर्गंधीचा त्रास वाढला असून नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली. नागरिकांच्या मते, पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, गटार दुरुस्ती, रस्त्यांची डागडुजी, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी ही कामे युद्धपातळीवर होणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात शहरातील परिस्थिती पाहता प्रशासनाची तयारी केवळ कागदोपत्रीच असल्याचा आरोप होत आहे.पावसाळा सुरू झाल्यानंतर शहरातील परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. घरांमध्ये पाणी शिरणे, वाहतूक विस्कळीत होणे, तसेच डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नागरिकांनी वर्तवली आहे. यामुळे नगरपालिकेने तातडीने सर्व प्रभागांची पाहणी करून नाले, गटारे व रस्त्यांची रखडलेली कामे पूर्ण करावीत, नियमित स्वच्छता मोहीम राबवावी आणि आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घ्याव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे. मान्सूनपूर्व तयारी ही फक्त बैठका आणि कागदांपुरती न राहता प्रत्यक्ष शहरात दिसली पाहिजे.अन्यथा नागरिकांना त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. अशी संतप्त प्रतिक्रिया शहरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# दिव्यांग शेतकऱ्यांना सक्षमतेची नवी दिशा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ३ :** संत श्री सूरदास जयंतीनिमित्त 'सक्षम' सामाजिक संस्थेच्या यवतमाळ युनिटच्या वतीने दिव्यांग शेतकऱ्यांना स्वावलंबी व सक्षम करण्याच्या उद्देशाने विशेष कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय येथे ३१ मे रोजी झालेल्या या मेळाव्याला दिव्यांग शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री सुभाष शर्मा होते. यावेळी भूमी विकास इंडस्ट्रीजचे संचालक सागर पद्मावार, वसंत ॲग्री बायो प्रा. लि.चे वितरक किशोर जाजू, सक्षमचे विदर्भ प्रांत अध्यक्ष विजयसिंह मोहता व जिल्हाध्यक्ष सुशील कोठारी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात सक्षमचे उपाध्यक्ष श्याम दातार यांनी सादर केलेल्या सक्षम गीताने झाली. संजय दंडे यांनी संत श्री सूरदास यांच्या कार्याचा परिचय करून दिला. पद्मश्री सुभाष शर्मा यांनी नैसर्गिक व सेंद्रिय शेतीचे महत्त्व तसेच निसर्गातून उपलब्ध होणाऱ्या औषधींची माहिती दिली. सागर पद्मावार यांनी जैविक औषधे व विविध फवारण्यांसाठी आवश्यक द्रव्ये शेतकऱ्यांनी स्वतः तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी सरकारी सेवेत रुजू झालेल्या मोहिनी डगवार यांच्यासह द्रोणाचार्य रामटेके व सचिन भेंडारकर यांचा सत्कार करण्यात आला. मेळाव्यात कपाशी व सोयाबीन बियाणे तसेच जैविक औषधांचे अत्यल्प दरात वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सक्षमच्या पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# उद्योग,विकासाच्या नावाखाली वृक्षसंहार?
## रिलायन्स बायोएनर्जी प्रकल्पासाठी झाडांची बेकायदा कत्तल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ३ :** यवतमाळ जिल्ह्यात औद्योगिक विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा बळी दिला जात असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.

नेर तालुक्यातील मालखेड (खुर्द) येथील ३३ केव्ही महावितरण युनिटमधून उत्तरवाढवणा परिसरातील रिलायन्स बायोएनर्जी कॉम्प्लेक्सला वीजपुरवठा करण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या विद्युत वाहिनीच्या कामादरम्यान मोठ्या प्रमाणात परिपक्व वृक्षांची कत्तल करण्यात आल्याचा गंभीर आरोप वृक्षप्रेमी तथा नागरिकांकडून केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, उत्तरवाढवणा गावाजवळ रिलायन्स बायोएनर्जी कॉम्प्लेक्सचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यात येत असून त्यासाठी आवश्यक वीजपुरवठा करण्याकरिता महावितरणच्या माध्यमातून स्वतंत्र विद्युत वाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. या कामासाठी मोठ्या प्रमाणात लोखंडी विद्युत खांब उभारण्यात आले आहेत. मात्र या प्रक्रियेदरम्यान रस्त्यालगत उभ्या असलेल्या अनेक वर्षे जुन्या व मोठ्या वृक्षांची वन विभाग अथवा इतर सक्षम शासकीय यंत्रणांची आवश्यक परवानगी न घेता सर्रास कत्तल करण्यात आल्याचा आरोप होत आहे.आधीच वाढत्या तापमानाने नागरिक हैराण झाले असताना सावली देणाऱ्या झाडांचा असा बळी घेतला जात असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. विकासाच्या दृष्टीने नवीन उद्योगांचे आगमन स्वागतार्ह असले तरी पर्यावरणाचे अपरिमित नुकसान करून होणारा विकास कितपत योग्य, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. विशेष म्हणजे या प्रकरणासंदर्भात संबंधित कंपनीकडे विचारणा करण्यात आली असता समाधानकारक माहिती देण्याऐवजी उडवाउडवीची उत्तरे देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या कामासाठी आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या होत्या का? झाडतोडीची अधिकृत नोंद आहे का, तसेच पर्यावरणीय नियमांचे पालन करण्यात आले का, याबाबत संशय निर्माण झाला आहे. ग्रामस्थांच्या मते, शासकीय विभागांच्या कामांची चौकशी आणि जबाबदारी निश्चित होते.मात्र खाजगी कंपन्यांच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण नसल्याने मनमानीला खतपाणी मिळत आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून झाडतोडीबाबत जबाबदार असणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, तसेच पर्यावरणाची झालेली हानी भरून काढण्यासाठी व्यापक वृक्षारोपण करण्यास संबंधित कंपनीला बाध्य करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. उद्योग उभारणी झालीच पाहिजे मात्र पर्यावरणाच्या किमतीवर नव्हेत अशी भूमिका घेत नागरिकांनी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

# हातभट्टी दारूविरोधात पोलिसांची धडक 'सर्जिकल स्ट्राईक'..!
## ६ दिवसांत २६० गुन्हे, २६.८१ लाखांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ३ :** यवतमाळ जिल्ह्यात अवैध गावठी हातभट्टी दारूचे जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने राबविलेल्या विशेष मोहिमेत अवघ्या सहा दिवसांत २६० आरोपींविरुद्ध २६० गुन्हे नोंद करून तब्बल २६ लाख ८१ हजार ९६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या धडक कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून जिल्ह्यातील हातभट्टी व्यावसायिकांना स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

जिल्ह्यात अवैध हातभट्टी दारूची निर्मिती, साठवणूक, वाहतूक व विक्री कायमस्वरूपी बंद व्हावी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसावा, या उद्देशाने पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखेला विशेष मोहिमेअंतर्गत प्रभावी छापेमारीचे आदेश दिले होते. या निर्देशांनुसार जिल्हाभर राबविण्यात आलेल्या कारवाईत अवैध दारू तयार करणारे, साठवणूक करणारे आणि विक्री करणाऱ्या २६० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच मोठ्या प्रमाणात हातभट्टी दारू व मोहफुलाचा सडवा जप्त करून जागेवरच नष्ट करण्यात आला. पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, अवैध हातभट्टी दारूचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी ही मोहीम पुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार आहे. जिल्ह्यात कुठेही हातभट्टी दारूची निर्मिती, विक्री, वाहतूक किंवा साठवणूक होत असल्याची माहिती नागरिकांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याला द्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. ही विशेष मोहीम पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या राबविण्यात आली. जिल्ह्यातील अवैध दारू व्यवसायावर पोलिसांनी मोठा घाव घातला असला, तरी ही कारवाई सातत्याने सुरू राहून हातभट्टी दारूचे खरोखरच समूळ उच्चाटन होते का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अमरावती जिल्हयावरही एल निनोचा प्रभाव

**अमरावती/का.प्र.**

मान्सूनची प्रतीक्षा सुरू झाली आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, यावर्षी अमरावतीच्या हवामानावर एल निनो आणि न्यूट्रल इंडियन ओशन डायपोलचे परिणामही दिसू शकतात. जून महिन्यात कडक उन्हापासून दिलासा मिळण्याची शक्यता आहे, पण हवामान दमट राहील. हवामानामुळे लोकांच्या अडचणी वाढू शकतात. पाऊस सामान्यपेक्षा कमी पडेल असेही संकेत आहेत.



अमरावतीमध्ये साधारणपणे १५ ते २५ जून दरम्यान मान्सूनचे आगमन होते. उपलब्ध हवामानशास्त्रीय माहितीनुसार, २०२६ मध्ये १६ ते १८ जून दरम्यान मान्सूनचे आगमन अपेक्षित आहे. तथापि, केरळमध्ये, मान्सूनच्या प्रगतीस विलंब होत असल्याने, शेतकरी आणि नागरिक हवामान विभागाच्या आगामी घोषणांची आतुरतेने वाट पाहत आहेत. गेल्या १० वर्षांत मान्सूनचे स्वरूप बदलले आहे.

अमरावतीमध्ये मान्सूनच्या आगमनाच्या तारखांमध्ये लक्षणीय चढ-उतार झाला आहे. २०२१ आणि २०२२ मध्ये मान्सून तुलनेने लवकर दाखल झाला, तर २०१९ मध्ये, मान्सून तुलनेने लवकर दाखल झाला, तर २०१९ आणि २०२३ मध्ये तो उशिरा आला होता.

बदलत्या हवामानामुळे गेल्या १० वर्षांतील पर्जन्यमानाच्या नोंदींमध्येही बदल दिसून येतो. गेल्या १० वर्षांच्या आकडेवारीचे अवलोकन केल्यास, अमरावतीमधील पर्जन्यमानात लक्षणीय फरक दिसून येतो. २०२२ हे वर्ष जिल्ह्यासाठी सर्वात महत्त्वाचे ठरत आहे. हे वर्ष मुसळधार पावसाचे होते, तर २०१७ मध्ये सर्वात कमी पावसाची नोंद झाली.

### शेतकऱ्यांची चिंता वाढली


एल निनोच्या प्रभावामुळे जूनमधील पाऊस सामान्यपेक्षा कमी झाल्यास, त्याचा परिणाम खरीप पेरणीवर होऊ शकतो. जिल्ह्यातील शेतकरी वेळेवर आणि चांगल्या पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत. कृषी तज्ज्ञांच्या मते, मान्सूनचे आगमन आणि जूनच्या शेवटच्या आठवड्यातील पाऊस खरीप पिकांसाठी महत्त्वाचा ठरेल. सध्या तरी, अमरावतीचे रहिवासी तीव्र उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळण्याची आशा करत आहेत, परंतु सर्वांचे लक्ष मान्सूनच्या प्रत्यक्ष गतीवर आणि पावसावर लागले आहे.

### उष्णता कमी होईल, पण आर्द्रता वाढेल.

हवामान तज्ञांच्या मते, जूनमध्ये कमाल तापमान कमी होईल आणि उष्णतेच्या लाटेची शक्यता कमी असेल. तथापि, वाढलेल्या आर्द्रतेमुळे हवा बरीच दमट जाणवू शकते. अधूनमधून मेघगर्जनेसह पाऊस, सोसाट्याचा वारा आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## डॉ. सागर धनोडकर कॉम्रेड्स मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी होणार

**अमरावती/का.प्र.**



आगामी १४ जून रोजी दक्षिण आफ्रिकेतील डर्बनमध्ये जागतिक पातळीवरील अल्ट्रामॅरेथॉन- कॉम्रेड्स मॅरेथॉन २०२६ होत आहे. ही अमरावतीसाठी अत्यंत गौरवाची व अभिमान वाढविणारी बाब असल्याने आमदार संजय खोडके यांनी डॉ. सागर धनोडकर यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा देऊन सुयश चिंतिले आहे.अत्यंत कठीण मानली जाणारी अल्ट्रामॅरेथॉन — कॉम्रेड्स मॅरेथॉन २०२६ च्या ९९ व्या आवृत्तीत यावर्षी ८४ देशांतील २१,६३३ पात्र धावपटू सहभागी होत आहेत. भारताकडून एकूण २७९ धावपटू या प्रतिष्ठित स्पर्धेत सहभागी होत असून, त्यापैकी महाराष्ट्रातील २७० धावपटू आहेत.गेल्या सहा महिन्यांपासून व्यावसायिक, कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळत, दिवस-रात्र अथक मेहनत, शिस्त आणि सातत्याच्या बळावर ६० किमी, ५६ किमी, ५० किमी,४८ किमी, ३६ किमी, २७ किमी आणि १८ किमी अशा लांब पल्ल्याच्या कठीण रन पूर्ण करून त्यांनी या महासंग्रामाची तयारी केली आहे. आता ९ जून रोजी अमरावतीहून मुंबई आणि १० जून रोजी दक्षिण आफ्रिकेतील डर्बनकडे डॉ. सागर धनोडकर यांचा प्रवास सुरू होत आहे, जिथे १४ जून २०२६ रोजी ही जागतिक कीर्तीची कॉम्रेड्स मॅरेथॉन संपन्न होणार आहे.

## ...झाली मुलगी आणि प्रमाणपत्रावर दाखविला मुलगा

### मोर्शी उपजिल्हा रुग्णालयाचा अजबगजब कारभार पोलीस ठाण्यात तक्रार

**अमरावती/का.प्र.**

मोर्शी उपजिल्हा रुग्णालयात एका महिलेची प्रसूती झाली. तिने मुलीला जन्म दिला. मुलीच्या जन्मानंतर सर्वे आनंदीत होते. पण डॉक्टरांनी त्यांना जे प्रमाणपत्र दिले त्याच्यावर मुलीएवजी मुलगा लिहिण्यात आल्याने संभ्रम निर्माण झाला. त्यांना मुलगी झाली की मुलगा हा प्रश्न दांपत्यासमोर उभा झाला होता. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

या संपूर्ण प्रकारामुळे आई-वडिलांचा तणाव वाढला. माहिती नुसार वैष्णवी (काल्पनिक नाव) महिलेला मोर्शी उपजिल्हा रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल केले होते.१९ मे च्या दुपारी ३ वाजता तिची प्रसूती झाली. परिचारिकाने कुटुंबीयांना सांगितले की त्यांना मुलगा झालेला आहे. यामुळे सर्व आनंदीत होते तसेच जन्म झालेल्या बाळाच्या रिपोर्टवर लिंगाच्या कॉलममध्ये पुरुष असा उल्लेख करण्यात आला होता. यामुळे सर्व आनंदीत होते पण त्यांचा हा आनंद फार काळ नाही टिकला. त्याच रात्री नऊ वाजता रुग्णालयाच्या वॉर्डबायने कुटुंबीयांना सांगितले की त्यांना मुलगा नाही तर मुलगी झाली आहे. यामुळे प्रसुत महिला सह कुटुंबीय हादरले. यासंदर्भात रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना विचारपूस केल्यावर ते कोणताही समाधानकारक उत्तर नाही देऊ शकले. विशेष म्हणजे चार दिवसांनी महिलेला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. यानंतर बाळाचे मामा ३१ मे रोजी जन्मदाखल्यासाठी मोर्शी नगरपरिषद मध्ये पोहोचले तर रेकॉर्ड पाहून त्यांना आणखीन धक्का बसला. नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, रुग्णालयाकडून त्यांना जे रिपोर्ट मिळाली आहे त्यामध्ये मुलगा झाल्याचा उल्लेख आहे. यामुळे ते मुलीचे प्रमाणपत्र नाही देऊ शकत. हातात आली मुलगी आणि प्रमाणपत्रावर मुलगा या गोंधळामुळे कुटुंबीयांना मानसिक त्रास झालेला आहे. तसेच उपजिल्हा रुग्णालयाचा भोंगळ कारभार पुन्हा समोर आला आहे. यामुळे कुटुंबियांनी आक्रोश व्यक्त केले आहे आणि पोलीस ठाण्यात उपजिल्हा रुग्णालयाच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. मुलांची अदलाबदली तर नाही झाली ना असा आरोप कुटुंबियांनी लावला आहे.

## मठाधिपती प्रसन्नगिरी महाराज ब्रह्मलीन

### भक्त परिवारावर शोककळा

**अंजनगाव बारी/वार्ताहर**



श्री समर्थ रामगिरी महाराज देवस्थान मठ, अंजनगाव बारी येथील पूजनीय मठाधिपती परमपूज्य श्री रामचरणगिरी उर्फ प्रसन्नगिरी गुरु कैलासगिरी महाराज गोसावी (वय ६७) यांचे बुधवार ३ जून २०२६ रोजी पहाटे ३:५५ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या ब्रह्मलीन होण्याने मठ परिसरासह संपूर्ण भक्त परिवारावर शोककळा पसरली असून अध्यात्मिक क्षेत्रातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

श्री समर्थ रामगिरी महाराज मठाच्या ४७२ वर्षांच्या अखंड परंपरेतील सातवे मठाधिपती म्हणून प्रसन्नगिरी महाराजांनी अध्यात्म, सेवा, संस्कार आणि भक्तीचा वारसा जपण्याचे कार्य आयुष्यभर केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मठाची परंपरा अधिक दृढ झाली असून हजारो भक्तांना त्यांनी अध्यात्माची दिशा दिली.त्यांच्या साधेपणा, सेवाभाव आणि आध्यात्मिक कार्यामुळे ते भक्तांच्या हृदयात विशेष स्थान निर्माण करू शकले. त्यांच्या निधनाने मठ व भक्त परिवाराची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे.

परमपूज्य महाराजांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शनासाठी श्री समर्थ रामगिरी महाराज देवस्थान मठ, अंजनगाव बारी येथे सकाळी ८ वाजल्यापासून व्यवस्था करण्यात आली आहे. त्यांच्या अंतिम दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी होत असून सर्वत्र हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

## चांदूर रेल्वेत विजेचा लपंडाव; नागरिकांचा संताप अनावर

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शहरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या विजेच्या लपंडावामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून महावितरणाच्या कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे.

चांदूर रेल्वे येथील ६६ केव्ही सबस्टेशनचे ३३ केव्हीमध्ये रूपांतर करण्यात आल्यापासून वीजपुरवठ्याच्या समस्या वाढल्या आहेत. नियमानुसार या केंद्राची क्षमता वाढवून १३२ केव्हीपर्यंत नेणे अपेक्षित असताना उलट क्षमता कमी करण्यात आल्याचा आरोप नागरिक करत आहेत. परिणामी चांदूर रेल्वेला धामणगावच्या यंत्रणेवर अवलंबून राहावे लागत असल्याचे बोलले जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून चांदूर रेल्वेच्या वीज समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी शहरवासीयांकडून जोर धरत आहे.सोमवारी रात्री उशिरापर्यंत वीज ये-जा सुरूच होती. नागरिकांच्या म्हणण्यानुसार रात्री सुमारे १२ वाजेपर्यंत वीजपुरवठा सुरळीत नव्हता. त्यानंतर सोमवार-मंगळवारच्या मध्यरात्री रामनगर परिसरातील वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला. रात्री २ ते ३ वाजताच्या दरम्यान गेलेली वीज मंगळवारी सकाळी सुमारे १०.१५ वाजता सुरू झाली. त्यामुळे रामनगरमधील नागरिकांना तब्बल ७ ते ८ तास अंधारात रात्र काढावी लागली. विशेष म्हणजे, सकाळी वीजपुरवठा सुरू झाल्यानंतरही नागरिकांची सुटका झाली नाही. मंगळवारी सायंकाळी पुन्हा काही वेळ शहरातील वीजपुरवठा खंडित झाल्याने संतप्त नागरिकांनी महावितरणाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. नागरिकांच्या मते, सध्या शहरात विजेचा पुरवठा केव्हा येईल आणि केव्हा जाईल याचा कोणताही नेम उरलेला नाही. वारंवारच्या या समस्येमुळे व्यापारी, विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. वारंवारच्या वीजखंडितामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी महावितरणने तात्काळ सुधारणा करावी, अन्यथा तीव्र लोकआंदोलन उभारण्याचा इशाराही दिला आहे.

### आमदार महोदय देणार का लक्ष ?

शहरात सुरू असलेल्या वारंवारच्या विजेच्या लपंडावामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. वीजपुरवठ्याच्या प्रश्नावर स्थानिक आमदारांनी महावितरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेऊन योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नोकरीसोबतच सामाजिक भान जपल्याने ही गर्दी -आ.गजानन लवटे

### प्रा.कमलकिशोर खेतान यांचा सेवानिवृत्ती सोहळा

**दर्यापूर/वार्ताहर**

कोणत्याही क्षेत्रात काम करत असताना आपल्या कामासोबत सामाजिक भान जपणे गरजेचे आहे. त्यामुळे आपली ओळख प्रत्येक व्यक्तीच्या मनात कायम राहते. अशाच प्रकारे प्रा कमलकिशोर खेतान यांनी नोकरीसोबतच सामाजिक भान जपल्याने त्यांच्या सेवानिवृत्ती सन्मान सोहळ्याला शेकडोंची गर्दी जमली असे प्रतिपादन दर्यापूरचे आमदार गजाननराव लवटे यांनी केले.ते दर्यापूर येथील माहेश्वरी भवन येथे आयोजित प्रा कमलकिशोर कालूरामजी खेतान यांच्या सेवानिवृत्ती सत्कार निमित्त आयोजित स्नेहमिलन सोहळ्यात अध्यक्ष म्हणून ते बोलत होते.



कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खासदार बळवंतराव वानखडे,शिक्षक आमदार ॲड.किरणराव सरनाईक,माजी मंत्री श्रीकांत देशपांडे,दर्यापूरच्या नगराध्यक्षा मंदाकिनी भारसाकळे,भाजपा शिक्षक सेल प्रदेशाध्यक्ष संगीता शिंदे,शिक्षक भारती संघटनेचे विभागीय अध्यक्ष सुरेश देवकर,सहकार नेते सुधाकर पाटील भारसाकळे,बाळासाहेब हिंगणिकर,बाबाराव पाटील बरवट, सुनील पाटील गावंडे,बाळासाहेब वानखडे,मदन पाटील गावंडे, बाळासाहेब टोळे,सुनील पाटील डीके,गोपाल अरबट,मदन पाटील बायस्कार,मनिष कोरपे,गुणवंत पाटिल हिगनीकर, भैय्या बरवट, दिनेश पारडे, शिवाजीराव देशमुख,प्रभाकर पाटिल तराळ,आसिफभाई,राजेंद्र वडाळ, ज्येष्ठ नागरिक अण्णासाहेब रेचे,प्रा.जी.के.पाटिल, नितेश वानखडे,ग्रामोद्धार शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अनिलराव तराळ,नगर परिषद उपाध्यक्ष अहमद खा,नगरसेवक रामूशेठ मालपाणी, दिनेश पारडे,भरत शुक्ला,मनोज बोरकर,शेखर राणे,गोपाल अग्रवाल ,नगर परिषद उपसभापती मंगला तराळे,नगसेविका वंदना सोळंकी तसेच पत्रकार मंडळीआदी उपस्थित होते.या प्रसंगी प्रा कमलकिशोर खेतान यांच्या पत्नी उर्मिला खेतान, मुलगा मयूर खेतान,सून रमा खेतान, मुलगी पुनम खेतान,मोठे बंधू ओमप्रकाश खेतान, सुनंदा खेतान,डॉ.सुरज खेतान व संपूर्ण खेतान परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.प्रास्ताविक धनंजय चौधरी संचालन व आभार प्रदर्शन प्रा धनंजय देशमुख यांनी मांडले.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खेतान परिवार व मित्र परिवार यांनी परिश्रम घेतले.

### प्रामाणिक कार्याची पावती

कोणत्याही क्षेत्रात प्रामाणिक कार्य केले की समाज त्याची दखल घेतो व त्याच्या कार्याची पावती निच्छीतच मिळत असते, अशा प्रकारे प्रा खेतान सर यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य उल्लेखनीय आहे, विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून ते परिचित आहेत.त्यांच्या प्रामाणिक कार्याची ही पावती आहे.

**सुधाकर भारसाकळे**

### प्रा.खेतान सर यांचे कार्य कौतुकास्पद

प्रा खेतान सर व मी वर्ग मित्र असून शालेय जीवनापासून त्यांचे व माझे मैत्रीचे संबंध आहे.त्यांनी शिक्षकी पेशात केलेले कार्य कौतुकास्पद असून विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे.त्यांचे सेवानिवृत्ती कार्याला शुभेच्छा आहेत.

**बळवंत वानखडे**
(खासदार,अमरावती)

### सेवानिवृत्ती कार्यक्रमाने भारावून गेलो

शिक्षक हा समाजाचा कणा असतो, सुसंस्कृत समाजाची निर्मिती शिक्षक करत असतो,शिक्षकाने जर प्रामाणिक कार्य केले तर समाज त्यांच्या कार्याचा गौरव नक्कीच करतो,याचा अनुभव मी आज घेतला,एवढा मोठा सेवानिवृत्ती सत्कार पाहून मी भारावून गेलो.

**-ॲड.किरण सरनाईक**

### कार्यक्रम संख्या हेच सरांचे कार्य सांगते

प्रा. कमलकिशोर खेतान यांनी शिक्षकी पेशा सांभाळत सामाजिक कार्यात पण सहभाग नोंदविला आहे,त्यांचे कार्य हे समाजोपयोगी असून अनेक विद्यार्थी त्यांनी घडवले,म्हणून आज एवढा भव्य सेवानिवृत्ती कार्यक्रम त्यांच्या आप्तगण लोकांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे.कार्यक्रम संख्या हेच सरांचे कार्य सांगून जाते.

**-संगीता शिंदे**

## संक्षिप्त

### पाचही झोनला यशवंत पाटील यांची भेट

**अमरावती-**जणगणना संचालनालय उप महानिबंधक यशवंत पाटील, उपायुक्त, शहर जनगणना अधिकारी योगेश पीठे, यांनी पाचही झोनला भेट देऊन जनगणना कामाचा आढावा - घेतला. या भेटीत जनगणना कक्ष व गटांना भेट देऊन कामाची - पाहणी केली. त्यांनी प्रगणक व - पर्यवेक्षक यांच्याशी संवाद साधून माहिती संकलन प्रक्रियेची - सद्यःस्थिती, कामातील प्रगती, येणाऱ्या अडचणी याबाबत चर्चा केली. कामाची गती, अचूकता वेळेत पूर्ण होणारे उद्दिष्ट याबाबतही त्यांनी माहिती घेतली.प्रगणकांकडून जमा होणारी माहिती ही पर्यवेक्षकांनी तपासून, शहानिशा करूनच पुढील प्रक्रियेसाठी पाठवावी, असे स्पष्ट निर्देश दिले. माहितीची गुणवत्ता अचूकता राखणे आवश्यक असून त्रुटी राहू नये, यावर त्यांनी विशेष भर दिला. जनगणना कामात आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून काम प्रभावी, पारदर्शक पद्धतीने करावे, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. क्षेत्रीय स्तरावर काम करताना समन्वय राखणे, वेळेचे पालन करणे यावरही त्यांनी मार्गदर्शन केले.

### अंजनगाव बारीचे दोन पुत्र भारतीय सैन्यात



**अंजनगाव बारी-**गावातील दोन होतकरू युवक श्रेयस ज्ञानेश्वर लांडोरे व सुमित गजानन निचत यांची भारतीय सैन्यात निवड झाल्याने अंजनगाव बारी गावात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या दोन्ही वीरपुत्रांच्या यशाने गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून, ग्रामस्थांनी जल्लोषात त्यांचा गौरव केला. भारतीय सैन्यात निवड होणे हे प्रत्येक युवकाचे स्वप्न असते. कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर श्रेयस व सुमित यांनी हे यश संपादन करून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या निवडीची बातमी समजताच ग्रामस्थांनी एकत्र येत सत्कार सोहळ्याचे आयोजन केले. यावेळी फटाक्यांची आतषबाजी, पुष्पहार व अभिनंदनाच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. गावातील युवक, ज्येष्ठ नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांच्या श्रेयस लँडोर, सुमित निचट पदाधिकाऱ्यांनी दोन्ही वीरपुत्रांचे अभिनंदन करून त्यांच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### प्रफुल्ल कुकडे यांना पुरस्कार

**अमरावती-**सामाजिक परिवर्तन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात सातत्याने योगदान देणारे साथी प्रफुल्ल कुकडे यांची महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने 'लक्ष्यवेधी कार्यकर्ता पुरस्कार-२०२६' साठी निवड करण्यात आली आहे. प्रफुल्ल कुकडे यांनी अमरावती जिल्ह्यात अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक विचारांचा प्रसार, सामाजिक प्रबोधन आणि जनजागृतीसाठी केलेल्या बहुमोल कार्याची दखल घेऊन त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.पुरस्काराचे वितरण अहिल्यानगर येथे आयोजित विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीत शनिवार ६ जून २०२६ रोजी करण्यात येणार असून त्यासाठी प्रफुल्ल कुकडे यांना उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले आहे.यशाबद्दल प्रफुल्ल कुकडे यांचे सर्व स्तरांतून संघर्ष संस्था ,क्रांती नवनिर्मिती राष्ट्रीय संघटन ,गुरुदेव सेवा श्रम ट्रस्ट, संविधान जागर अभियान,बचत गटातील महिला ,कामगार वर्ग व सामाजिक कार्यकर्ते यांची वतीने अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठीहोता शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

### स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी



**तिवसा-**श्री स्वामी विवेकानंद बहू. सामाजिक संस्था अंतर्गत श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय तिवसा येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. जयंती निमित्त वीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. तसेच त्यांनी केलेल्या कार्यावर उजाळा देण्यात आला.कार्यक्रमाला दिपक धानोरकर, यशवर्धन भगत, राजेश गोंडसे, सचिन काळे, कृणाल गौरखेडे, यश देशमुख, विशाल गडलिंग, प्रशांत डगवार,हृषीकेश गंधे, मोनिका येवले व इतर वाचक वर्ग उपस्थित होते.

## प्रजाहितदक्ष राजमाता अहिल्यादेवींचा विचारांचा वारसा जपा

### युवराज पवार यांचे प्रतिपादन

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**



तीर्थक्षेत्र टाकरखेडा मोरे ग्रामपंचायतच्या वतीने लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते युवराजभाऊ पवार यांनी अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव करत, त्यांच्या लोककल्याणकारी विचारांचा वारसा नव्या पिढीने जपण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमाला गावातील सरपंच, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य आणि परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे युवराज पवार यांच्यासह राजेश तायडे, अनिल बचे, मनोहर सोनटक्के, अतुल झाडे, प्रभाकर कानेरकर, गणेश इंगळे, राजकुमार गोबरे आणि पोलीस पाटील बंडू बचे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना युवराज पवार म्हणाले की, 'राजमाता अहिल्यादेवी होळकर या केवळ एक शासक नव्हत्या, तर प्रजेच्या डोळ्यातील अश्रू पुसणारी ती एक 'माता' होती. दूरदृष्टी, निष्कलंक चारित्र्य आणि त्यागाचा त्रिवेणी संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. म्हणूनच आजही त्या लोकांच्या हृदयात अढळ स्थान टिकवून आहेत.'अहिल्यादेवींच्या जयंतीनिमित्त गावात ठिकठिकाणी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.'प्रजाहित हेच राजहित' हा त्यांचा मूलमंत्र अंगीकारून स्त्री सन्मान, न्याय, धर्मरक्षण आणि समाजसेवेसाठी प्रत्येकाने झटले पाहिजे, असा संकल्प यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी केला. पुण्यश्लोक अहिल्यादेवींना अभिवादन करत या कार्यक्रमाची सांगता झाली.

# पुलांची मजबुती आणि सरकारची योग्यता



बिहारमध्ये गंगा नदीवर बांधण्यात येत असलेला अगुवानी सुलतानगंज चार पदरी पूल हा अंदाजे १,७१० कोटी रुपये खर्चाचा प्रकल्प होता. भाजप-नितीश आघाडी सरकारच्या काळात याचे बांधकाम सुरू होते.एप्रिल २०२२ मध्ये त्याचा एक भाग कोसळला, त्यानंतर ४ जून २०२३ रोजी पुलाचा संपूर्ण वरचा भाग गंगेत बुडाला आणि ऑगस्ट २०२४ मध्ये पुन्हा खांब आणि संरचनेचे काही भाग कोसळले. तोच पूल, तोच प्रकल्प, तीन मोठे अपघात.नंतर, तज्ज्ञांनी रचना आणि बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि रचनेत सुधारणा करून प्रकल्पाची पुनर्रचना करावी लागली. प्रश्न असा आहे की: १,७१० कोटी रुपये खर्चाचा पूल लोकांसाठी खुला होण्यापूर्वीच तीन वेळा कसा कोसळू शकतो?

इतिहासाचा विचार करा. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कारकिर्दीत १९५९ मध्ये अंदाजे ७ कोटी रुपये खर्च करून बांधलेला राजेंद्र सेतू आजही वापरात आहे. इंदिरा गांधींच्या कारकिर्दीत १९८२ मध्ये बांधलेला महात्मा गांधी सेतू अनेक दशके बिहारची मुख्य जीवनरेखा राहिला.त्यावरून लाखो वाहने जात असत, प्रचंड वाहतूक सुरू असे आणि नंतर त्याची पोलादी रचना अधिक मजबूत करण्यात आली, परंतु बांधकामादरम्यान तीनदा पूल कोसळण्याच्या घटना कधीच घडल्या नाहीत.

गुजरातमधील मोरबी पूल दुर्घटना आठवा. मच्छू नदीवरील या ऐतिहासिक झुलत्या पुलाच्या दुरुस्ती आणि नूतनीकरणासाठी अंदाजे २ कोटी रुपये खर्च आला. हा पूल ३० ऑक्टोबर २०२२ रोजी लोकांसाठी खुला करण्यात आला आणि काही दिवसांनंतरच तो नदीत कोसळला.१३५ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. तपासात प्रश्न उपस्थित झाले: जुन्या केबल्स का बदलल्या नाहीत? सुरक्षा चाचण्या किती व्यापक होत्या? जबाबदार कोण होते? पण या प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी, भक्तांना प्रश्न विचारणाऱ्यांवर हल्ला करणे अधिक महत्त्वाचे वाटले.

पी.व्ही. गांधींच्या कार्यकाळात १९९२ मध्ये ३८८ कोटी रुपये खर्च करून बांधलेला विद्यासागर सेतू... नरसिंह राव पूल हा देखील एक केबल-स्टेड पूल आहे. तो आजही कोलकातामधील लाखो वाहनांचा भार पेलतो. तो तीन वेळा कोसळला नाही, किंवा त्याच्या उद्घाटनानंतर काही दिवसांत कोणतीही दुर्घटना घडली नाही. फरक फक्त एवढाच आहे की, तेथील अभियांत्रिकीचे मूल्यमापन परिणामांवर केले जाते, प्रसिद्धीवर नाही.

२९ मे २०२६ रोजी, उत्तर प्रदेशातील हमीरपूर जिल्ह्यातील बेटवा नदीवरील बांधकामाधीन पुलाचा एक भाग जोरदार वादळ आणि पावसात कोसळला. सहा कामगार ढिगाऱ्याखाली गाडले गेले. कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पाचे काम सुरू होते. अपघातानंतर चौकशीचे आदेश देण्यात आले. आपल्या देशात, चौकशी अनेकदा अपघातापूर्वी नाही, तर अपघातानंतर सुरू होते.

राजीव गांधींच्या कार्यकाळात १९८७ मध्ये आसाममधील विशाल आणि खवळलेल्या ब्रह्मपुत्रा नदीवर बांधलेला कोलिया भोमोरा पूल, जवळपास चार दशकांनंतरही आजही उभा आहे. दरवर्षी पूर, वादळे आणि नदीचा खवळलेला प्रवाह येतो, पण पूल आपल्या जागी टिकून आहे.

कदाचित त्या वेळी कॅमेऱ्यांची संख्या कमी होती आणि अभियंत्यांची जबाबदारी अधिक होती.

**✍ धनाजी कोठावळे**

९ जुलै, २०२५ रोजी, गुजरातच्या वडोदरा जिल्ह्यातील महिसागर नदीवरील गंभारी-मुजपूर पूल अचानक कोसळला. अनेक वाहने नदीत पडली. अंदाजे नऊ जणांचा मृत्यू झाला. या अपघातानंतर, गुजरातभरातील २,१०० हून अधिक पुलांचे तातडीचे संरचनात्मक परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्यात आले आणि इतर पाच पूल धोकादायक ठरवून ते बंद करावे लागले. प्रश्न असा आहे की: जर हे परीक्षण आधीच केले असते, तर जीव वाचवता आले असते का?

लाल बहादूर शास्त्री यांच्या कारकिर्दीत १९६५ मध्ये बांधलेला जवाहर सेतू, ६० वर्षांहून अधिक काळानंतरही कार्यरत आहे. सोन नदीवरील हा पूल आजही वाहतूक हाताळतो. त्या काळातील अभियंत्यांकडे आज आपल्याकडे असलेले तंत्रज्ञान नव्हते, पण त्यांची जबाबदारी निश्चितच होती.

आता भागलपूरच्या विक्रमशिला सेतूचा विचार करा. हा ४.७ किमी लांबीचा पूल २००१ साली खुला करण्यात आला. तज्ज्ञ अनेक वर्षांपासून त्याच्या सांध्यांमधील आणि बेअरिंग्जमधील दोषांबद्दल इशारा देत होते. पण ते इशारे प्रलंबित राहिले. ४ मे २०२६ रोजी, खांब क्रमांक १३३ जवळील एक भाग कोसळला, ज्यामुळे पुलाचे दोन तुकडे झाले. अवजड वाहनांची वाहतूक थांबवावी लागली. सुदैवाने, यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, पण हा अपघात अचानक घडला नाही; कारण तसे इशारे आधीच देण्यात आले होते.

दरम्यान, इंदिरा गांधींच्या कार्यकाळात १९७५ मध्ये बांधलेला फरक्का बॅरेज रेल्वे-रस्ते पूल आजही अवजड मालगाड्या आणि रस्ते वाहतुकीसाठी वापरला जातो. विक्रमशिला पुलापेक्षा खूप जुना असूनही, तो अजूनही सुस्थितीत आहे. याचे कारण अगदी सोपे आहे: बांधकामाचा दर्जा आणि देखभाल.

आता, माझा एक साधा प्रश्न आहे. नेहरू, शास्त्री, इंदिरा, राजीव आणि नरसिंह राव यांच्या काळात बांधलेले पूल ४०, ५० आणि ६० वर्षांनंतरही उभे आहेत, पण आज हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प बांधकामादरम्यान कोसळत आहेत, तर प्रश्न विचारणे हा गुन्हा आहे का ?१७१० कोटी रुपयांचा पूल तीन वेळा कोसळला तर जनतेने टाळ्या वाजवाव्यात का? १३५ लोकांचा मृत्यू झाला तर केवळ श्रद्धांजली वाहून हा प्रश्न सुटावा का? अपघातानंतर वारंवार लेखापरीक्षण केले जात असेल, तर याला सुशासन म्हणता येईल का?

देशभक्ती म्हणजे सरकारच्या प्रत्येक चुकीवर गप्प बसणे नव्हे. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा निषेध नसून एक जबाबदारी आहे.

जनतेच्या कराच्या पैशातून बांधलेल्या प्रत्येक पुलाचा, प्रत्येक रस्त्याचा आणि प्रत्येक प्रकल्पाचा हिशोब मागणे हा नागरिकांचा हक्क आहे.खरी देशभक्ती म्हणजे जनतेच्या पैशाचा हिशोब मागणे. कारण पुलांवरील पोस्टर्स, भाषणे आणि जाहिराती काही वर्षे टिकतात, पण पुलांची मजबुती अनेक दशकांपर्यंत सरकारांची खरी योग्यता दर्शवते.



# ..आता तरी 'सुस्त' प्रशासन 'जागे' होईल?

'पुणे तिथे काय उणे' असे पुण्याच्या महतीबद्दल प्रत्येक पुणेकर स्वाभिमान आणि अभिमानाने सांगत असतो. पुण्याला 'विद्येच माहेरघर' असेही म्हटले जाते. नुकत्याच उघडकीस आलेल्या आणि पुणे शहराला कलंक लावणा-या 'नीट पेपरफुटी' प्रकरणाचा धुरळा खाली बसत नाही तोच, 'विषारी दारुकांडा'ने राज्याची 'सांस्कृतिक राजधानी' असलेल्या पुणे शहराला पुन्हा एकदा बदनामीला सामोरे जावे लागले.

पिंपरी चिंचवड आणि हडपसर या दोन ठिकाणी काही गरीब लोकांनी गावठी दारू प्राशन केली. जास्त नफा मिळावा या लालची उद्देशाने या दारुत जास्त प्रमाणात 'मिथेनॉल' हे रसायन मिसळण्यात आले होते. औद्योगिक वापराचे 'मिथेनॉल' हे अत्यंत विषारी असते. उत्पादन खर्च कमी करून नशा वाढविण्यासाठी अवैध 'दारुमाफिया' याचा वापर करतात. हे रसायन मानवी शरीरात अत्यंत घातक असे 'फॉर्मिक ॲसिड तयार करते. याचा थेट मज्जासंस्थेवर परिणाम होऊन अंधत्व येते आणि काही अवयव निकामी होऊन अखेर मृत्यू होतो. अशी ही अत्यंत विषारी दारू या तळीरामांनी प्याली होती. परिणामी त्यांना उलट्या होणे, मळमळ होणे, डोळ्यांवर अंधारी येणे, तोंडाला फेस येण ो, पोटात दुखणे असा त्रास होऊ लागला. परंतु, उपचार सुरू असताना आतापर्यंत सुमारे २४ तळीरामांसाठी तो अखेरचा आणि 'विषा'चा प्याला ठरला.प्रथम पिंपरी चिंचवडच्या फुगेवाडी येथील १२ नागरिक मृत्युमुखी पडले. नंतर हे लोण हडपसरपर्यंत पोहोचून तेथील ६ मद्यपींचा बळी गेला. दुस-या दिवशी पुन्हा ६ नागरिक मृत झाल्याने आतापर्यंत या विषारी दारुने एकूण २४ जणांचा बळी घेतला आहे. तर ९ ते १० रुग्णांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. केवळ २० रुपयांत या दारुचा एक फुगा मिळत असल्याने; आणि ब-याच ठिकाणी ही दारू विक्रीसाठी गेल्याने अनेक तळीरामांनी ही दारू प्याली असणार. त्यामुळे मृतांची संख्या अजूनही वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

गावठी विषारी दारुच्या या थैमानाने सरकार खडबडून जागे झाले; आणि या 'कांडा'ची गंभीरपणे दखल घेतली गेली. मुख्य मंत्र्यांनी नेहमी प्रमाणे या 'कांडा' तील सहभागी आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत. पोलि सांनी दिलेल्या

**✍ प्रदीप व्ही. खोलमकर**

माहितीनुसार, हडपसर परिसरातील आकाश जाधव नावाच्या व्यक्तीने सदरच्या दारुची विक्री केली होती. तसेच, इतर काहींच्या मदतीने त्यानेच ही दारू बनविली होती. तर, योगेश वानखेडे नावाच्या सराईत गुन्हेगाराने एका कॅनमागे ८०० रुपये नफा व्हावा, या हव्यासापाई 'मिथेनॉल' मिसळले होते. आतापर्यंत पोलिसांनी १० व्यक्तींना अटक केली असून महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे उल्लंघन आणि सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल केले आहेत.

जे घडू नये, ते घडून गेले. आता प्रश्न असा उपस्थित होतो की, या २४ जीवांच्या मृत्यूला खरे जबाबदार कोण? अवैध दारू विक्री करणारे, 'मिथेनॉल' मिसळणारा, 'मिथेनॉल' विकणारा या सर्वांवर गुन्हे दाखल होऊन त्यांना अटकही करण्यात आली आहे. एकट्या पुण्यातच नाही तर संपूर्ण राज्यात मटका, जुगार, वेश्या व्यवसाय, दारुविक्री असे अवैध व्यवसाय पोलिसांच्या कृपार्शिवादाने राजरोस चालू आहेत; आणि त्यांच्यावर 'वरदहस्त' असतो राजकीय पुढा-यांचा. याशिवाय हे व्यवसाय चालूच शकत नाही. या प्रकरणात २१ पोलिस अधिकारी आणि कर्मचा-यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्यावर सुध्दा सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून अटक व्हायला हवी. मुख्यमंत्र्यांनी पाळेमुळे खणून काढण्याची घोषणा केली. खरेच तसा तपास झाला तर याचे राजकीय कनेक्शनही समोर आल्याशिवाय राहणार नाही. सुस्त आणि ढिम्म प्रशासनाबद्दल काय बोलावे हेच समजत नाही. ते कायम 'वरातीमागून घोडे' या भूमिकेत असते. कितीही दुर्घटना घडो पण, त्यातून बोध घेऊन ते त्या भूमिकेतून बाहेरच पडत नाही. त्यामुळेच आग लागणे, विषारी दारुकांड, होर्डींग्स पडणे, पूल कोसळणे, मोठे अपघात, धार्मिक कार्यक्रमात चेंगराचेंगरी, धरणांत किंवा समुद्रात पर्यटकांना जलसमाधी मिळणे, महिलांवर रोज होणारे अत्याचार अशा नानाविध दुर्घटनांची पुनरावृत्ती होत असते.पुण्याच्या या 'कांडा' तील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी; आणि या घटनेवरून आता तरी प्रशासनाने बोध घेऊन, भविष्यात पुनरावृत्ती होणार नाही, याची काळजी घ्यावी, एवढीच माफक अपेक्षा.

नाशिक
मो-८७६७५९२९८०

# ... तेव्हा परिवर्तनाचा इतिहास घडतो !

दहा दिवसाआधी आदरणीय शेषरावजी खाडे यांच्या ७५ वर्षाच्या निमित्ताने एक अभिष्टचिंतन सोहळा संपन्न झाला, त्यात 'कृत्रिम प्रज्ञा 'हे पुस्तक प्रकाशित केलं. काही अपरिहार्य कारणाने त्या कार्यक्रमाला मला जाता आलं नाही. तेव्हा काल मी त्यांना भेटायला गेलो. तेव्हा त्यांनी मला पुस्तक भेट दिले. त्या पुस्तकाच्या शेवटी लिहिले होते,'सामान्य माणूस हा खरोखरच सामान्य असतो का? नाही, तो असामान्यच असतो.' असे विचार ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी व लेखक शेषरावजी खाडे यांनी त्यांच्या 'कृत्रिम प्रज्ञा' या पुस्तकाच्या मलपुष्टात मांडले आहेत. इतिहासाचा मागोवा घेतला तर हे सत्य वारंवार अधोरेखित झालेले दिसते. जगातील मोठ्या क्रांत्या, सामाजिक परिवर्तनाची आंदोलने आणि स्वातंत्र्यलढे हे सत्ताधारी, धनाढ्य किंवा प्रस्थापित वर्गाने घडवले नाहीत; ते सामान्य माणसांनीच घडवून आणले. त्यामुळे सामान्य माणूस हा समाजपरिवर्तनाचा खरा शिल्पकार आहे.ऑक्टोबर- नोव्हेंबर २०२६ मध्ये अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे विचार अधिक अर्थपूर्ण वाटतात.

निवडणुकीच्या मैदानात विविध क्षेत्रांतील प्रभावशाली व्यक्ती उतरल्या आहेत. कोणी मोठे संस्थाचालक आहेत, कोणी उद्योग-व्यवसायाशी संबंधित आहेत, कोणी राजकीय पक्षांचे प्रतिनिधित्व करत आहेत, तर कोणी आर्थिक ताकदीच्या बळावर निवडणुकीचे गणित मांडत आहेत. परंतु या सर्व गदारोळात एक प्रश्न दुर्लक्षित राहतो. शिक्षक मतदारसंघ हा खरोखर कोणाचा आहे? पैसा आणि प्रतिष्ठेचा की शिक्षकांच्या प्रश्नांसाठी झटणाऱ्या शिक्षकांचा?

२०२० च्या अमरावती शिक्षक मतदारसंघ निवडणुकीनंतर समाजात एक वेदनादायी चर्चा सातत्याने ऐकायला मिळाली. पैशांचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला, भेटवस्तूंचे वाटप झाले, अप्रत्यक्षपणे शिक्षक मतांची खरेदी झाली, अशी टीका अनेक स्तरांवर झाली. काही ठिकाणी तर 'पैठणीच्या मोबदल्यात शिक्षक विकले गेले' अशी बोचरी टीकाही समाजात झाली. ही टीका योग्य की अयोग्य हा वेगळा विषय असू शकतो. परंतु या चर्चेमुळे शिक्षक समाजाच्या प्रतिमेला धक्का बसला, हे मात्र नाकारता येणार नाही.

आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, एखादा सर्वसामान्य शिक्षक निवडणूक लढवण्याचा विचार करतो तेव्हा त्याला सर्वप्रथम विचारले जाते,'तुम्ही किती कोटी रुपये खर्च करू शकता?' हा प्रश्न केवळ त्या व्यक्तीला नाही तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थेलाच विचारला गेलेला प्रश्न आहे. आयुष्यभर प्रामाणिकपणे अध्यापन करणाऱ्या शिक्षकाकडे कोट्यवधी रुपयांची संपत्ती असणे शक्य आहे का? आणि जर निवडणूक जिंकण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागत असतील, तर ते पैसे परत मिळविण्याचा मोह निर्माण होणार नाही का? आज शिक्षक मतदारांसमोर केवळ उमेदवार निवडण्याचा प्रश्न नाही, तर स्वतःची सुरक्षितता आणि भविष्यातील शिक्षण व्यवस्थेचे संरक्षण करण्याचा प्रश्न आहे. शिक्षकांच्या समस्या कोण समजून घेतो? टप्पा अनुदानित शाळेचे प्रश्न,अनुदानित शाळांचे प्रश्न, सेवाशर्ती, जुनी पेन्शन, वेतनातील विसंगती, संस्थाचालकांचे मनमानी निर्णय, प्रशासकीय अन्याय आणि भ्रष्टाचाराविरुद्ध कोण सातत्याने लढतो? या प्रश्नांची उत्तरे शोधून मतदान करणे ही काळाची गरज आहे. अनेक शिक्षक कार्यकर्ते वर्षानुवर्षे कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता संघर्ष करत आहेत. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापक आणि शिक्षण संस्थांच्या प्रश्नांसाठी त्यांनी रस्त्यावर उतरून लढे उभारले. प्रशासनाचे दरवाजे ठोठावले. न्यायासाठी आंदोलने केली. या कार्यकर्त्यांकडे मोठा पैसा नसू शकतो परंतु त्यांच्याकडे प्रश्नांची जाण, संघर्षाची परंपरा आणि शिक्षकांविषयीची बांधिलकी आहे.

**✍ प्रा.डॉ.प्रशांत विघे**

शिक्षक मतदारसंघातील निवडणूक ही राजकीय पक्षांची ताकद सिद्ध करण्याची स्पर्धा नसावी. ती शिक्षकांच्या स्वाभिमानाचे प्रतिनिधित्व करणारी प्रक्रिया असली पाहिजे. कोणत्याही राजकीय पक्षाची 'पाटी' बनण्यापेक्षा शिक्षकांनी स्वतःची स्वतंत्र ओळख जपणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण पक्षांचे हित आणि शिक्षकांचे हित नेहमीच समान असतील असे नाही.

शिक्षकांची सुरक्षितता, शिक्षकांचा स्वाभिमान आणि शिक्षण व्यवस्थेचे भवितव्य यांना प्राधान्य देणारे नेतृत्व निवडणे हीच खरी लोकशाही आहे. प्रत्येक शिक्षकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे.आपण पैशाच्या प्रभावाला बळी पडणार आहोत की आपल्या प्रश्नांची जाणीव असलेल्या नेतृत्वाच्या मागे उभे राहणार आहोत? आपण आपल्या मताचा उपयोग व्यवहारासाठी करणार आहोत की परिवर्तनासाठी?

सिनेट सदस्य, संत गाडगे
अमरावती विद्यापीठ, अमरावती
मो.९३२६८७७७४९

# ...शिवराज्याभिषेक अलौकिक महत्त्व व गरज


६ जून १६७४ या दिवशी रायगडावर विधिवत संपन्न झालेला शिवरायांचा राज्या भिषेक ही ऐतिहासिक घटना संपूर्ण भारतासाठीच अनन्यसाधारण अशी घटना होती. मध्ययुगीन काळातील विविध अन्यायी यावनी सत्तेच्या राजवटीविरोधात कल्याणकारी व प्रजावत्सल तसेच लोककल्याणकारी राज्याची निर्मिती करून भविष्यातील आदर्श राज्याची मुहूर्तमेढच छत्र धारण करून शिवरायांनी रुजवली.

राज्याभिषेक होण्यापूर्वीच आदर्श व दुर्गम असा रायरीचा गड हेरुन तेथे आवश्यक बांधकाम करून महाराजांनी याला रायगड हे नाव दिले. राज्याभिषेकापूर्वी इंग्रज वकील थॉमस निकोलसन हा १६७३ च्या मे महिन्यात या गडावर व्यापारी बोलणी करण्यासाठी आला होता. त्याने असे वर्णन केले आहे की, अगदी मोजक्या शिबंदी सह हा किल्ला मराठे लढवू शकतात. जगातील बलाढय शत्रू जरी येथे आला तरीही गड कधीच पराजित होऊ शकणार नाही. महाराजांनी या किल्ल्याची राजधानी म्हणून केलेली निवड किती सार्थ होती हे यातून समजून घेता येते. याच दुर्गम गडावर राज्याभिषेकचा अवर्णनीय सोहळा पार पडला.

मूळचे महाराष्ट्रातील पैठणचे मात्र अनेक पिढयांपासून वाराणसीला स्थायिक झालेल्या गागाभट्ट यांनी राज्याभिषेक सोहळा विधिवूर्वक संपन्न करून व शिवरायांवर छत्र धरले. अनेक आव्हानांना लिलया पेलून राजे ख-या अर्थाने छत्रपती बनले.या राज्याभिषेक प्रसंगी सुरत येथील इंग्रज व्यापारी हेन्री ऑक्सिंडेन व त्याचे दोन सहकारी थॉमस मायकेल व जॉर्ज रॉबिन्सन यांच्या सहित रायगडला आला. विशेष म्हणजे ३ मे ते ६ जून १६७४ पर्यंत हे तिघेही तब्बल ३३ दिवस रायगडावर उपस्थित होते. हेन्रीने राज्याभिषेक प्रसंग व रायगडावरील लोक, मेजवानी व्यवस्थापन, बाजार, राजाचे पाहुणे, सोहळा विधी, सिंहासन इत्यादी अनेक बाबी स्वतःच्या डायरीमध्ये नोंदविल्या म्हणून छत्रपतींचा राज्याभिषेक सोहळा कसा होता हे आजही अनुभवता येऊ शकते हे विशेष.

महाराजांना त्याकाळी राज्याभिषेक का करून घ्यावा लागला व त्याची गरज का वाटली हे समजून घेण्यासाठी अनेक पैलूंचा अभ्यास करावा लागतो. अनेक कारणे राज्याभिषेकासाठी कारणीभूत होती. ती कारणे संक्षिप्तपणे समजून घ्यावी लागतात.

मध्ययुगीन काळात संपूर्ण हिंदुस्थानातच यावणी सत्तांनी धुमाकुळ घातला होता. तत्कालीन उत्तरेतील मोघल व दक्षिण भारतातील विजापूरची



आदिलशाही तसेच गोवलकोंडा येथील कुतूबशाही या मुस्लिम सत्ता लोकाभिमुख नव्हत्या. शिवाय इथियोपिया येथून आलेले व पुढे सिध्दी नावाने ओळखल्या गेलेले हबसान प्रांतातील सिध्दी यांनीही धार्मिक उच्छाद मांडून प्रजेची पिळवणूक केली होती. वरील सर्व सत्ताधीश मूळचे भारताबाहेरून आलेले होते. येथील प्रजा, धर्म, संस्कृती यांच्याविषयी कोणतेही सोयरसुतक यांना असण्याचे कारण नव्हते. त्या पार्श्वभूमीवर इतदेशीय राजाची सत्ता प्रजेसाठी आवश्यक होती.

विजयनगर या हिंदू सत्तेचा अस्त सन १५६५ या वर्षी तालीकोट युध्दात झाला. त्यामुळे इतदेशीय सत्तेची गरज लक्षात घेता राजांचा राज्याभिषेक होणे आवश्यक होते.सन १५१० या वर्षी पोर्तुगीजांनी गोवा हा प्रांत आदिलशाहाकडून जिंकून घेतला. त्यानंतर डच, इंग्रज व फ्रेंच यांनीही भारतातील विविध प्रांतात आपल्या वखारी काढल्या. या परकीय व्यापा-यांचा उद्देश भारत बळकावणे हाच होता. तत्कालीन भारतातील सत्ताधीशांमध्ये युरोपीय लोकांचा मूळ उद्देश समजून घेऊन त्यांना भविष्यात रोखण्याची दूरदृष्टी नव्हती. शिवाजी महाराजांना मात्र हा धोका लक्षात आला होता व त्यादृष्टीने स्वराज्य निर्माण करून राज्याभिषेकची आवश्यकता होती.

सार्वभौम राजसत्तेला मध्ययुगीन काळात विशेष स्थान होते. राजा हा ईश्वराचा अंश मानला जाई. राजेपद हे वंशपरंपरेने मानले जाई. राजाने दिलेले कौल, वतनपत्रे, सनद इत्यादींना महत्व व मान्यताही असे. परिणामी महाराजांना राज्याभिषेक करणे अत्यावश्यक होते. कारण जनसमुदायात शिवरायांबद्दल अपार श्रध्दा असूनही व्यावहारीकरित्या प्रजेला आदिलशाही व मोगली सनदाच महत्वाच्या वाटायच्या. या बाबीला राज्याभिषेका द्वारेच उत्तर दिले जाऊ शकत होते.त्या काळी मोगल व दक्षिणेतील शाह्यांनीही शिवाजी म्हणजे बंडखोर व टोळ्या जमवून लुटालूट करणारा

**✍ डॉ. श्रीकांत पाटील**

जमीनदाराचा पोरगा असा प्रचार चालविला होता. एवढेच नव्हे, तर पोर्तुगीज, डच, इंग्रज व फ्रेंच सुध्दा महाराजांना दरोडेखोर, लुटारू वा बंडखोर इत्यादी विशेषणांनीच संबोधित. त्या पार्श्वभूमीवर विधिवत राज्याभिषेक होणे गरजेचेच होते.

महाराजांच्या ताब्यात ३४० च्या वर गडकोट होते. राजांनी विविध जलदुर्ग व मध्ययुगीन काळात प्रथमच आरमाराचीही स्थापना केली होती. स्वतःच्या एका सलग भूप्रदेशावर अंकुश ठेवण्यासाठी व त्या प्रदेशातील जनतेवर नियंत्रण ठेवणे व कायद्याचे अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी राज्याभिषेक ही बाब आवश्यक होती.त्याकाळी जनसामांन्यात अशी भावना होती की, कलियुगात म्लेंच्छांचेच राज्य येईल व प्रजेला हाल स्विकारल्याशिवाय पर्याय नसेल. तत्कालीन विविध ग्रंथांनीही वरील गैरसमजला हातभार लावला होता. अर्थात वरील गैरसमज दूर करण्यासाठी लोकोत्तर कार्य केलेल्या शिवरायांना राज्याभिषेक करणे अगत्याचे होते.महाराष्ट्रातील अनेक नामांकित घराणे, उदा. जाधव, भोसले, घोरपडे, निंबाळकर, घाटगे, खोपडे इत्यादींनाही शिवाजी राजे हे स्वतःसारखेच जमीनदार वाटत. विशेष बाब ही की, यातील अनेक जण महाराजांचे गणगोत होते. मात्र राजांची कर्तबगारी स्वीकारण्याची त्यांची मानसिकता नव्हती. याउलट आदिलशाही किंवा मोगल त्यांना जवळचे वाटून त्यांचीच चाकरी करण्यात त्यांना धन्यता वाटे. परिणामी अनेक आणीबाणीच्या प्रसंगात वरील मंडळी शत्रूला सामील होऊन महाराजांना त्रासदायक ठरत. परिणामी आपले आदेश यांच्यावर चालले पाहिजे, जेणेकरून यांना नियंत्रित ठेवता येईल यासाठी स्वराज्य निर्माण करणे स्वअस्तित्व सिध्द करण्यासाठी राज्यभिषेक करणे गरजेचे होते.

विविध सत्ताधीशांसोबत बरोबरीचे बोलणे करणे व त्याला वैधानिक स्वरुप प्राप्त करून देण्यासाठी राज्याभिषेकची आवश्यकता होती.महाराजांनी तयार केलेले प्रजावत्सल कायदे, राज्यव्यवहार कोष, इत्यादीची परिणामकारक अंमलबजावणीसाठी राजा म्हणून मान्यता मिळवण्यासाठी राज्यभिषेकाची आवश्यकता होती. मराठयांच्याच नव्हे, तर संपूर्ण भारतासाठीही व जगासाठीही अत्यंत प्रेरणादायक घटना म्हणजे राज्याभिषेक होता. शिवरायांनी समर्थपणे निर्माण केलेली राजवट चिरकाल टिकण्यासाठी राज्याभिषेक किती महत्वाची बाब ठरली हे औरंगजेबाने मराठयांना नष्ट करण्यासाठी दक्षिणेवर १६८० ला केलेल्या पाशवी आक्रमणाचा विचार केल्यास लक्षात येते. या आक्रमणाचा मराठयांनी सक्षमपणे मुकाबला केला.

शेवटपर्यंत मराठा साम्राज्य औरंगजेबला नष्ट करता आले नाही. त्याचा खजिना, मनुष्यबळ येथेच संपुष्टात येऊन १७०७ या वर्षी दक्षिणेतच त्याची कबर खोदल्या गेली. २७ वर्षाचा दीर्घ संघर्ष मराठे देऊ शकले, कारण शिवछत्रपतींचे लोकाभिमुख स्वराज्य व स्वाभिमानी दृष्टीच होय.

संचालक, आजीवन अध्ययन व
विस्तार विभाग, संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ

# लाडकी बहीण योजनेतील अडचणींवर आमदार साजिद पठाण आक्रमक

■ प्रतिनिधी | अकोला ■

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रियेमुळे महिलांना होत असलेल्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी बुधवारी महिला व बाल विकास विभागाच्या कार्यालयाला अचानक भेट देत प्रशासनाच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी लाभार्थी महिलांकडून विविध तक्रारी ऐकून घेत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरत तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

## महिला व बाल विकास कार्यालयात आकस्मिक धडक अधिका-यांना सुनावले, सरकारवरही टीकेची झोड

लाडकी बहीण योजनेच्या लाभासाठी ई-केवायसी करण्यासाठी महिलांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असून अनेक महिलांना वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याच्या तक्रारी आमदार पठाण यांच्याकडे पोहोचल्या होत्या. त्यानंतर त्यांनी थेट कार्यालयात जाऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी उपस्थित महिलांनी तांत्रिक अडचणी, कागदपत्र पडताळणीतील विलंब आणि प्रशासनाकडून मिळणाऱ्या अपुऱ्या प्रतिसादाबाबत नाराजी व्यक्त केली.



या वेळी राज्य सरकारवर टीका करताना आमदार पठाण म्हणाले की, 'लाडकी बहीण योजना महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सुरू करण्यात आली. मात्र आज पात्र महिलांनाच विविध कारणांवरून अपात्र ठरविले जात आहे. जर महिलांना लाभ द्यायचाच नव्हता, तर ही योजना सुरू करण्यामागचा उद्देश काय होता? निवडणुकीपुरतीच ही योजना राबविण्यात आली होती का, असा प्रश्न आता महिलांच्या मनात निर्माण झाला आहे.'

लाखो महिलांना योजनेपासून वंचित ठेवण्याचा प्रकार गंभीर असल्याचे सांगत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. शासकीय योजनांचा लाभ मिळविताना महिलांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असेल, तर त्या योजनेचा मूळ हेतूच फोल ठरतो, असेही त्यांनी नमूद केले. कार्यालयातील अधिकाऱ्यांशी चर्चा करताना आमदार पठाण यांनी महिलांशी सन्मानपूर्वक आणि संवेदनशीलतेने वागण्याच्या सूचना दिल्या.

### 'महिलांची फरफट थांबवा'

लाडकी बहीण योजनेच्या लाभासाठी येणाऱ्या महिलांना वारंवार कार्यालयात येण्यास भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी गंभीर आहेत. लाभार्थींना वेळेवर सेवा मिळाली पाहिजे. अन्यथा हा प्रश्न विधिमंडळात उपस्थित करून सरकारकडून उत्तर मागितले जाईल, असा इशारा आमदार साजिद खान पठाण यांनी दिला.

तसेच प्रलंबित अर्जांचा जलद निपटारा करून ई-केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश दिले. लाभार्थी महिलांची गैरसोय कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. योजनेतील अडचणी त्वरित दूर न झाल्यास आगामी विधानसभा अधिवेशनात हा प्रश्न प्रभावीपणे उपस्थित करून सरकारला जाब विचारला जाईल, असा इशाराही आमदार पठाण यांनी दिला.

यावेळी अकोला शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा कशिश खान, नगरसेविका सुवर्णरेखा जाधव, ताबिंदा अहमद, शहाना शेख, रेखा डोंगरे, रंजना चावरे, दीक्षा चावरे, कुसुम चव्हाण यांच्यासह महिला काँग्रेसच्या पदाधिकारी आणि योजनेपासून वंचित राहिलेल्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक : ४१/२०२६ कलम - १९ जा.क्र. १२८६/२०२६

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -** लुंबिनी बुद्ध विहार ट्रस्ट, पारस, ता. बाळापुर जि. अकोला

**अर्जदार : -** कविता प्रकाश भोसले रा.मु.पो.पंचशील नगर, रेल्वे स्टेशन, पारस, ता. बाळापुर जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत (वर्णन) :- रोख रक्कम रु. १००१/- कविता प्रकाश भोसले यांचे ताब्यात आहे. आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-०८/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
**दयानंद मारूती वाघमारे यांचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/६६/२०२६
कौसल्या शिवराम वानखडे वि. कोणीही नाही
पुढिल तारिख : १२-०६-२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती कौसल्या शिवराम वानखडे वय अं ७८वर्ष धंदा घरकाम रा. गायगांव ता. बाळापूर जि. अकोला २. सिध्दार्थ शिवराम वानखडे वय अं ४४ वर्ष धंदा खाजगी नोकरी रा. गायगांव ता. बाळापूर जि. अकोला ह.मु. पनवेल, डि.विंग १०५, पुष्प सिंधु सीएचएस, पनवेल ता. पनवेल जि. रायगड

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलभ २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत चंद्रमनी शिवराम वानखडे हे दिनांक ०३.०९.२०२३ रोजी मौजे गायगांव ता. बाळापूर जि. अकोला येथे मरण पावले. मयत शिवराम झागोजी वानखडे हे दिनांक ०६.०३.१९८५ रोजी मेन हॉस्पीटल अकोला येथे मरण पावले. वरील नमूद अर्जदार यांना मयत चंद्रमनी शिवराम वानखडे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक १२.०२.२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २४.०२.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९८/२०२६ प्रोसेस नं.२८७/२०२६
चौ.ता. २०/०४/२०२६ दिनांक : २०/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती सुभद्रा ज्ञानदेवराव गिऱ्हे वय ८६ वर्षे, धंदा-घरकाम २. गजानन मोतीराम नागपुरे वय ८४ वर्षे, धंदा-शेती ३. प्रभुदास मोतिराम नागपुरे वय ८५ वर्षे, धंदा-शेती ४. ब्रम्हदेव मोतिराम नागपुरे वय ८९ वर्षे, धंदा-शेती ५. श्रीमती प्रमिला जगन्नाथ नागपुरे वय ७५ वर्षे, धंदा-निल ६. प्रमोद जगन्नाथ नागपुरे वय ५६ वर्षे, धंदा-शेती ७. निलेश जगन्नाथ नागपुरे वय ५२ वर्षे, धंदा-शेती ८. सौ. अर्चणा अनिल इंगळे वय ५४ वर्षे, धंदा-घरकाम ९. सौ. प्रतिभा श्रीकांत भड वय ५० वर्षे, धंदा-घरकाम अर्जदार क. १ रा. खारोन पुरा, हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क. २ रा. मु.पो. गोपाल जिन रोड, वार्ड क १४ तेल्हारा ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क. ३, ४ रा. मु.पो. बेलखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क. ५ ते ७ रा. मु.पो. बेलखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क. ८ रा. तुदगाव रोड, वृंदावन कॉलेनी, तेल्हारा, ता. अकोट, जि. अकोला अर्जदार क. ९ रा. पाथर्डी, ता. तेल्हारा, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ९ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १ ही मुलगी व अर्जदार क. २ ते ४ ही मुले आहेत, मयत नामे मोतिराम रावजी नागपुरे हे दि. ०४/०५/२००१ रोजी मौजे बेलखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २०/०४/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २०/०३/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १७८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# शेतकरी प्रश्नांवर प्रहार - शिवसेनेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा आज

**आमदार बच्चू कडू यांची उपस्थिती; हजारोंनी सहभागी होण्याचे राहुल देशमुख यांचे आवाहन**

■ प्रतिनिधी | अकोट ■

शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्ष आणि शिवसेना सैनिकांच्या वतीने बुधवारी (ता. ४) अकोला जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चात प्रहारचे नेते व आमदार बच्चू कडू सहभागी होऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार असल्याची माहिती प्रहार व शिवसेना पदाधिकारी राहुल देशमुख यांनी दिली.

या आंदोलनाची सुरुवात दुपारी १ वाजता अकोला येथील अशोक वाटिका चौकातून होणार असून मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात जिल्हाभरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे.


मोर्चाच्या माध्यमातून पीकविमा योजनेत हेतुपुरस्सर रद्द करण्यात आलेले चारही ट्रिगर पुन्हा सुरू करण्याची मागणी करण्यात येणार आहे. तसेच अकोला जिल्ह्यात उपलब्ध असलेला खतांचा बफर स्टॉक तात्काळ शेतकऱ्यांसाठी खुला करावा, अशीही प्रमुख मागणी करण्यात येणार आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर खतांचा प्रश्न गंभीर बनत असल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी भूमिका आयोजकांनी मांडली आहे.

सामाजिक कार्यकर्ते तथा प्रहार-शिवसेना पदाधिकारी राहुल देशमुख यांनी जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी हा लढा असून प्रशासनाने मागण्यांची दखल घ्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. या मोर्चाकडे जिल्ह्यातील शेतकरी व राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून प्रशासनाची भूमिका काय राहणार, याबाबत उत्सुकता व्यक्त होत आहे.

# दिल्लीत ५ जून रोजी कृषी मूल्य आयोगाची बैठक

## हमीभावासाठी प्रकाश पोहरे मांडणार देशातील शेतकऱ्यांची बाजू

**अकोला :** कृषी खर्च आणि मूल्य आयोग सन २०२७–२८ च्या विपणन हंगामासाठी गहू, बार्ली, चणा, मसूर, रेपसीड, मोहरी आणि केशर या रब्बी पिकांच्या मूल्य धोरणाची आखणी करण्याच्या प्रक्रियेत आहे. त्यानिमित्ताने ५ जून रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र, जनपथ, नवी दिल्ली येथे देशभरातील शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली आहे.



या बैठकीसाठी भारतीय किसान परिषदचे अध्यक्ष व किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश पोहरे यांना विशेष आमंत्रण देण्यात आले आहे. कृषी खर्च व मूल्य आयोगाच्या बैठकीत हमीभावाच्या प्रश्नावर सातत्याने आक्रामक आणि अभ्यासपूर्ण भूमिका मांडणारे नेते म्हणून पोहरे याची ओळख आहे. पोहरे यांनी आरोप केला की, हमीभाव निश्चित करताना विविध राज्यांच्या कृषी मूल्य आयोगांनी शिफारस केलेल्या दरांचा पुरेसा विचार केला जात नाही; त्याऐवजी सरासरी आकडेवारीच्या आधारे दर ठरवून देशातील शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होते. केंद्र सरकारने प्रत्येक राज्यातील उत्पादन खर्च व शिफारस केलेल्या हमीभावाची स्वतंत्र आकडेवारी सार्वजनिक करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष आणि शेतकरी चळवळीत दीर्घकाळ कार्यरत पाशा पटेल यांनीही सर्व संघटनांनी एकत्र येऊन योग्य हमीभाव मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या भूमिकेचे समर्थन करत पोहरे यांनी शेतकरी संघटनांनी एकजुटीने लढा उभारण्याची गरज अधोरेखित केली.

कृषी खर्च व मूल्य आयोगाच्या या महत्त्वपूर्ण बैठकीत पोहरे कोणती भूमिका मांडतात आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी कोणत्या मागण्या पुढे करतात याकडे देशभरातील शेतकऱ्यांचे आणि किसान संघटनांचे लक्ष लागले आहे. बैठक बादांत काय निर्णय घेतले जातात, यावरून पुढील धोरणात्मक पावले ठरतील, असे तज्ज्ञ संकेत देतात.

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७७७/२०२६ प्रोसेस नं.६७०२/२०२६
चौ.ता. २५/०६/२०२६ दिनांक : ११/०५/२०२६

**अर्जदार :** १. कैलास अंबादास तायडे २. यमुनाबाई दत्ता गायकवाड दोघेही रा. सिद्धार्थ नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. गीता अंबादास तायडे २. अंबादास पन्ना तायडे ३. पन्ना मानाजी तायडे

**पत्ता :-** रा. सिद्धार्थ नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत क. १ गीता अंबादास तायडे यांचे दि. १६/०८/२०२० रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. मयत क. २ अंबादास पन्ना तायडे यांचे दि.१३/०७/२०१६ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत क. ३ पन्ना मानाजी तायडे यांचे दि. २९/१०/१९७२ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची असल्यास हरकत असल्यास दिनांक २५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.


शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# देशी कट्टे बनविणाऱ्या आरोपीला ठोकल्या बेड्या; शस्त्रनिर्मितीचे साहित्य जप्त

**अकोला :** अवैध शस्त्रनिर्मिती आणि तस्करीविरोधात सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत दहीहंडा पोलिसांनी मोठी कारवाई करत देशी कट्टे तयार करणाऱ्या आरोपीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत शस्त्रनिर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले असून, आरोपीला हरियाणातील कारागृहातून ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली.

### दहीहंडा पोलिसांची मोठी कारवाई





### हरियाणा जेलमधून आरोपी ताब्यात, मध्यप्रदेशातून साहित्य हस्तगत

स्थानिक गुन्हे शाखेने ३० एप्रिल रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दत्ता मोहोड व अक्षय मोहोड यांना ताब्यात घेतले होते. त्यांच्याकडून एक देशी कट्टा व जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. पुढील तपासात शेख अकबर शेख हारून याच्याकडून आणखी एक गावठी पिस्तूल व जिवंत काडतूस हस्तगत करण्यात आले. या कारवाईत दोन गावठी पिस्तुले, दोन जिवंत काडतुसे, मोटारसायकल व मोबाईल फोन असा एकूण २ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. याप्रकरणी दहीहंडा पोलीस ठाण्यात आर्म्स ॲक्टन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान किस्मतसिंग तकदीरसिंग (रा. पाचोरी, जि. बुऱ्हाणपूर, मध्यप्रदेश) याचे नाव समोर आले. मोबाईल क्रमांकांच्या तांत्रिक विश्लेषणातून आरोपी हा हरियाणातील पालवल जिल्ह्यातील हठीन पोलीस ठाण्याच्या एका आर्म्स ॲक्ट प्रकरणात फरीदाबाद येथील निमका कारागृहात न्यायालयीन कोठडीत असल्याचे निष्पन्न झाले.

दहीहंडा पोलिसांनी आरोपीला ३० मे रोजी कारागृहातून ताब्यात घेऊन न्यायालयाकडून पोलीस कोठडी मिळविली. चौकशीदरम्यान आरोपीने स्वतः देशी कट्टे तयार करत असल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी मध्यप्रदेशातील त्याच्या राहत्या घरातून ग्लेंडर मशीन, लोखंडी कानस, करवत, छन्नी, हातोडी, सांडशी आदी शस्त्रनिर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले. पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध शस्त्रनिर्मितीचे जाळे उघडकीस आले असून, या प्रकरणात आणखी काही धागेदोरे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जप्त साहित्याची तपासणी करण्यात येत असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दहीहंडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार गोपाल ढोले यांच्या नेतृत्वात पार पडली. कारवाईत हेड कॉन्स्टेबल सागर कापसे, पीएसआय सोपान डाभेराव, पोलीस हवालदार रवी डाभेराव, पोलीस कॉन्स्टेबल प्रदीप राऊत, माधव कोरे, सन्नी वाकोडे, विजय वागतकर व नवनाथ कोकाटे यांनी सहभाग घेतला. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अवैध शस्त्र व्यवहार करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

## जाहीर सूचना

माझे पक्षकार यांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार सौ. लीलाबाई विठ्ठल देवकर आणि श्री सदानंद विठ्ठल देवकर, रा. धनगर नगर, ता. शेगाव आणि जि. बुलढाणा हे मौजा/कसबे शेगाव, ता. शेगाव आणि जि. बुलढाणा येथील नगर भू. क्र. ३५/१/३६/३, नझुल शीट नं. २०, नझुल प्लॉट नं. ३५/१/३६/३, एकूणक्षेत्र १६९६.२० चौ.मी. यापैकी १०८०.०० चौ. फूट. या जागेच्या मालकी व ताब्यातील असून, सदर मालमत्ता श्री. माणिकराव देवराव चोरमाले आणि श्री. मारोती बाबाजी करांडे यांनी नोंदणीकृत खरेदी र.द.क्र. ६०१, दिनांक १३/०४/१९६१ अन्वये खरेदी केले होती व त्यांच्या मृतू नंतर त्यांचे कादेशीर वारस हक्काने माझे पक्षकार यांना प्राप्त झाली असून त्या संदर्भित फेरफार मालमत्ता पत्रावर फेरफार क्र. १८३२, दि. २७/०२/२०२० नोंद घेण्यात आला आहे. तसेच माझे पक्षकार सदर मालमत्तेवर JM Financial Home Loans Limited. कडून कर्ज घेत असून त्याकरिता वरील नमूद मालमत्ता गहाण देत आहेत.

तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि, सदर मालमत्ते संदर्भात वारस फेरफार तथा गहाण तसेच कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हिस्सा, अधिकार किवां गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंव्हा कुठलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नोटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा; तसे न केल्यास सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारे काहीहि ऐक हक्क, अधिकार, हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल.

अकोला
दिनक:- ०३/०६/२०२६

**ॲड. गौरव शि. देशमुख**
आळशी प्लॉट, गजानन महाराज फोटो जवळ,
दक्क्षता नगर चौक, ता. जि. अकोला.
मो. नं. ९०२८२३२२४६

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१३९/२०२५ प्रोसेस नं.६६२९/२०२५
चौ.ता. १८/०६/२०२६ दिनांक : ०८/०५/२०२६

**अर्जदार :** १. प्रशांत श्रीराम खापरकर रा. लक्ष्मी नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. अलका ज्ञानेश्वर पळसकार रा. मु. पो. वडाली देशमुख, ता. अकोट, जि. अकोला. ३. सौ. कल्पना शंकरराव शिरळकार रा. तिरूपती नगर नं. १, साई नगर, अकोली रोड, अमरावती, साई नगर, एसओ अमरावती. ४. अर्चना सुनिल कळसकार रा. मु. पो. विहीगांव, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. चंद्रभागाबाई जयराम खापरकर २. श्रीराम जयराम खापरकर ३. रमाबाई श्रीराम खापरकर

**पत्ता :-** रा. लक्ष्मी नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत चंद्रभागाबाई जयराम खापरकर यांचे दि. ०१/११/२००९ रोजी व तसेच मयत श्रीराम जयराम खापरकर यांचे दि. १६/०५/२०२३ रोजी लक्ष्मी नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे. तसेच मयत रमाबाई श्रीराम खापरकर यांचे दि. २३/०२/२०१० रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी.

अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर सूचना

माझे पक्षकार यांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार सौ. दिपाली योगेश अग्रवाल, रा. गोरक्षण रोड, अकोला, ता. आणि जि. अकोला यांच्या मालकी व ताब्यातील मालमत्ता मौजा/कसबे शिवानी, ता. आणि जि. अकोला येथील सर्वे नं. ७९ मधील अकृषक लेआउट प्लॉट नं. ७, एकूण क्षेत्रफळ ३६५.५० चौ. मी. हा प्लॉट सौ. मिनाक्षीबेन विनोदराव बविशी याच्या कडून र.द.क्र. ५०२३; दि. १४/१०/२०२५ ने खरेदी केली असून सदर मालमत्तेची जुने मूळ नोंदणीकृत खरेदीखत ज्याचे र.द.क्र. ५१६५; दि. ०१/०७/१९८५, हि त्यांच्या पिशवीतून कलेक्टर ऑफिस ते सिविल लाइन परिसरात पडून गहाळ झाल्या आहे, जर कोणलाही ती मिळाले असल्यास खाली संपर्क साधावा. तसेच सदर मालमत्तेवर Tata Capital Limited, Akola मार्फत कर्ज घेत असून त्याकरिता माझे पक्षकार हे वरील नमूद मालमत्ता गहाण देत आहेत, त्याकरिता सदर दस्ताची अत्यन्त आवशक्यता आहे.

तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हिस्सा, अधिकार किवां गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंव्हा कुठलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नोटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून १५ दिवसांच्या आत संपर्क साधावा; तसे न केल्यास सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारे काहीहि ऐक हक्क, अधिकार, हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल. तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुठलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार/देणार जबाबदार राहील. तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुठलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार जबाबदार राहील.

अकोला
दिनक:- ०२/०६/२०२६

**ॲड. गौरव शि. देशमुख**
आळशी प्लॉट, गजानन महाराज फोटो जवळ,
दक्क्षता नगर चौक, ता. जि. अकोला.
मो. नं. ९०२८२३२२४६

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे ताजनापुर (कसबे अकोला) प्र.ता.जि. र.डी.र. र.डी. म.न.पा. अकोला कक्षेतील देशमुख फैल, अकोला म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या विभागातील शिट नं. २४-सी, नझुल प्लॉट नं. २/८६ या १४००.०० चौ. फुट जागेपैकी पुर्व - पश्चिम वाटणीने दक्षिण भागाची जागा व त्यावरील घर यासह विकत घेण्याचा सौदा आकाश मनोहर चंदन यांच्याशी केला आहे त्याचे मोजमाप. पुर्व - पश्चिम ४०.०० फुट, उत्तर दक्षिण ११.०० फुट एकुण क्षेत्रफळ ४४०.०० चौ. फुट सदर जागेवरील ४७.०० चौ.मी. चे आर.सी.सी. पध्दतीचे दोन मजली बांधकाम त्यातील तळमजल्यावरील दोन रूम, किचन, संडास व बाथरूम तसेच त्यातील इलेक्ट्रीक मीटर ट्रान्सफर हक्कासह नळ कनेक्शन व इतर सर्व तदंगभुत वस्तुसह घरजागा त्यास चतुःसीमा :- पुर्वस :- सर्व्हिस लाईन, पश्चिमेस :- सरकारी रोड, उत्तरेस :- अंभोरे यांचे घर, दक्षिणेस :- गोपिकाबई यांचे घर ता. जि. अकोला.

वरील वर्णनाचे मालमत्तेबाबत आमचे पक्षकाराने आकाश मनोहर चंदन यांच्याशी नोटरी पध्दतीने दि. २९/१०/२०२५ रोजी इसार केला असुन सदर इसाऱ्यापोटी ६,००,०००/- (अक्षरी रूपये सहा लाख फक्त) इसार करतेवेळी आकाश मनोहर चंदन यांना दिलेले आहे. लवकरच आमचे पक्षकार सदर सौद्यापोटी व व्यवहारापोटी उरलेली रक्कम देऊन ही मालमत्ता विकत घेणार आहे.

तरी या व्यवहाराबाबत व मालमत्तेबाबत आम जनतेस तसेच वित्तीय संस्था बँका, को-ऑपरेटिव्ह सोसायटी अथवा इतर कोणालाही हक्क, मालकी, गहाण, बोजा, हितसंबंध अथवा या अनुषंगाने कोणतेही हरकत आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत खालील पत्त्यावर लेखी हरकत कागदपत्रांसमवेत नोंदवावी.

या कालावधीत कोणतीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास आमचे पक्षकार यांचे कडून खालील वर्णनांकीत मालमत्तेची खरेदी करतील व रितसर योग्य ती महसुलात कारवाई करतील. सदर हरकत सात दिवसांचे आत प्राप्त न झाल्यास कोणाचीही हरकत, आक्षेप, उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

अकोला
दि. ०२/०६/२०२६

**पक्षकाराकरीता अधिवक्ता**
**ॲड. शैलेष गो. ठोसर**
प्लॉट नं. ४४, कपीला नगर, गोरक्षण रोड,
अकोला. मो. नं. ९८५०३४९८४९

# नियुक्ती झाली, पण खुर्ची अजूनही रिकामी

## वर्धा काँग्रेसमध्ये जिल्हाध्यक्षपदावरून धुरळा; नियुक्तीपत्राचा पत्ता नाही, पदभाराचा मुहूर्तही रखडला

**वर्धा/ रवींद्र लाखे**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने जिल्हाध्यक्षांची नवीन यादी जाहीर करून वर्धा जिल्ह्याची धुरा सुनील कोल्हे यांच्या खांद्यावर सोपवल्याची घोषणा केली. मात्र या घोषणेला आठवडाभराहून अधिक कालावधी उलटूनही जिल्हाध्यक्षपदाचा अधिकृत पदभार, नियुक्तीपत्र आणि पदग्रहण सोहळा यांचा पत्ताच नसल्याने वर्धा काँग्रेसमध्ये राजकीय चर्चांना जोर आला आहे. पक्षात गटबाजी, नाराजी आणि नियुक्ती प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने जिल्हाध्यक्षपदाभोवतीचे राजकारण चांगलेच तापले आहे.

जिल्हाध्यक्षपदाची घोषणा झाल्यानंतरही पदभार का घेण्यात आलेला नाही, याबाबत विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत. काही कार्यकर्त्यांच्या मते, माजी जिल्हाध्यक्षांनी पदभार दिलेला नसल्यामुळे प्रक्रिया रखडली आहे. तर दुसरीकडे, नव्या जिल्हाध्यक्षांच्या पदग्रहणासाठी मोठा राजकीय शक्तिप्रदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्याची तयारी सुरू असल्याने पदभार स्वीकारण्यास विलंब होत असल्याचीही चर्चा आहे.या संदर्भात माजी जिल्हाध्यक्ष मनोज चांदूरकर यांनी मात्र स्पष्ट भूमिका मांडली आहे. मी स्वतः जिल्हाध्यक्षपदाचा पदभार कोणाकडून घेतला नव्हता. काँग्रेसमध्ये असा कोणताही लिखित नियम नाही. प्रदेश कार्यालयाकडून येणारे अधिकृत मेल, संदेश आणि संवाद बंद झाले आहेत. त्यामुळे माझा कार्यकाळ संपल्याचे मी समजतो, असे मनोज चांदुरकर यांनी 'जनमाध्यम'शी बोलताना सांगितले. त्यामुळे पदभार न मिळाल्याचा मुद्दा फारसा ग्राह्य धरला जात नाही, असेही पक्षातील जाणकारांचे मत आहे.दरम्यान, या संपूर्ण नियुक्ती प्रक्रियेवर सुरुवातीपासूनच वादाचे सावट आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या संघटन सृजन अभियानांतर्गत जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नेत्यांची मते जाणून घेण्यात आली होती. अनेक नावांची चर्चा होती. त्यामध्ये काही नेत्यांची नावे अग्रक्रमावर असल्याचे सांगितले जात होते. मात्र अंतिम यादीत सुनील कोल्हे यांचे नाव जाहीर होताच पक्षातील एका गटातून नाराजीचा सूर उमटला. अभिप्राय घेण्याचा कार्यक्रम केवळ औपचारिकता होती काय असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला.विशेष म्हणजे, जिल्हाध्यक्ष निवडीसंदर्भात गेल्या काही दिवसांत दैनिक 'जनमाध्यम'नी अनेक बातम्या प्रकाशित केल्या. संघटन सृजन अभियानातील प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह, गटबाजी, कार्यकर्त्यांमधील नाराजी आणि नेतृत्व निवडीवरील वाद यासंदर्भातील वृत्तांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली.

या बातम्यांची दखल प्रदेश आणि दिल्ली पातळीवरील वरिष्ठ नेतृत्वाने घेतल्याची चर्चा आता काँग्रेसच्या गोटात रंगू लागली आहे. त्यामुळेच वर्धा जिल्हाध्यक्षपदाच्या नियुक्तीवर अद्याप अंतिम शिक्कामोर्तब झाले नसावे, अशी दबक्या आवाजात कुजबुज सुरू आहे.विदर्भातील काही जिल्ह्यांतील जिल्हाध्यक्ष नियुक्त्यांबाबतही आक्षेप नोंदविण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. काही जिल्ह्यांतील नियुक्त्या आणि पदभार प्रक्रिया रखडल्याने वर्ध्यातील प्रकरणालाही वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. काँग्रेसमध्ये नेतृत्व निवडीपेक्षा गटबाजीचे राजकारण अधिक प्रभावी ठरत असल्याची टीका कार्यकर्त्यांमधून होत आहे.आजची परिस्थिती अशी आहे की, जिल्हाध्यक्षांची घोषणा झाली आहे; पण नियुक्तीपत्र हाती नाही. जिल्हाध्यक्ष निश्चित झाले आहेत, पण अधिकृत पदभार नाही. कार्यकर्त्यांना नवीन नेतृत्व मिळाले आहे; पण नेतृत्वाचा कारभार सुरू झालेला नाही. त्यामुळे वर्धा काँग्रेसमध्ये सध्या संभ्रम, संशय आणि सत्तासंघर्षाचे वातावरण निर्माण झाले आहे.आता सर्वांचे लक्ष एकाच प्रश्नाकडे लागले आहे, वर्धा काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदावर सुनील कोल्हे यांचा अधिकृत राज्याभिषेक कधी होणार, की दिल्ली दरबारातून अजूनही अंतिम हिरवा कंदील मिळायचा बाकी आहे?

# दारूबंदी पथकाचा 'लक्ष्मीदर्शन' खेळ

## रामनगर हद्दीत गोवा-एमपी दारूचा पूर, बनावट विदेशी मद्याची खुलेआम विक्री

**वर्धा/ जनमाध्यम**



जिल्ह्यात दारूबंदी कायदा अस्तित्वात असला तरी रामनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत मात्र दारूबंदीची अक्षरशः चेष्टा उडत असल्याचे चित्र आहे. दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेले विशेष पथकच सध्या कथितपणे 'लक्ष्मीदर्शनाच्या' मोहात अडकल्याची चर्चा रंगली असून, काही निवडक दारूविक्रेत्यांना अभय तर काहींना हप्तेवाढीचा फतवा दिला जात असल्याचे आरोप नागरिकांतून होत आहेत.

रामनगर पोलिस ठाणे हे जिल्ह्यातील संवेदनशील पोलिस ठाण्यांपैकी एक मानले जाते. मात्र याच परिसरात देशी, विदेशी, गावठी, गोवा मार्का, मध्यप्रदेशातून आणलेली तसेच बनावट विदेशी दारूची खुलेआम विक्री सुरू असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, दारूबंदी पथकाच्या नाकाखाली हा सारा प्रकार सुरू असताना कारवाईचा बडगा काही मोजक्यांवरच का उगारला जातो, असा प्रश्न उपस्थित होत आहे.स्थानिक नागरिकांच्या मते, काही दारूविक्रेत्यांची एक स्वतंत्र 'दात्यांची यादी' तयार करण्यात आली असून, नियमित लक्ष्मीदर्शन करणाऱ्यांवर कारवाईचा हात हलकाच राहतो. तर आर्थिक व्यवहारात कथित अडथळे निर्माण करणाऱ्यांवर अचानक धाडी आणि गुन्हे दाखल करण्याचे प्रकार घडत असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे.आश्चर्याची बाब म्हणजे, गोवा व मध्यप्रदेशातून येणाऱ्या दारूचा पुरवठा नेमका कोण करतो, बनावट विदेशी दारूचे जाळे कुठून चालते, याचा शोध घेऊन मुळावर घाव घालण्याऐवजी काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे लक्ष कथितपणे 'वसुली व्यवस्थे'कडेच अधिक असल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे दारूबंदीची अंमलबजावणी करण्यासाठी तयार केलेले पथकच संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

परिसरातील अनेक भागांत रात्री उशिरापर्यंत दारू विक्री सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. मात्र मोठे पुरवठादार आणि प्रभावशाली विक्रेते हाताबाहेर राहत असल्याने सामान्य नागरिकांमध्ये संताप वाढत आहे. दारूबंदी पथकातील काही सदस्य आणि दारूविक्रेत्यांमधील कथित साटेलोटे ही सध्या चर्चेची बाब ठरली आहे.या पार्श्वभूमीवर रामनगरच्या ठाणेदार पौर्णिमा राखौंडे यांनी स्वतः लक्ष घालून दारूबंदी पथकाच्या कामकाजाची चौकशी करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. दारूबंदीच्या नावाखाली जर 'लक्ष्मीपूजन' सुरू असेल, तर कायद्याचा धाक नेमका कुणासाठी आणि अभय कुणासाठी असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत.

# रेती माफियांच्या खड्ड्यांत जातायत निष्पापांचे बळी

## मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करा;खा.अमर काळे यांचा प्रशासनावर घणाघात

**वर्धा/ जनमाध्यम**



वर्धा जिल्ह्यात अवैध आणि अतिरेकी रेती उत्खननामुळे नदीपात्रात निर्माण झालेल्या मृत्यूच्या खड्ड्यांमध्ये निष्पाप नागरिकांचे जीव जात असताना प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचा गंभीर आरोप खासदार अमर काळे यांनी केला आहे. अशा मृत्यूंसाठी संबंधित रेतीघाट मालकांसह दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी त्यांनी केली आहे. हिंगणघाट तालुक्यातील शेकापूर येथे रेती उपशामुळे तयार झालेल्या खोल खड्ड्यात बुडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला. या घटनेची शाई सुकण्यापूर्वीच मांडगाव येथील शेडगाव फाटा रेतीघाटावर वडील, मुलगी आणि एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. या सलग घटनांमुळे जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे.नदीपात्रात मोठमोठे खड्डे निर्माण करूनही रेतीघाट चालकांनी इशारा फलक, संरक्षक कुंपण किंवा कोणत्याही सुरक्षाव्यवस्था उभारल्या नाहीत. प्रशासनानेही नियमांची अंमलबजावणी करण्याऐवजी डोळेझाक केल्याचा आरोप काळे यांनी केला. वर्ध्यात दारूबंदीप्रमाणेच रेती तस्करीचाही मुद्दा गाजत असून तस्करांचे धाडस इतके वाढले आहे की अधिकाऱ्यांवरही जीवघेणे हल्ले होत आहेत.मृतांच्या कुटुंबियांना तातडीची आर्थिक मदत देऊन रेती माफियांना पाठीशी घालणाऱ्यांची चौकशी करावी, अन्यथा जनतेचा उद्रेक अटळ राहील, असा इशाराही खासदार अमर काळे यांनी दिला.

# नळातून पाणी नव्हे, जंतूंचा प्रवाह!

## आजणसऱ्यात दूषित पाणीपुरवठ्यावर ग्रामस्थांचा संताप

### ग्रामसेवक व प्रशासकावर कारवाईची मागणी; जिल्हा परिषद सीईओंना निवेदन

**आजनसरा/ जनमाध्यम**



गावकऱ्यांच्या आरोग्याशी थेट खेळ करणारा धक्कादायक प्रकार आजणसरा येथे उघडकीस आला असून नळाद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यात जिवंत जंतू आढळल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे धाव घेत ग्रामसेवक व प्रशासकाला तात्काळ निलंबित करून फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

गावातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून नळाच्या पाण्यात जिवंत जंतू आढळत असल्याची तक्रार होती. दूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांचा धोका वाढला असून लहान मुले, वृद्ध आणि महिलांच्या आरोग्याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.नळातून जंतू येतानाचा व्हिडिओ ग्रामस्थांनी चित्रित करून सोशल मीडियावर प्रसारित केला. हा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. गौरव पेटकर या युवकाने हा प्रकार धाडसाने समोर आणल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९६० च्या कलम ४५ व ४९ नुसार स्वच्छ पाणीपुरवठा करणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी असल्याचे नमूद केले आहे. तसेच भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत स्वच्छ पाणी हा नागरिकांचा मूलभूत हक्क असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे.दोषींवर तात्काळ कारवाई झाली नाही तर संपूर्ण गाव रस्त्यावर उतरून तीव्र जनआंदोलन छेडेल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला असून आता जिल्हा परिषद प्रशासन या गंभीर प्रकरणावर कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दृष्टी हिरावणाऱ्या मेंदूतील गाठीवर मात

## वेळेवर निदान, यशस्वी शस्त्रक्रियेमुळे २८ वर्षीय महिलेला नवे जीवन

**वर्धा/ जनमाध्यम**



वेळेवर निदान, तज्ज्ञ डॉक्टरांचे कौशल्य आणि अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांच्या बळावर नांदेड जिल्ह्यातील २८ वर्षीय महिलेची दृष्टी वाचविण्यात आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाने (एव्हीबीआरएच), सावंगी (मेघे) यश मिळविले आहे. हिमायतनगर तालुक्यातील सोनारी येथील सौ. जयश्री कदम यांच्यावर मेंदूतील दुर्मिळ व गुंतागुंतीच्या गाठीची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. कदम यांना अनेक महिन्यांपासून तीव्र डोकेदुखीचा त्रास होत होता. त्याचबरोबर त्यांची दृष्टी कमी होत होती आणि डाव्या डोळ्याला सूजही आली होती. हिमायतनगर येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात तपासणीदरम्यान तज्ज्ञ डॉक्टरांनी त्यांच्या प्रकृतीची गंभीरता ओळखून त्यांना तातडीने एव्हीबीआरएच येथे पाठविले.न्यूरोसर्जरी विभागातील तपासणीत त्यांच्या मेंदूत डोळ्यापर्यंत पसरलेली 'स्फेनॉइड विंग मेनिंजिओमा विथ ऑर्बिटल एक्सटेंशन' ही दुर्मिळ गाठ असल्याचे निदान झाले. ११ मे रोजी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत नोंदणी करून २१ मे रोजी तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने अत्यंत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली.या शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णाची दृष्टी आणि डोळा सुरक्षित ठेवण्यात डॉक्टरांना यश आले. सध्या त्यांची प्रकृती उत्तम असून त्या जलद गतीने बऱ्या होत आहेत.एव्हीबीआरएचचे सामुदायिक सेवा विभागाचे उपसंचालक डॉ. अभिषेक जोशी यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील गंभीर आजारांचे वेळेवर निदान करण्यासाठी महाआरोग्य शिबिरे प्रभावी माध्यम ठरत आहेत. तर डीएमआयएचईआरचे सीओओ डॉ. निलेश अग्रवाल यांनी प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्याच्या संस्थेच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.या यशस्वी उपचारामुळे ग्रामीण भागातील रुग्णांनाही अत्याधुनिक आणि परवडणाऱ्या आरोग्यसेवा उपलब्ध होत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# विद्यालयातील प्रयोगशाळेची तोडफोड

**वर्धा -** दहेगाव मिस्कीन येथील राणीबाई अग्निहोत्री विद्यालयातील प्रयोगशाळेची तोडफोड करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी सावंगी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.माहितीनुसार, सुनील कोंडलकर व त्याच्यासोबत असलेल्या तीन ते चार जणांनी प्रयोगशाळेच्या दरवाज्याचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर प्रयोगशाळेतील खिडक्या, शौचालयाची शीट तसेच इतर साहित्याची तोडफोड करण्यात आली. या प्रकारामुळे विद्यालयाचे नुकसान झाले आहे.

मुख्याध्यापिका सरोज तिवारी यांनी याबाबत पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीच्या आधारे सावंगी पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. शैक्षणिक संस्थेतील तोडफोडीच्या घटनेमुळे परिसरात नाराजी व्यक्त होत आहे.

### दारूच्या नशेत आजी-काकूला धमकी

वर्धा - दारूच्या नशेत आजी व काकूला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी शहर पोलिसांनी साहील आडकिने याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिलिंदनगर, नालवाडी परिसरात घडलेल्या या घटनेत साहीलला दारूचे व्यसन असून तो वारंवार आजी विमल आडकिने यांच्या घरी जाऊन वाद घालत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. संबंधित दिवशी त्याने आजीला शिवीगाळ सुरू केली.

काकू वैशाली यांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली.सततच्या त्रासाला कंटाळून विमल आडकिने यांनी शहर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदविली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### संशयास्पदरीत्या फिरणारा तरुण ताब्यात

**वर्धा -** चोरीसारखा दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या लपून बसलेल्या तरुणाला शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. ही कारवाई चितोडा रेल्वे गेट परिसरातील पुलफैल भागात करण्यात आली.गस्तीवर असलेल्या पोलिसांना बंद पानठेल्याच्या मागे एक तरुण संशयास्पदरीत्या बसलेला दिसला. चौकशीदरम्यान त्याने समाधानकारक उत्तरे न दिल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. वृषभ श्रीवास्तव (२६, रा. इतवारा) असे त्याचे नाव आहे.पोलिसांनी त्याच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करून गुन्हा नोंदविला. पुढील चौकशीनंतर त्याला सुचनापत्र देऊन सोडण्यात आले. या कारवाईमुळे परिसरातील संशयास्पद हालचालींवर पोलिसांचे लक्ष असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली मतदार संघाकरिता निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती

**वर्धा-** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीची घोषणा केली असून त्यासाठी १८ जून रोजी मतदान तर २२ जून रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. त्यानुसार वर्धा- चंद्रपूर- गडचिरोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाकडून स्वाती योगेश म्हसे पाटील यांची (मो. ९३०७१८१७३६) निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीमती म्हसे पाटील ह्या उमेदवार /पक्ष किंवा मतदार यांना भेटण्यासाठी बकुळ, व्हीआयपी गेस्ट हाऊस, वन अकादमी, चंद्रपूर येथे सकाळी ११ ते १२ आणि सायंकाळी ५ ते ६ वाजेपर्यंत उपलब्ध राहतील, असे वर्धा -चंद्रपूर -गडचिरोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी कळविले आहे.

# शेतातून ट्रॅक्टर ट्रॉलीची चोरी

अल्लीपूर - भोजनखेडा शेतशिवारातून ट्रॅक्टरची ट्रॉली चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अल्लीपूर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.भास्कर दौड यांनी शेतात ट्रॅक्टरच्या सहाय्याने रोटावेटरचे काम पूर्ण केल्यानंतर ट्रॉली शेतातच ठेवून घरी गेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी शेतात गेल्यानंतर एमएच-३२ ए-९५७१ क्रमांकाची ट्रॉली जागेवरून गायब असल्याचे दिसून आले. अज्ञात चोरट्याने संधी साधून ट्रॉली चोरून नेल्याचे निष्पन्न झाले.या घटनेमुळे शेतकरी वर्गात चिंता व्यक्त होत असून शेतीसाठी आवश्यक यंत्रसामग्रीची चोरी वाढत असल्याची चर्चा आहे.


## कार्यालय ग्राम पंचायत पिपरी पं सं समुद्रपूर जिल्हा परिषद वर्धा

# निविदा सूचना

सर्व नोंदणी कृत कंत्राटदारास सूचित करण्यात येत की ग्राम पंचायत पिपरी येथे सन २०२६ या आर्थिक वर्षात अंतर्गत मंजूर पाणी टंचाई कामाकरिता पंजी बद्ध कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | योजनेचे नाव | कामाचे नाव | प्राकलण किंमत | १% अनामत रक्कम | तांत्रिक मंजूरी | निविदा शुल्क | कामाची कालावधी | निविदा स्वीकृतीचा दिनांक | निविदा उघळण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी टंचाई | नळ पाणी पुरवठा विशेष दुरूस्ती | ६१५४८८/- | ६१५०/- | ३५५ दि.२३/०३/२०२६ | ५००/- | १ महिना | दि.०३/०६/२०२६ ते ०६/०६/२०२६ | दि.१०/०६/२०२६ किंवा मासिक सभेत |

**अटी व नियम**

**सविस्तर अटी व शर्ती कार्यालीन दिवशी व वेळेत ग्राम पंचायत कार्यालय पिपरी येथे पाहण्यास उपलब्ध आहे. निविदा अनामत रकमेच्या भरणा सामान्य निधि खाते क्रं.३३०५५७०३३४६ स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा गिरड तह. समुद्रपूर जि. वर्धा IFSC No. SBIN0007222 मध्ये ऑनलाईन आर.टी.जी.एस./ ऑनलाईन किंवा नगदी स्वरूपात करावे.**

**प्रशासक** **ग्रा.पं.पिपरी** **ग्रा.पं.अधिकारी** **ग्रा.पं पिपरी**



# जाहीरनामा

ज्याअर्थी, विधि व न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची दिनांक ११/०८/२०२३ ची अधिसूचना अन्वये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, ज्या जन्म व मृत्यूच्या नोंदणीबाबत १ वर्षापेक्षा अधिक कालावधीने सूचना प्राप्त होते, अशा प्रकरणात नोंदी घेण्यासाठी कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, अशा कार्यक्षेत्रासाठी ज्या ठिकाणी अशा व्यक्तीचा जन्म व मृत्यू झाला आहे, त्याबाबतच्या अचूकतेबाबत खात्री करुन विलंब शुल्क आकारुन अशा नोंदी घेण्याबाबत आदेशित करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्म-मृत्यू घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यू यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : जमृनों २५२५/ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दिनांक १२ मार्च, २०२५ मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंदीबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे.

ज्याअर्थी, श्रीमती अरुणा बळीराम पखाले, रा. बोर्डा ता.तिवसा जि. अमरावती यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, नांदपूर येथे उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या जन्म नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र, जन्माचे पुरावे, शैक्षणिक पुरावे, रहीवासाचे पुरावे, मालमत्तेचे पुरावे, ओळखीबाबतचे पुरावे व कौटुंबिक पुराव्यासह सचिव तथा जन्म-मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, नांदपूर ता. आर्वी जि. वर्धा यांनी या कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.

त्याअर्थी, श्रीमती अरुणा बळीराम पखाले, रा. बोर्डा ता. तिवसा जि. अमरावती यांच्या विलंबाने जन्माच्या नोंदीबाबत कोणाचे काही आक्षेप / हरकती असल्यास त्या सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत (विहीत मुदतीत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळी लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीनंतर आक्षेप / हरकतींचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**(हरीश काळे)**
**तहसीलदार आर्वी**



जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १८७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com


# हिरापूर ग्रामपंचायतीत विकासकामांमध्ये गोंधळ

## -सरपंचांकडून ई-टेंडर प्रक्रियेला बगल देत बेकायदेशीर कामांचा सपाटा

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** तालुक्यातील हिरापूर ग्रामपंचायतीमध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून होणाऱ्या विकासकामांमध्ये मोठा गोंधळ समोर आला आहे. ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी शासकीय नियम आणि ई-टेंडर प्रक्रियेला पूर्णपणे हरताळ फासत, मर्जीतील कंत्राटदाराला फायदा पोहोचवण्यासाठी परस्पर कामे सुरू केल्याचा गंभीर आरोप ग्रामपंचायत सदस्य अंकुश पाचघरे यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी गटविकास अधिकारी (BDO), पंचायत समिती अंजनगाव सुर्जी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून सरपंचांवर कारवाईची मागणी केली आहे.

९ मार्च २०२६ रोजी झालेल्या ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये १५ व्या वित्त आयोगांतर्गत सिमेंट नाली व रस्ता बांधकामाचे अंदाजपत्रक (Estimates) तयार करून मंजुरीसाठी पाठवण्याचा ठराव (विषय क्र. १) मंजूर करण्यात आला होता. मात्र, या ठरावाचा चुकीचा अर्थ लावून सरपंचांनी कोणतीही प्रशासकीय मान्यता किंवा 'कार्यारंभ आदेश' (Work Order) नसताना गावात नाली खोदाईचे काम सुरू केले आहे.





तक्रारीनुसार, ३,०१,१६५ रुपये किमतीच्या सिमेंट नाली कामासाठी शासकीय नियमानुसार 'ई-निविदा' (e-Tendering) काढणे बंधनकारक होते. तसेच ३ लाखांच्या आतील कामांसाठी किमान तीन कंत्राटदारांकडून दरपत्रके (Quotations) मागवणे अनिवार्य होते. परंतु, कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न राबवता, ग्रामसेवकाला अंधारात ठेवून सरपंचांनी थेट कामे सुरू केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. 'शासकीय निधीचा अपहार करण्याच्या उद्देशाने आणि मर्जीतील व्यक्तींना कंत्राट देण्यासाठी हा सर्व खटाटोप सुरू आहे,' असा आरोप सदस्य अंकुश पाचघरे यांनी केला आहे. त्यांनी आपल्या तक्रारीत दोन प्रमुख मागण्या केल्या आहेत: महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, कलम ३९ अन्वये मनमानी कारभार करणाऱ्या सरपंचांवर कारवाई करण्यात यावी. पंचायत समितीच्या अभियंत्यांनी या बेकायदेशीर कामांची 'मोजमाप पुस्तिका' (MB Book) भरू नये.या तक्रारीमुळे हिरापूर परिसरात खळबळ उडाली असून, आता गटविकास अधिकारी यावर काय भूमिका घेतात आणि या 'बिना टेंडर'च्या कामांना लगाम बसतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> हिरापुर ग्रामपंचायत अंतर्गत सध्या कोणतेही बांधकाम कंत्राटदारांना देण्यात आले नाही. बांधकाम देण्याबाबत नियमानुसार कामकाज सुरू आहे.
>
> -किरण भुरगडे, ग्रामसेविका हिरापुर ग्रामपंचायत

# 'कलर कोट' मानकरी तुकेश सपकाळची महाराष्ट्र पोलीस व SRPF मध्ये निवड!

**चिखलदरा/प्रतिनिधीः-** ग्रामीण भागातील गुणवत्ता आणि जिद्दीच्या जोरावर सिपना कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा येथील माजी विद्यार्थी व विद्यापीठ कलर कोट प्राप्त खो-खो खेळाडू तुकेश सपकाळ याने घवघवीत यश संपादन केले आहे. तुकेशची महाराष्ट्र राज्य नागपूर पोलीस विभाग आणि गोंदिया SRPF (राज्य राखीव पोलीस बल) मध्ये निवड झाली आहे. त्याच्या या यशामुळे संपूर्ण तालुक्यात व क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.



तुकेशने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ग्रामीण भागातून आपल्या क्रीडा प्रवासाला सुरुवात केली. त्याने आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर , संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संघाचे आंतर-विद्यापीठ खो-खो क्रीडा महोत्सवात प्रतिनिधित्व केले.

महाविद्यालयाला आंतर-महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत यश मिळवून दिले, चिखलदरा क्रीडा मंडळ नावलौकिक मिळवून देण्यात अत्यंत मोलाची भूमिका बजावली आहे. आपल्या या यशाचे श्रेय तुकेशने सिपना शिक्षण प्रसारक मंडळ, अमरावतीचे अध्यक्ष जगदीश गुप्ता, माजी सचिव डॉ. रवींद्र कडू, सचिव प्रशांत तायडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश जयपुरकर (माजी प्र-कूलगुरु, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ), आणि महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. प्रशांत गावंडे यांना दिले आहे. तसेच विदर्भ खो-खो असोसिएशनचे माजी अध्यक्ष प्रा. सुहास पांडे, महाविद्यालयाचे वरिष्ठ खेळाडू पुरुषोत्तम मडावी, गौरव ठाकूर, दिपेश चंदेल, किरण माहूरे, विशाल घोरपडे, राहुल रेवस्कर, वैभव मांडवगडे, सागर नेतनराव, हर्षल इंगळे, देवेश इंगळे, विनोद जनबंधू, रोशन पिवाल, आशिष भुरे, नवीन नांदुरकर, नितीन नांदुरकर, सर्वेश इंगळे, राज सिसोदिया, विवेक कौडेले, शुभम कडव, शुभम सपकाळ, विशाल कासे, श्रीकृष्ण तायडे, रोहन लोखंडे, मुसरलिन उर्फ आशू आणि आपल्या आई व वडिलबंधू शुभमच्या पाठिंब्यामुळेच हे यश शक्य झाल्याचे तुकेशने कृतज्ञतापूर्वक नमूद केले.तुकेशच्या या यशाबद्दल सिपना शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, प्राध्यापक वर्ग, क्रीडाप्रेमी आणि मित्रांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

> 'ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये अफाट क्षमता असते, हे तुकेशने आपल्या कष्टाने आणि सातत्याने सिद्ध करून दाखवले आहे. त्याचा हा प्रवास इतर खेळाडूंसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल.'
>
> -डॉ. राजेश जयपुरकर, प्राचार्य, सिपना महाविद्यालय

# बोर नदीच्या काठावर गावठी दारू अड्ड्यावर पोलीसांची धाड

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** माळेगाव परिसरातील बोर नदीच्या काठावर गावठी दारू अड्ड्यावर कुऱ्हा पोलीसांनी कारवाई केली आहे.

आज दिनांक ३ जून रोजी पोलीस स्टेशन कुऱ्हा येथे गोपनीय माहिती मिळाली की , पोलीस स्टेशन कुऱ्हा हद्दीतील मौजा माळेगाव परिसरातील बोर नदीच्या काठावर एक इसम मोहा फुलाची हातभट्टी गुळ दारू गाळत आहे. अशा माहितीवरून पोलिसांनी रेड कारवाई केली असता आरोपी देविदास अवधूत उके, (वय ४२ वर्ष रा. माळेगाव) हा तेथे मिळून आला. त्याचे आजू बाजूचे परिसराची पाहणी केली असता बेशरमाच्या झाडाझुडपीत ४८ पिपे मोहा सडवा, ३० लिटर हातभट्टी मोहा सडवा गुळ दारू असा एकूण ८४,३०० रुपयाचा मुद्देमाल मिळून आल्याने आरोपी देविदास अवधूत उके, याचे विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



सदरची कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम , अप्पर पोलीस अधीक्षक तोटेवाड , उपविभागीय पोलीस अधिकारी थोरात यांच्या मार्गदर्शनात सपोनी अमोल तुळजेवार, पोउपनी विलास थुल, पोहेका सपना निरगुळे , पोहेका अनिल निघोट ,पोक सागर निमकर , पोका हेमंत डहाके यांनी केली आहे. यातील आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन कुऱ्हा येथे अप क्र २२५/२०२६ कलम १२३ बी एन एस सहकलम ६५ फ क ड मदाका प्रमाणे गुन्हा नोंद करून आरोपी चा एम सी आर करून आरोपीची कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

# 'माझे गाव आरोग्यसंपन्न गाव' अभियानात ८४० ग्रामपंचायतींचा उत्स्फूर्त सहभाग

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याची सुदृढ आरोग्याकडे यशस्वी वाटचाल सुरू झाली आहे. जिल्ह्यात सध्या 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' हे अभियान प्रभावीपणे राबविले जात असून, जिल्ह्यातील एकूण ८४० ग्रामपंचायतींपैकी सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात शंभर टक्के सहभाग नोंदविला आहे. संपूर्ण जिल्हा आता स्वच्छता आणि आरोग्याकडे विशेष लक्ष देत असून, ग्रामीण भागात या निमित्ताने एक नवीन उत्साह निर्माण झाला आहे.

या मोहिमेत सहभागी झालेल्या सर्व ग्रामपंचायती आणि स्थानिक आरोग्य संस्थांमध्ये आरोग्यविषयक विविध कार्यक्रम राबविले जात आहेत. अभियानांतर्गत केलेल्या उत्कृष्ट कार्यवाहीच्या जोरावर 'सुदृढ विजेता' म्हणून घोषित होण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींमध्ये आता एक निरोगी स्पर्धा सुरू झाली आहे. गावागावात स्वच्छता आणि आरोग्य सुविधा बळकट करण्यावर विशेष भर दिला जात आहे.

या संपूर्ण मोहिमेचे चोख नियोजन व उद्दिष्टपूर्तीसाठी सर्व ग्रामपंचायतींना आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना वरिष्ठांकडून वेळोवेळी मार्गदर्शन व आवश्यक प्रशिक्षण देण्यात येत आहे, ज्यामुळे या मोहिमेला मोठी गती मिळाली आहे. या अभियानात उत्कृष्ट कामगिरी करून अमरावती जिल्ह्याचे नाव उंचावण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी गांधी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे, सर्व सरपंच, ग्रामसेवक आणि आरोग्य यंत्रणेला शुभेच्छा दिल्या.

# मातोश्री शासकीय मुलांच्या वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

## - ६० विद्यार्थ्यांना मिळणार प्रवेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत संचालित मातोश्री शासकीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, वलगाव रोड, अमरावती येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ करिता प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यंदा उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय, महाविद्यालयीन व तंत्रशिक्षण विभागासाठी एकूण ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. यामध्ये उच्च माध्यमिक विभागासाठी १२, कनिष्ठ महाविद्यालयासाठी १८, महाविद्यालयीन विभागासाठी १८ आणि तंत्रशिक्षण विभागासाठी १२ जागांचा समावेश राहणार, अशी माहिती वसतिगृहाचे गृहप्रमुख अनिल तसरे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न २०२५-२६ या आर्थिक वर्षात एक लाख रुपयांपर्यंत असणे आवश्यक आहे. गुणवत्तेनुसार व सामाजिक आरक्षणाच्या निकषांनुसार प्रवेश दिला जाणार असून, प्रवेशित विद्यार्थ्यांना वसतिगृहात मोफत निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. इच्छुक व गरजू विद्यार्थ्यांनी वसतिगृह कार्यालयातून सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत विनामूल्य अर्ज प्राप्त करून आपल्या शाळा अथवा महाविद्यालयात प्रवेश घेतल्यापासून १० दिवसांच्या आत अर्ज सादर करावेत, असे आवाहन तसरे यांनी केले आहे.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे ६ जूनला जिल्ह्यात 'मेगा कृषी क्रेडिट आउटरीच कॅम्प'

## -सर्व ४५ शाखांमध्ये जागेवरच होणार कर्जवाटप

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेतकरी आणि कृषी क्षेत्राशी संबंधित व्यावसायिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने शनिवार, दि. ६ जून २०२६ रोजी अमरावती जिल्ह्यात भव्य 'मेगा कृषी ऋण आउटरीच कॅम्प'चे आयोजन करण्यात आले आहे. दर्यापूर येथील माहेश्वरी भवन येथे सकाळी ११ वाजता या मुख्य कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक निकेतन कदम उपस्थित राहणार असून सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या केंद्रीय कार्यालयाचे उपमहाप्रबंधक सचिन सुधाकर, अमरावतीचे क्षेत्रीय प्रमुख सुनील पाण्डेय उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

हा कॅम्प केवळ एकाच ठिकाणी मर्यादित नसून अमरावती जिल्ह्यातील सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या सर्व ४५ शाखांमध्ये एकाच वेळी आयोजित केला जाणार आहे, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. या मेळाव्यामध्ये शेती आणि पूरक व्यवसायांना गती देणाऱ्या महत्त्वाच्या योजनांची माहिती दिली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने किसान क्रेडिट कार्ड , कृषी पायाभूत सुविधा निधी, ग्रामीण गोदाम भंडारण, कोल्ड स्टोरेज (शीतगृह) आणि महिला बचत गट यांसारख्या शासकीय व बँक योजनांचा समावेश आहे. या कॅम्पमध्ये पात्र लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची छाननी करून जागेवरच मंजुरी पत्र आणि थेट कर्जवाटप केले जाणार आहे.

हा कृषी मेळावा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आणि शेतीशी संबंधित व्यवसाय करणाऱ्यांसाठी विशेष संधी निर्माण करणारा आहे. तरी जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आणि कृषी उद्योजकांनी शनिवार, दि. ६ जून रोजी आपल्या जवळच्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखेत किंवा दर्यापूर येथील मुख्य कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित राहून या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन अमरावतीचे अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेड़ाऊ यांनी केले आहे.

# अदानी गॅसच्या पाईपलाईन कामामुळे नागरिकांना त्रास

## -प्रहारची सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंत्यांकडे तक्रार

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात सुरू असलेल्या अदानी गॅस पाईपलाईनच्या कामामुळे नागरिकांना मोठा त्रास होत असल्याची तक्रार प्रहार जनशक्ती पार्टीच्या वतीने आज बुधवार ३ जून रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंत्यांकडे केली आहे. शहरातील दस्तूर नगर एमआयडीसी परिसरात अदानी समूहाकडून गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे.

या कामामुळे नागरिकांना त्रास होत आहे. रस्त्याचे खोदकाम करण्यात आले पण बुजविण्यात आले नाही. पावसाळ्यात अपघाताची शक्यता यामुळे वाढलेली आहे. अनेक ठिकाणी पाईप आणि साहित्याचा ढीग रस्त्यावर पडून असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. केलेल्या खड्ड्याभोवती सुरक्षित बॅरिकेट व धोक्याचे सूचनाफलक न लावल्याने खड्ड्यात पडण्याची भीती आहे. पाईपलाईन टाकताना अनेक ठिकाणी भूमिगत पाण्याच्या किंवा सांडपाण्याच्या वाहिनीचे नुकसान होत आहे. सामान्य नागरिकांच्या जीवतीचा प्रश्न यामुळे निर्माण झालेला आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित विशेष लक्ष घालून कंपनीच्या माध्यमातून सुरू असलेला खेळ थांबविण्यात यावा,अशी मागणी करण्यात आली आहे, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी बंटी रामटेके, गणेश मारोडकर, गोलू पाटील, विक्रम जाधव, शेषराव घुले, नंदू वानखडे, विक्रम शेगोकार, शेख अकबर भाई, अजय तायडे, कुणाल खंडारे, संदीप तायडे, हर्षद इंगोले, अभय रायकवार, मधुकर भूले सह आदि उपस्थित होते.



# पंचशील नगरात एक तास अतिरिक्त पाणीपुरवठा करा भाजपा अनुसूचित जाती मोर्चाची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रभाग क्रमांक दहा मधील पंचशील नगर वरच्या भागात असल्यामुळे येथे अतिरिक्त एक तास पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी भाजपा अनुसूचित जाती मोर्चाच्या वतीने आज बुधवार ३ जून रोजी मजीप्रा अधिका-यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे की शहरी भागत ग्रामीण भागासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरी भागातील काही क्षेत्रांमध्ये नियमित पाणीपुरवठा होतो, मात्र प्रभाग १० मधील पंचशील नगर येथील वरील भागात राहणाऱ्या नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. त्यांना पाण्यासाठी पायपीट करावी लागते. पाणीपुरवठा सोडण्यात येणारा वेळ परिपुर्ण नाही. त्यामुळे बऱ्याच लोकांना पाण्याअभावी वंचित राहावे लागत आहेत. वरील भागात पाणी सोडले तरी लवकर पोहोचत नाही. जेव्हा नळ बंद करण्याची वेळ येते तेव्हा पाणी येते. यामुळे लोकांना पाणीटंचाई चा सामना करावा लागत आहे.




### जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे **सौ. चैताली अनुप चिटकेशवार, राहणार बोराळे अपार्टमेंट समोर, देवदत्त नगर, अमरावती** यांनी **श्रीमती संगीता विनोद गावंडे, राहणार देऊळगाव, सावरा, अकोला,** यांच्याशी त्यांनी दिनांक ०६/०२/२०२५ रोजीच्या अनु.दस्त क्र.६८४/२०२५ नुसार खरेदी केलेली व त्यांच्या मालकीची व ताब्यातील खालील वर्णित स्थावर मालमत्ता (शेतजमीन) विकत घेण्याचा सौदा कायम करीत आहे. स्थावर मालमत्ता (शेतजमीनीचे) वर्णन :- सब रजिष्ट्रार नोंदणी पोट तुकडी चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती ग्रामीण विभाग जिल्हा परिषद अमरावतीचे कक्षेतील ग्राम पंचायत बोराळा चे हददीतील मौजे चांदूर बाजार, ता.व जि. अमरावती, भुमापन क्रमांक व उपविभाग ४८/१/अ, भोगवटदार वर्ग १ एकूण क्षेत्रफळ २ हे ०८ आर यापैकी शेतजमीन क्षेत्रफळ ० हे ५२ आर. आ.रु. ३.०० पैसे, खाते क्र.१०४५ हिस्सा सालीम शेतजमीन यामध्ये असलेल्या झाडाझुडुपासह, जलपाषाणासह व इतर जमीन संलग्न तदंगभूत वस्तूसह, त्याची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे :- पुर्वेस- रामचंद्रबा चव्हाण यांचे शेत, पश्चिमेस- ज्ञानेश्वर इंगोले यांचे शेत, उत्तरेस- रामचंद्र बा चव्हाण यांचे शेत, दक्षिणेस - नदी.

त्याअर्थी वरील वर्णित मालमत्तेबाबत कोणाचाही गहाण, बोझा, तारण, सावकारी, व्यवहार, वारसाहक्क व इतर अधिकार जे कायदेशिररित्या अडथळा करतील असे व्यवहार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यासह कळवावे, अन्यथा कोणालाही कुठल्याही प्रकारची हरकत/ तक्रार नाही असे समजून सौदा करण्यात येईल व त्यानंतर वरील सर्व प्रकारचे व्यवहार आमच्यावर बंधनकारक राहणार नाही. तथा आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीखत करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याच प्रकारचा कसलाही उजर/अधिकार/हक्क/ तक्रार इत्यादी चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

करिता ही नोटीस जाहीर करत आहे.

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक ०४/०६/२०२६**

**ॲडव्होकेट निलेश ज.पुंड**
**१०२ गजानन अपार्टमेट, मोहन कॉलनी**
**अर्जुन नगर, अमरावती**
**मो.नं.- ८४२१७२२१११**



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्श्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**
**यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१०१३/२०२६
**श्रीमती माधुरी अधिक दोन विरुध्द निरंक**
पुढील ता.०६.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Madhuri Chandravilas Devghare, Age 45 Yrs. Occu.: Housewife
2. Payal Chandravilas Devghare, Age 23 Yrs. Occu.: Student
3. Khushi Chandravilas Devghare, Age 17 Yrs. Occu.: Student

All R/o. Parvati Nagar, No.1, Sai Nagar, Akoli Road, Amravati Tq & Dist. Amravati
(Applicant No.1 for herself & for applicant No.3 being as a mother )

-- विरुध्द --

**गैरअर्जदार : निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत चंद्रविलास किसनराव देवघरे हे २५.०३.२०२५ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार **माधुरी अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती माधुरी अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



**महाराष्ट्र शासन**
**धर्मादाय सह आयुक्त कार्यालय**
**अमरावती विभाग, अमरावती**

### जाहीर नोटीस

अर्ज क्र.०१९/कलम ३६ (१) (क)/२०२६

**श्री नागेश्वर महादेव संस्थान अंजनगाव सुर्जी, ता.अंजनगाव सुजी, जि.अमरावती**
**रजि.नं.ए-६९९/अमरावती**

वरील अर्जदाराने वरील नमुद न्यासाची नोंदणी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती येथे केलेली आहे.

**अ)** मौजे अंजनगाव सुर्जी, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती येथील नगर भुमापन क्र.४७ शिट नं. १६ प्लॉट नं.४७ एकुण क्षेत्रफळ १६४.४० चौरस मिटर धारणाधिकार अ (न्यासाच्या परिशिष्ट १ प्रमाणे अंजनगाव सुर्जी येथील प्लॉट नं.४७ शिट नं.१६ बी क्षेत्रफळ१७७० चौ.फुट) या जागेपैकी उतरेकडील ३.८० मी व ५.५२ मी.एकुण २१ चौ.मीटर खुली जागा.

त्याची चर्तुसिमा खालील प्रमाणे -
पुर्वेस -रोड — पश्चिमेस - रोड
उत्तरेस - रोड — दक्षिणेस - प्लॉट नं. ४७ चा उर्वरित भाग

**ब)** मौजे अंजनगाव सुर्जी, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती येथील नगर भुमापन क्र.४७ शिट नं. १६ बी प्लॉट नं.४३ एकुण क्षेत्रफळ ५४.६० चौरस मिटर धारणाधिकार अ (न्यासाच्या परिशिष्ट १ प्रमाणे अंजनगाव सुर्जी येथील प्लॉट नं.४३ शिट नं.१६ बी क्षेत्रफळ ५८८ चौ.फुट) खुली जागा.

त्याची चर्तुसिमा खालील प्रमाणे -
पुर्वेस - रोड — पश्चिमेस - प्लॉट नं. ४०
उत्तरेस - रोड — दक्षिणेस - रोड

त्या अर्थी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, सदहू मालमत्तेवरील विक्री बाबत कोणालाही काही आक्षेप असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून तीस दिवसांचे आत मा.धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे कार्यालयात जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सुचना दिलेल्या वकिलांमार्फत खालील सही करणार यांचे समोर दिलेल्या पत्यावर दाखल करावे त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही.
आज दिनांक २७/०५/२०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी व धर्मादाय सह आयुक्तांच्या शिक्यांनिशी ही नोटीस दिली.

शिक्का
**अधीक्षक (न्याय)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**अमरावती**



**महाराष्ट्र शासन**
**धर्मादाय सह आयुक्त कार्यालय**
**अमरावती विभाग, अमरावती**

### जाहीर नोटीस

अर्ज क्र.०२०/कलम ३६(१) (अ)/२०२६

**श्री मारोती संस्थान माहुली जहागीर ता.जि.अमरावती**
**रजि.नं.ए-५८९/अमरावती**

वरील अर्जदाराने वरील नमुद न्यासाची नोंदणी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती येथे केलेली आहे.

**मौजे पांढरपुर, ता.जि. अमरावती येथील गट क्र.२६, भोगवट वर्ग १, एकुण क्षेत्रफळ ०१ हे ६३ आर. आकार रुपये ३.०० (न्यासाच्या परिशिष्ट १ प्रमाणे सर्व्हे नं.०६/१अे गट नं.२६ क्षेत्रफळ १ हेक्टर ६३ आर.)**

त्या अर्थी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, सदहू मालमत्तेवरील विक्री बाबत कोणालाही काही आक्षेप असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून तीस दिवसांचे आत मा.धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे कार्यालयात जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सुचना दिलेल्या वकिलांमार्फत खालील सही करणार यांचे समोर दिलेल्या पत्यावर दाखल करावे त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २६/०५/२०२६ रोजी माझे सही व शिक्यानिशी व धर्मादाय सह आयुक्तांच्या शिक्यांनिशी ही नोटीस दिली.

शिक्का
अधीक्षक (न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २६६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### अनिलकुमार वांगे यांचा सत्कार

**खल्लार-** चंडिकापूर केंद्राचे केंद्र प्रमुख अनिलकुमार श्रीरामपंत वांगे यांचा सेवानिवृत्त झाल्या मुळे गट साधन केंद्र,दर्यापूर येथे गटशिक्षणाधिकारी संतोष घुगे, शिक्षण विस्तार अधिकारी तसेच नंदकुमार जाधव, गटसमन्वयक सुनिल स्वर्गीय व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. अनिल कुमार वांगे यांची सेवा ३५ वर्ष पूर्ण झाली असून त्यांनी शासकीय सेवेतील कार्याची सुरुवात सहाय्यक शिक्षक म्हणून केली. आपल्या कार्याची सुरुवात झाली. त्यानंतर पदविधर म्हणून चांदुर बाजार, अचलपूर,चिखलदरा पंचायत समितीमध्ये सेवा दिली. दर्यापूर पंचायत समितीमध्ये २५ पासून केंद्रप्रमुख पदावर चंडिकापूर येथे कार्यरत होते. ते अतिशय शांत, शिस्तप्रिय होते. सत्कार प्रसंगी शिंगणापूर केंद्राचे केंद्र प्रमुख राजेंद्र मालोकार, थिलोरी केंद्राचे केंद्र प्रमुख संजय बोबडे, दर्यापूर केंद्राचे केंद्रप्रमुख डी. आर. जामनिक, नगर परिषदचे केंद्रप्रमुख बांबल, सामदा केंद्राच्या केंद्रप्रमुख कल्पना बैलमारे, विषय साधन व्यक्ती प्रणिता कुऱ्हाडे, ममता गुर्जर, मदन देशमुख, गजानन सोनोने सचिन चारथळ,सुरंजना रायबोले, विशाल काळे,इत्यादी उपस्थिती होते.कार्यक्रमाचे संचालन सुनिल स्वर्गीय यांनी केले तर आभार कल्पना बैलमारे यांनी केले.



### पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमध्ये माजी विद्यार्थी परीक्षकांचा सन्मान

**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या वतीने माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास भेट दिल्यास स्नेह सत्कार करण्याची परंपरा राखली आहे.या अनुषंगाने महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असलेले आर्कि पवन मांगलकर (२०१३ ते २०१८ बॅच) आणि परीक्षक म्हणून आलेल्या आर्कि श्रुतिका मुंधाडे (२०१६ ते २०२१ बॅच) यांचा विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. संजय देशमुख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली आकर्षक कलाकृती असलेली दिवे भेट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी परीक्षक म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दिलेले मार्गदर्शन आणि योगदान याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी पवन मांगलकर आणि श्रुतिका मुंधाडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून वास्तुकला क्षेत्रातील अनुभव, करिअरच्या संधी तसेच व्यावसायिक कौशल्यांबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली.या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण पार पडला.

### डॉ.उज्वल बारंगे शुक्रवारी आकाशवाणीवर

**अमरावती-** शहरातील प्रख्यात रेडिओ फ्रिक्वेन्सी लेझर सर्जन



डॉ. उज्वल बारंगे यांची मुलाखत शुक्रवार दि. ५ जून तसेच १२ जून रोजी सकाळी १० वाजता अमरावती आकाशवाणीच्या 'आरोग्य संवाद' या कार्यक्रमातून प्रसारित होणार आहे. 'गुदगत आजार (ॲनोरेक्टल डिसीजेस), कारणे, उपचार आणि प्रतिबंध' या विषयावर डॉ. उज्वल बारंगे यांच्याशी लोकप्रिय निवेदक नितीन भट यांनी साधलेल्या संवाद दोन भागांत प्रसारित होणार आहे.गुदगत आजार (Anorectal Diseases), हा आजार लपविण्याची रुग्णांची मानसिकता, आजार होण्याची कारणे, फिशर आणि फिशच्यूमधील फरक, गुदगत आजारांचे टप्पे, वैद्यकीय उपचार, उपचार सुरु झाल्यावर घ्यायची काळजी, ऑपरेशननंतर पाळावी लागणारी पथ्ये, कालानुरूप ऑपरेशन करण्याच्या पद्धतीतील बदल, गुदगत आजारात लेझर तंत्राच्या साह्यानं सर्जरी अशा विविध विषयांवर डॉ. उज्वल बारंगे या मुलाखतीतून मार्गदर्शन करतील. 'आरोग्य संवाद' या कार्यक्रमाची या कार्यक्रमाची निर्मिती आकाशवाणी अमरावती केंद्राची असून सादरकर्ते आशिष गावंडे आहेत. हा कार्यक्रम आकाशवाणी अमरावती केंद्राबरोबरच News On Air या मोबाईल ॲपवर देखील ऐकता येईल. मुलाखतीचा आस्वाद घेण्याचे आवाहन अमरावती आकाशवाणीचे कार्यक्रम प्रमुख भय्यालाल टेकाम आणि कार्यक्रम अधिकारी आशिष गावंडे यांनी केले आहे.

### महिला उद्योगांच्या नावाखाली महिलांची ८५ हजारांची फसवणूक

**तिवसा-** महिला सक्षमीकरण व घरबसल्या रोजगाराचे आमिष दाखवून गुरुदेवनगर (गुरुकुंज) येथील महिलांची सुमारे ८५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी महिलांनी एकत्र येत तिवसा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली असून संबंधित व्यक्तीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, महिला उद्योगाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देत गुरुदेव नगर येथील ३८, महिलांकडून प्रत्येकी सुमारे अडीच हजार रुपये उकळण्यात आले. उद्योग सुरू करून नियमित काम व दरमहा निश्चित मानधन देण्याचे आश्वासन यावेळीं आरोपीकडून देण्यात आले होते. या आमिषाला बळी पडत अनेक महिलांनी विश्वासाने २,५००,प्रमाणे रक्कम जमा केली.मात्र, कालांतराने ना उद्योग सुरू झाला, ना कोणतेही मानधन मिळाले. संबंधित व्यक्तीकडे वारंवार संपर्क साधूनही समाधानकारक उत्तर मिळाले नाही, असा आरोप महिलांनी केला आहे. बैठका घेण्याचे आश्वासन देण्यात आले; मात्र त्या प्रत्यक्षात पार पडल्या नसल्याचेही समोर आले आहे.याप्रकरणी महिलांनी दिलेल्या निवेदनात, आपली घेतलेली रक्कम परत मिळावी व संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून रोजगार व स्वयंरोजगाराच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीबाबत नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.यासंदर्भात गुरुदेवनगर येथील महिलांनी तिवसा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे.

# २४० रुपयांत गोणपाटाचा गणवेश शिवायचा का?

## २० टक्के कपातीमुळे मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापण समितीच्या तोंडाचे पाणी पळाले

**अमरावती/का.प्र.**

नवीन शैक्षणिक वर्ष (२०२६-२७) सुरू होण्यास अवघे काही दिवस उरले असताना, शासनाने मोफत शालेय गणवेशाच्या निधीला थेट २० टक्क्यांची कट लावली आहे. प्रति गणवेश ३०० रुपये देण्याचा प्रघात असताना, यंदा शाळांच्या खात्यात केवळ २४० रुपयेच जमा करण्यात आले आहेत. आधीच गगनाला भिडलेल्या महागाईत ३०० रुपयांत धड कापड मिळत नव्हते, तिथे २४० रुपयांत काय विद्यार्थ्यांना



गोणपाटाचा गणवेश शिवून द्यायचा? असा तीव्र संताप आता मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीमधून व्यक्त होत आहे.

राज्यात २८ लाख ७७ हजार विद्यार्थी शालेय गणवेशासाठी पात्र आहेत. शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या माध्यमातून २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत गणवेश योजनेसाठी ९३ कोटी ५२ लाख ८५ हजार ४० रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला आहे तर अमरावती जिल्हातील १४पंचायत समिती करीता प्रति एक गणवेश करीता २४०रुपये प्रमाणे १०१३३१लाभार्थी विद्यार्थांन करीता २४३१९४४०(दोन कोटी त्रेचाळीस लक्ष एकोणविस हजार चारशे चाळीस रुपये फक्त)निधी दिला आहे. यामुळे मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापण समितीला मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली आहे

### मुख्याध्यापक आणि संघटनांचे आक्षेप

- २४० रुपयांत काय येणार? : बाजारात कापड, दोरा आणि शिलाईचे दर दुप्पट झाले असताना, सरकारने निधी वाढवण्याऐवजी तो कमी करून गरीब विद्यार्थ्यांची क्रूर थट्टा केली आहे.
- पहिल्याच दिवशी पेच : १५ जून रोजी शाळा उघडणार आहेत. शासनाने 'पीएफएमएस' प्रणालीद्वारे केवळ एकाच गणवेशाचा तोही तुटपुंजा निधी पाठवल्यामुळे वेळेत खरेदी आणि शिलाई करणे अशक्य झाले आहे.
- नियम बदलून कोंडी : गणवेश खरेदीचे जुने निकष बदलल्यामुळे आधीच शिक्षक अडचणीत होते, त्यात आता या आर्थिक कपातीने शाळांना थेट खिंडीत गाठले आहे.

# महानगरपालिकेत कार्यालयीन कार्यपद्धती प्रशिक्षण

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिकेच्या आयुक्त वर्षा लड्डा यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली दि. २ जून २०२६ रोजी कार्यालयीन कार्यपद्धती विषयक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महानगरपालिका प्रशासनातील कामकाज अधिक सुसूत्र, पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे प्रशिक्षण विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे पार पडले. प्रशिक्षण कार्यक्रमात महानगरपालिकेतील विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि प्रशासकीय कामकाजाशी संबंधित कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासकीय कार्यालयांमध्ये दैनंदिन कामकाज करताना आवश्यक असलेल्या



विविध नियमावली, प्रशासकीय प्रक्रिया, फाईल हाताळणी, पत्रव्यवहार, नोंद व्यवस्थापन, सेवा वितरण आणि वेळेचे व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, नागरिकांना दर्जेदार आणि वेळेत सेवा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यासाठी प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने आपल्या कामकाजात शिस्त, जबाबदारी, पारदर्शकता आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे.आयुक्तांनी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना नागरिकाभिमुख प्रशासनाची संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले. नागरिकांच्या समस्या वेळेत सोडविणे, त्यांच्याशी सुसंवाद राखणे आणि शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने कार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमात उपस्थित कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणादरम्यान विविध प्रशासकीय विषयांवरील प्रश्न उपस्थित केले. त्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सविस्तर उत्तरे देण्यात आली. त्यामुळे अनेक शंकांचे निरसन होऊन कार्यालयीन कामकाज अधिक प्रभावीपणे पार पाडण्यासाठी कर्मचाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन मिळाले.या प्रशिक्षणामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होणार असून प्रशासनातील कामकाज अधिक वेगवान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.या प्रशिक्षणात अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, अधिकारी वर्ग तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चक्रीवादळात सोलर प्रकल्पाचे नुकसान

## सुधाकर मानेकर यांची नुकसान भरपाईची मागणी



**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील साखरा येथील शेतकरी सुधाकर शंकरराव मानेकर यांच्या कोहळा जेटेश्वर येथील गट क्रमांक ४२१ मधील शेतात बसविण्यात आलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे २८ मे २०२६ रोजी झालेल्या चक्रीवादळात संपूर्ण नुकसान झाले आहे.

सदर सोलर प्रकल्प अवघ्या सहा महिन्यांपूर्वी अल्ट्राटेक कंपनीमार्फत उभारण्यात आला होता. नुकसानाची पाहणी केल्यानंतर प्रकल्पात निकृष्ट दर्जाचे साहित्य व बांधकाम वापरण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे सोलर पॅनलचे स्ट्रक्चर उखडून पडून संपूर्ण प्रकल्प १०० टक्के नुकसानग्रस्त झाल्याचे सांगण्यात आले.या घटनेमुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याने संबंधित कंपनीकडून योग्य नुकसानभरपाई मिळावी व प्रकरणाची चौकशी करून आवश्यक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सुधाकर मानेकर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

जनमाध्यम
जाहिरात व
बातम्याकरिता संपर्क
चांदूर रेल्वे तालुका प्रतिनिधी
सुभाष जैन :
९७६६६७०२६१

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**शिराळा-** येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकातुन गावातील प्रमुख मार्गावरून डी.जे. वगळून हरिनामाचा गजर करुन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. पिवळे वस्त्र परिधान करून महिला पुरुष शोभायात्रेत सहभागी झाले होते हे विशेष! पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कि जय, अमर रहे अशी घोषणा देत शोभायात्रा गावातील प्रमुख मार्गावरून शांततेत निघाली होती. विशेष म्हणजे या वेळी बुद्ध विहारातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार राजुभाऊ गंधे डॉ वामनराव जिभकाटे, आशिष खैरकर यांनी अर्पण केला तसेच भगवान बुद्धाच्या पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. यावेळी भाजपचे अमरावती तालुका प्रमुख राजुभाऊ गंधे, अमरावती तालुका उपाध्यक्ष आशिष खैरकर, प्रविण भागवत, भरत लव्हाळे, निलेश म्हस्के, डॉ वामनराव जिभकाटे, असंख्य नागरिक सहभागी झाले होते.महिला सुध्दा मोठ्या संख्येने सहभागी होत्या.

# एमआरपीच्या नावाखाली ग्राहकांची लूट थांबवा

## अ.भा.ग्रा पंचायतची तहसीलदाराकडे मागणी

**तिवसा/वार्ताहर**

बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या विविध वस्तूंवर छापण्यात येणाऱ्या कमाल किरकोळ किंमतीच्या (एमआरपी) नावाखाली ग्राहक व शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याचा गंभीर आरोप अखिल भारतीय ग्राहक पंचायत,तिवसा तालुका शाखेने केला आहे. या संदर्भात ग्राहक पंचायतच्या शिष्टमंडळाने तिवसा तहसीलदार मयुर कळसे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले असून एमआरपी व्यवस्थेत पारदर्शकता आणण्याची मागणी केली आहे.

ग्राहक पंचायतने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अनेक उत्पादक कंपन्या वस्तूंची मूळ उत्पादन किंमत अत्यंत कमी ठेवून त्यावर अनेक पटींनी वाढीव एमआरपी छापतात. परिणामी ग्राहकांना वस्तूच्या वास्तविक किमतीची माहिती मिळत नसून



विक्रेते आणि उत्पादक कंपन्यांना मनमानी दर आकारण्याची संधी मिळते. यामुळे सामान्य ग्राहकांसह शेतकरी वर्गालाही आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.सध्या बाजारात अनेक वस्तूंवर फक्त एमआरपी छापलेली असते. मात्र त्या वस्तूची उत्पादन किंमत, वाहतूक खर्च, कर आणि नफा यांचा तपशील ग्राहकांना उपलब्ध नसतो.ग्राहकांच्या हितासाठी प्रत्येक वस्तूवर 'मूळ उत्पादन किंमत' स्पष्टपणे छापणे बंधनकारक करावे, तसेच एमआरपी निश्चित करण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत ग्राहकांना योग्य माहिती मिळणे हा मूलभूत अधिकार असल्याचे नमूद करत, प्रशासनाने या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन शासन स्तरावर आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली.निवेदन सादर करताना ग्राहक पंचायतचे तिवसा तालुकाध्यक्ष गुणवंत देवतारे व पदाधिकारी मधुकर पिंगळे,भिमराव बारी,अजय केने,हेमंत निखाडे,वैभव भोंबे, गजानन कावरे आदी उपस्थित होते.

# चांदूर बाजार बसस्थानक प्रादेशिक स्तरावर स्वच्छता स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकावर

**चांदूरबाजार/वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक' अभियानांतर्गत राज्यातील बसस्थानकांची निवड करण्यात आली. या अभियानात अमरावती विभागातील चांदूर बाजार बसस्थानकाने 'ब' गटामध्ये प्रादेशिक स्तरावर तृतीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित आणि आकर्षक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासन व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने हे अभियान राबविण्यात आले होते. अभियानांतर्गत राज्यातील विविध बसस्थानकांची तपासणी करण्यात आली. अमरावती जिल्ह्यातील आठ बसस्थानकांची जिल्ह्याबाहेरील विशेष पथकाद्वारे पाहणी करण्यात आली होती. स्वच्छता, प्रवासी सुविधा, परिसराचे सौंदर्यीकरण, व्यवस्थापन व देखभाल या विविध निकषांच्या आधारे गुणांकन करण्यात आले.या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असून अमरावती जिल्ह्यातील चार बसस्थानकांनी प्रादेशिक स्तरावर स्थान मिळविले आहे. त्यामध्ये चांदूर बाजार बसस्थानकाने 'ब' गटात तृतीय क्रमांक पटकावून



जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे.सोमवारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त अमरावती येथील प्रादेशिक कार्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बसस्थानकांचे अधिकारी व कर्मचारी तसेच उल्लेखनीय सेवा बजाविणाऱ्या चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. चांदूर बाजार आगाराच्या वतीने आगार प्रमुख प्रवीण डायलकर हा पुरस्कार स्वीकारला. या पुरस्कारामध्ये प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह तसेच दीड लाख रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. पुरस्कार मिळाल्याने आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मलाबारगोल्ड अँड डायमंड्सने महाराष्ट्रात जाहीर केला 'अधिक मास सिल्व्हर ऑफर'

**मुंबई-** जगातील आघाडीचे ज्वेलरी रिटेलर आणि विश्वास व जबाबदारीचे प्रतीक असलेले मलाबार गोल्ड अँड डायमंड्स यांनी महाराष्ट्रातील निवडक शोरूम्स मध्ये 'अधिक मास' या शुभ कालखंडानिमित्त खास मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेत अध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व साजरे केले जाणार आहे. ही खास मोहीम १७ मे ते १५ जून २०२६ दरम्यान महाराष्ट्रातील २३ निवडक मलाबार गोल्ड अँड डायमंड्स शोरूम्स मध्ये उपलब्ध असेल. 'अधिक मास ऑफर' अंतर्गत ग्राहकांना सर्व सिल्व्हर वस्तूंवर मेकिंग चार्जेसमध्ये सरळ ३०टक्के सूट मिळणार आहे. महाराष्ट्राच्या परंपरांमध्ये खोलवर रुजलेला 'अधिक मास' हा अध्यात्मिक दृष्टया महत्त्वाचा कालखंड मानला जातो. या काळात चांदीची खरेदी शुभ मानली जाते आणि ती भक्ती, समृद्धी व सकारात्मक सुरुवातीशी जोडलेली असते. या सांस्कृतिक भावनांचे प्रतिबिंब दाखवत मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने भक्ती तसेच भेटवस्तूंसाठी खास तयार केलेले विविध सिल्व्हर कलेक्शन सादर केले आहे.या कलेक्शन मध्ये चांदीचे देवप्रतिमा, पूजाविधीतील साहित्य, सिल्व्हरवेअर, पैंजण, पायातले रिंग्स, जोडवी तसेच आधुनिक आणि पारंपरिक अशा विविध सिल्व्हर डिझाइन्सचा समावेश आहे. हे सर्व उत्सव, अध्यात्मिक प्रसंग आणि दैनंदिन वापरासाठी खास तयार केले गेले आहे.मोहिमेबाबत प्रतिक्रिया देताना मलाबारग्रुपचे चेअरमन एम. पी. अहमद म्हणाले 'सण आणि अध्यात्मिक दृष्ट्या महत्त्वाचे प्रसंग भारतातील दागिने खरेदीच्या परंपरेत आजही महत्त्वाची भूमिका बजावतात. महाराष्ट्रात 'अधिक मास'ला विशेष सांस्कृतिक महत्त्व आहे, विशेषतः चांदी खरेदीच्या परंपरेत. या खास मोहिमेद्वारे आम्ही ग्राहकांना विचारपूर्वक निवडलेले सिल्व्हर कलेक्शन देत आहोत, ज्यामागे मलाबार गोल्ड अँड डायमंड्सचा विश्वास, पारदर्शकता आणि दर्जा कायम आहे.'मोहिमेच्या कालावधीत सहभागी शोरूम्सना भेट देणाऱ्या ग्राहकांना मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या स्थापित ग्राहक आश्वासन पद्धतींचा लाभ मिळत राहील. यात पारदर्शक किंमत, प्रमाणित उत्पादने, सविस्तर बिलिंग आणि सेवा आधारित ग्राहक अनुभव यांचा समावेश आहे.अधिक मास सिल्व्हर ऑफर' ही मोहीम दिलेल्या कालावधीत महाराष्ट्रातील निवडक मलाबार गोल्ड अँड डायमंड्स शोरूम्स मध्येच लागू असेल.




# ४८ कोटींच्या दंड वसुलीत महसूलचा 'सिलेक्टिव मोड'?

## चिमोटेंच्या सातबाऱ्यावर शासनाचा बोजा; चांडकांच्या उद्योग, मालमत्ता आणि आर्थिक स्रोतांबाबत प्रशासनाचे 'अर्थपूर्ण' मौन

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर येथील बहुचर्चित अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणात शासनाने ठोठावलेल्या तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडाच्या वसुली प्रक्रियेवर आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका बाजूला जमीनमालक विलास चिमोटे यांच्या सातबारा उताऱ्यावर शासनाच्या दाव्याचा बोजा नोंदवून महसूल प्रशासनाने कारवाईचे प्रदर्शन केल्याचे चित्र दिसत असताना, त्याच प्रकरणातील दुसरे प्रमुख पक्षकार संतोष चांडक यांच्या मालमत्ता, उद्योग, यंत्रसामग्री आणि आर्थिक व्यवहारांबाबत प्रशासनाने नेमकी कोणती पावले उचलली, याचे उत्तर मात्र अद्याप मिळालेले नाही.




त्यामुळे ४८ कोटी रुपयांच्या दंडाची प्रत्यक्ष वसुली करण्यापेक्षा महसूल प्रशासन केवळ कागदी घोडे नाचविण्यात व्यस्त आहे का, असा सवाल आता उघडपणे उपस्थित केला जात आहे. मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक २७ व ३८ मधील खदानीतून मोठ्या प्रमाणात गौण खनिजाचे उत्खनन झाल्याचा ठपका ठेवत शासनाने कोट्यवधी रुपयांचा दंड आकारला होता. संबंधित जमिनीचे मालक विलास चिमोटे असून, त्या ठिकाणी भाडेपट्टाधारक म्हणून संतोष चांडक यांचे स्टोन क्रशर व डांबर हॉट मिक्स प्लांट मागील काही महिन्यांपर्यंत कार्यरत असल्याची माहिती अधिकृत नोंदींमध्ये नमूद असल्याचे सांगितले जाते.

वर्षानुवर्षे हे प्रकरण नोटिसा, अपील, पुनर्विचार अर्ज आणि प्रशासकीय पत्रव्यवहाराच्या फेऱ्यात अडकलेले असताना प्रत्यक्ष वसुलीची कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे चित्र दिसत नव्हते. मात्र नुकतीच चिमोटे यांच्या सातबाऱ्यावर शासनाच्या ४८ कोटी रुपयांच्या दाव्याची नोंद करण्यात आल्याची माहिती समोर आली. यानंतर महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत नव्याने प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

### प्रशासनाने उत्तर द्यायलाच हवे-

४८ कोटी रुपयांच्या दंड आदेशातील जबाबदारीचे स्वरूप नेमके काय?

दोन्ही पक्षकारांविरोधात समान निकषांवर वसुली सुरू आहे का?

संतोष चांडक यांच्या मालमत्ता, उद्योग आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी झाली का?

स्टोन क्रशर, हॉट मिक्स प्लांट, यंत्रसामग्री आणि वाहनांची पडताळणी करण्यात आली का?

बँक खाती आणि इतर आर्थिक स्रोतांचा शोध घेण्यात आला का?

आरसीसी प्रक्रियेची सद्यस्थिती काय आहे?

चिमोटे यांच्या जमिनीवर बोजा नोंदविण्यापलीकडे प्रत्यक्ष वसुलीसाठी कोणती कारवाई करण्यात आली?

या प्रश्नांची अधिकृत उत्तरे समोर येईपर्यंत गाजीपूर प्रकरणातील ४८ कोटी रुपयांच्या दंडाची वसुली ही प्रत्यक्ष कारवाईपेक्षा औपचारिक कागदी प्रक्रियेचा भाग ठरत आहे का, हा प्रश्न कायम राहणार आहे. परिणामी, 'दंड दोघांवर आणि कारवाई एकावरच?' अशी चर्चा आता महसूल विभागालाच अडचणीत आणणारी ठरत आहे.

### ■ सातबाऱ्यावर बोजा; पण ४८ कोटी वसूल होणार कसे?

महसूल विभागाने चिमोटे यांच्या जमिनीवर शासनाचा दावा नोंदविला असला, तरी प्रत्यक्ष वसुलीच्या दृष्टीने ही कारवाई कितपत परिणामकारक आहे, याबाबतच शंका व्यक्त केली जात आहे. स्थानिक महसूल वर्तुळात सुरू असलेल्या चर्चेनुसार, ज्या जमिनीवर शासनाचा दावा नोंदविण्यात आला आहे, त्या मालमत्तेचे संभाव्य बाजारमूल्य आणि ४८ कोटी रुपयांचा दंड यांची तुलना केली असता, संबंधित जमीन विकूनही दंडाच्या रकमेतील अल्पांश भागच वसूल होऊ शकेल. संपूर्ण दंड वसुली तर दूरच, दंडाच्या १० टक्के रकमेचीही भरपाई त्या मालमत्तेतून होणे कठीण असल्याचे बोलले जात आहे. अशा परिस्थितीत सातबाऱ्यावर बोजा नोंदविणे ही प्रत्यक्ष वसुलीची प्रभावी कारवाई आहे की केवळ कागदोपत्री प्रक्रिया, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### प्रभावशाली व्यक्तींसमोर महसूल यंत्रणा नरम?

गाजीपूर प्रकरणात आता आणखी एक चर्चेचा मुद्दा पुढे येत आहे. स्थानिक पातळीवर रंगत असलेल्या चर्चांनुसार, प्रभावशाली घटकांविरुद्ध कठोर कारवाई करण्याबाबत महसूल यंत्रणा अपेक्षित तेवढी आक्रमक दिसत नसल्याची भावना व्यक्त केली जात आहे. या चर्चांमध्ये किती तथ्य आहे, हे अधिकृत चौकशी आणि प्रशासनाच्या स्पष्टीकरणातूनच स्पष्ट होऊ शकते. मात्र एका बाजूला जमीनमालकाच्या सातबाऱ्यावर शासनाचा दावा नोंदविला जातो आणि दुसऱ्या बाजूला दुसऱ्या पक्षकाराबाबत उद्योग, यंत्रसामग्री, आर्थिक व्यवहार आणि इतर संभाव्य स्रोतांबाबत ठोस माहिती समोर येत नाही, हे वास्तव प्रशासनासाठी अस्वस्थ करणारे ठरत आहे.

### ■ आरसीसीचे आदेश; पण पुढे काय?

उपविभागीय अधिकारी लोणारकर यांनी महसूल वसुलीसाठी आरसीसी प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिल्याची माहिती यापूर्वी समोर आली होती. मात्र त्यानंतर महसूल विभागाने कोणत्या मालमत्तांची नोंद घेतली, किती नोटिसा बजावल्या, किती स्रोतांचा शोध घेतला आणि वसुलीची प्रक्रिया नेमकी कोणत्या टप्प्यावर आहे, याबाबत अधिकृत माहिती मिळालेली नाही. यामुळे आरसीसी प्रक्रिया प्रत्यक्षात सुरू आहे की केवळ औपचारिकता म्हणून कागदोपत्री नोंदींपुरती मर्यादित राहिली आहे, अशी शंका व्यक्त होत आहे.

### ■ चांडकांच्या मालमत्तांचा शोध घेतला का?

या प्रकरणातील दुसरे महत्त्वाचे पक्षकार संतोष चांडक यांच्या विरोधात महसूल प्रशासनाने नेमकी कोणती कारवाई केली, हा सध्या सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत आहे. महसूल वसुलीच्या प्रचलित प्रक्रियेनुसार संबंधित व्यक्तींच्या मालमत्ता, उद्योग, आर्थिक व्यवहार, बँक खाती, व्यावसायिक वाहने, यंत्रसामग्री आणि इतर स्रोतांची माहिती घेऊन वसुलीची प्रक्रिया राबविता येते. आवश्यकतेनुसार जप्ती अथवा सील करण्यासारख्या उपाययोजनांचाही विचार केला जाऊ शकतो. मात्र गाजीपूर प्रकरणात चांडक यांच्या नावावरील किंवा नियंत्रणाखालील मालमत्तांचा शोध घेण्यात आला का? त्यांच्या स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांटची तपासणी करण्यात आली का? संबंधित उद्योगांची आर्थिक उलाढाल, यंत्रसामग्री, वाहने किंवा इतर आर्थिक स्रोतांची पडताळणी झाली का? या प्रश्नांची उत्तरे महसूल प्रशासनाकडे अद्याप उपलब्ध नाहीत.

### उद्योग सुरू; मग वसुली यंत्रणा निष्क्रिय का?

स्थानिक स्तरावर व्यक्त होत असलेल्या चर्चांनुसार, दंड आदेशाशी संबंधित चांडक यांचे उद्योग आणि व्यावसायिक उपक्रम सुरू असताना वसुली यंत्रणा नेमकी कोणती पावले उचलत आहे, याबाबत संभ्रम आहे. जर शासनाची ४८ कोटी रुपयांची थकबाकी वसूल करायचीच असेल, तर संबंधित आर्थिक स्रोतांचा मागोवा घेणे, उद्योगांची माहिती संकलित करणे आणि उपलब्ध मालमत्तांचा शोध घेणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात अशा प्रकारच्या कारवाईचे कोणतेही स्पष्ट चित्र दिसून येत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

# अंजनगाव सुर्जी नगरसेवकांची 'विप्लव बाजोरिया' यांच्याकडून दिशाभूल

### -महायुतीशीच आमची निष्ठा , शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण



**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** अमरावती विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीने सध्या जिल्ह्याचे राजकारण तापले आहे. शिवसेना (शिंदे गट) माजी आमदार विप्लव बाजोरिया यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. विशेषतः अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या १० नगरसेवकांनी त्यांच्या अर्जावर 'सूचक' म्हणून स्वाक्षऱ्या केल्याने उलट-सुलट चर्चांना उधाण आले होते. मात्र, आता या प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, संबंधित शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन विप्लव बाजोरिया यांनी आमची दिशाभूल केल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. विप्लव बाजोरिया यांनी उमेदवारी अर्ज भरताना अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या ☞(पान २ वर)

# इर्विन रुग्णालयात पुणे येथील महिलेचे दागिने लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील इर्विन रुग्णालय परिसरात चोरट्यांचा वावर वाढत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. नातेवाईकाला भेटण्यासाठी आलेल्या एका महिलेच्या पर्समधून तब्बल १ लाख ७४ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना मंगळवारी घडली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी



अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या ☞(पान २ वर)

# राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्षाचे घरी चोरी
# ६.२७ लाखाचा ऐवज लंपास

### -सीसीटीव्ही निष्क्रिय करून साधला डाव

**गुरुकुंज मोझरी/ प्रतिनिधीः-** गुरुदेवनगर परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष हेमंत बोबडे यांच्या घरी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी हात साफ करून तब्बल ६ लाख २७ हजार रुपयांची रोकड लंपास केली.ही खळबळजनक घटना आज ३ जून रोजी पहाटे उघडकीस आली. विशेष म्हणजे चोरट्यांनी घराच्या आवारातील सीसीटीव्ही यंत्रणा पूर्णपणे निष्क्रिय करून पुरावे



नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हेमंत सुरेशराव बोबडे (वय ४०) हे गुरुदेवनगर येथील श्रीगुरुदेव विद्यामंदिर परिसरात वास्तव्यास असून ते राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी तसेच शेती व ट्रक व्यवसाय करतात. त्यांच्या घराच्या तळमजल्यावर ते राहत असून वरच्या ☞(पान २ वर)

# बाजोरिया पिता-पुत्रांसह समर्थकांवर गुन्हा दाखल

### शासकीय कामकाजात अडथळा आणल्याचा आरोप

**अमरावती/ प्रतिनिधीः-** स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या (एमएलसी) निवडणुकीतील उमेदवारी अर्ज छाननीदरम्यान महसूल भवनात घडलेल्या गोंधळाचे गंभीर पडसाद उमटले असून माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया, त्यांचे पुत्र व उमेदवार विप्लव बाजोरिया तसेच काही समर्थकांविरुद्ध गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान




शासकीय कामकाजात अडथळा आणल्याचा आरोप या सर्वांवर ठेवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील ☞(पान २ वर)

# अमरावती शहर पोलीस दलात सार्वत्रिक बदल्या

### १५८ अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पदस्थापना

**अमरावती/ प्रतिनिधीः-** पोलीस आयुक्त कार्यालयाने प्रशासकीय कारणास्तव आणि विहित कालावधी पूर्ण झाल्याने पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई या श्रेणीतील एकूण १५८ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सार्वत्रिक बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. पोलीस आयुक्तालय स्तरावरील आस्थापना मंडळाच्या मान्यतेने हे आदेश काढण्यात आले असून, संबंधितांना तत्काळ नव्या ठिकाणी कार्यमुक्त करून रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले



आहेत.

या बदल्यांमध्ये पोलीस उपनिरीक्षक, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, महिला व पुरुष हवालदार, पोलीस नाईक, महिला पोलीस नाईक तसेच पोलीस शिपाई यांचा समावेश आहे. अनेक कर्मचाऱ्यांना विविध पोलीस ठाणे, वाहतूक शाखा, नियंत्रण कक्ष, गुन्हे शाखा, विशेष शाखा, सायबर पोलीस ठाणे, दहशतवाद विरोधी पथक, मोटार परिवहन विभाग आदी शाखांमध्ये पदस्थापना देण्यात आली आहे. बदल्यांमध्ये प्रदीप शहाणे यांची नांदगाव पेठ येथून वलगाव, विनोद धोटे यांची पोलीस मुख्यालयातून शहर वाहतूक शाखा गाडगेनगर, रमेश धुंबोकार यांची राजापेठ येथून खोलापुरी गेट, दादू दहिकर यांची वलगाव येथून नागपुरी गेट, तुळसा तिखिले यांची ☞(पान २ वर)

# अमरावती शहरातील अनधिकृत शाळांची यादी जाहीर

**अमरावती/ प्रतिनिधीः-** राज्यभरात जिकडेतिकडे इंग्रजी शाळांचे पेव फुटले असून पालकांची धाव सध्या इंग्रजी शाळांकडेच दिसून येत आहे. मात्र यामधील काही शाळा विनापरवानगी चालू असल्याचे लक्षात आल्यानंतर अमरावती महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे शहरातील अशा शाळांची तपासणी करण्यात आली. तपासणी वेळी काही शाळा विनापरवानगी व मान्यतेच्या शिवाय सुरू असल्याचे लक्षात आले आहे. यामध्ये वलगाव




रोड येथील फाल्कन इंग्लिश स्कूल , पुंडलिक बाबा नगर येथील विजार्ड इंग्लिश स्कूल व जमीन कॉलनी मधील गोल्डन स्टार इंग्लिश स्कूल या शाळा अनाधिकृत असल्याचे महानगर पालिका ☞(पान २ वर)

# विप्लव बाजोरियांचे नामांकन रद्दच
## नागपूर खंडपीठाकडून अंतरिम दिलासा नाही

### -दोन आठवड्यांनंतर पुढील सुनावणी

**अमरावती/ प्रतिनिधीः-** अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था





मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीचे बंडखोर उमेदवार विप्लव बाजोरिया यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मोठा धक्का दिला आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नामांकन अर्ज बाद केल्यानंतर बाजोरिया यांनी हायकोर्टात धाव घेतली होती; मात्र न्यायालयाने त्यांना कोणताही अंतरिम दिलासा देण्यास किंवा निवडणूक लढवण्याची तात्पुरती परवानगी देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी दोन आठवड्यां ☞(पान २ वर)

# नीट पेपर घोटाळयाचा निषेधार्थ एनएसयुआयचा मशाल मोर्चा उद्या



**अमरावती/ प्रतिनिधीः-** देशातील वैद्यकीय शिक्षणासाठीची सर्वात महत्त्वाची मानली जाणारी नीट प्रवेश परीक्षा पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. परीक्षेतील कथित गैरप्रकार, अनियमितता आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी झालेल्या कथित खेळाविरोधात नॅशनल स्टुडन्ट फेडरेशन ऑफ इंडियाने आक्रमक भूमिका घेतली आहे. या घोटाळ्याच्या निषेधार्थ उद्या शुक्रवार ५ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजता शहरात भव्य मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती आज बुधवार ३ जून रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये आयोजकांनी दिली.

त्यांनी सांगितले की, पेपर लीक घोटाळ्यामुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाला मोठा धक्का बसला आहे. या गंभीर प्रकरणाच्या ☞(पान २ वर)

# सलोना येथे प्रहार-शिवसेना कार्यकर्ता मेळावा
## आमदार बच्चू कडू यांचे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन

**चिखलदरा/ प्रतिनिधी :-** तालुक्यातील सलोना येथे प्रहार जनशक्ती पक्ष आणि शिवसेनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला कार्यकर्ता मेळावा उत्साहपूर्ण





वातावरणात पार पडला. या मेळाव्यास प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते व आमदार बच्चू कडू यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

मेळाव्यात विविध गावांमधून आलेल्या कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली. यावेळी आमदार बच्चू कडू यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तळागाळात काम करण्याचे ☞(पान २ वर)

# वाघिणीला नव्हे तर तिच्या शावकाला परतवाडा येथे हलविले

### -वन विभागाचे स्पष्टीकरण


**अमरावती/ प्रतिनिधीः-** सिंदेवाही परिक्षेत्र (ब्रह्मपुरी प्रादेशिक वनविभाग) येथील 'T2' नामांकित वाघिणीच्या शावकासंदर्भात काही वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेली माहिती वस्तुस्थितीला धरून नसून दिशाभूल करणारी आहे. या चुकीच्या बातम्यांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये अनावश्यक भीतीचे आणि वन विभागाच्या कार्यपद्धतीबाबत गैरसमजाचे वातावरण निर्माण होत असल्याचे वन विभागाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

याबाबतची खरी वस्तुस्थिती अशी की, सिंदेवाही परिक्षेत्रातील 'T2' वाघीण मानव-वन्यजीव संघर्ष निर्माण करत असल्यामुळे, वन विभागाने खबरदारीचा उपाय म्हणून तिला तिच्या शावकांसह सुरक्षितपणे पकडले आहे. मात्र, वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्याप्रमाणे 'T2' वाघिणीला ☞(पान २ वर)

# अवैध दारू अड्डयांवरील धाडीत ४.१६ लाखांचा मुद्देमाल नष्ट

### ३,०४० लिटर मोहमाच सडवा व हातभट्टी साहित्य जप्त

**अमरावती/ प्रतिनिधीः-** जिल्ह्यात अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध अमरावती ग्रामीण पोलिसांनी मोठी मोहीम हाती घेत धडक कारवाई केली. मोर्शी व माहुली पोलीस ठाण्यांच्या हद्दीत करण्यात आलेल्या कारवाईत तब्बल ४ लाख १६ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला.



पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार जिल्हाभर अवैध दारू व्यवसायाविरोधात ☞(पान २ वर)